नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## १६ जागी ढगफुटी : आतापर्यंत ५१ मृत्यू

■ **वृत्तसंस्था, शिमला, दि. २ :**
२०-२१ जून रोजी हिमाचल प्रदेशात मान्सून दाखल झाला. आतापर्यंत २० हून अधिक ठिकाणी ढगफुटी झाली आहे. ३० जूनच्या रात्रीच मंडी आणि किन्नौरमध्ये १६ ठिकाणी ढग फुटले.

राज्यात भूस्खलन आणि पूर संबंधित घटनांमध्ये आतापर्यंत ५१ जणांचा मृत्यू झाला आहे. २२ हून अधिक बेपत्ता आहेत. सुमारे ४० घरे पूर्णपणे कोसळली आहेत. मंडी जिल्ह्यातून वाहणारी बियास नदी वाहत आहे. आज राज्यात मुसळधार पावसाचा रेड अलर्ट आहे. उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे गंगेची पाण्याची पातळी वाढली आहे. पाणी मणिकर्णिका घाटापर्यंत पोहोचले असून, २० हून अधिक मंदिरे बुडाली आहेत.

* वर्ष २९ * अंक ३ * * वर्धा * | गुरुवार, दिनांक ३ जुलै २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)
* विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख
## खरीखरी..

## असा आपला मराठीपणा

भारतात अनेक प्रांत आहेत. तिथे वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात. पण आपला महाराष्ट्र देशाच्या मध्यभागात आहे. एका बाजूला दक्षिण भारतातील राज्ये आणि दुसऱ्या बाजूला पूर्व आणि उत्तरेकडील राज्ये अशा विभागणीमध्ये मध्यभागी असलेला महाराष्ट्र भारतातील इतर राज्यांपेक्षा वेगळाच आहे. भारतावर आक्रमण केलेल्या प्रत्येक सत्तेशी संघर्ष करणारा फक्त महाराष्ट्र आणि महाराष्ट्रात राहणारा फक्त आणि फक्त मराठाच आहे. मोगली सत्तेशी झुंजला तो छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील मराठा. इंग्रजांशी लढला तोही महाराष्ट्रातील मराठाच. अशा प्रकारचे धाडस करणारा देशात एकमात्र प्रदेश आहे तो म्हणजे फक्त महाराष्ट्र. याच महाराष्ट्र प्रदेशामध्ये पश्चिमेला सह्याद्री पर्वत आहे. उत्तरेत सातपुडा पर्वत आहे. या दऱ्याखोऱ्यातील गोदा, कृष्णा, तापी यासारख्या नद्या आणि त्यांच्या इतर उपनद्या यामुळे इथे एक विशिष्ट जाळे निर्माण झालेले आहे. ते जाळे आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले किल्ले म्हणजे महाराष्ट्राची शान आहेत. अशा आपल्या महाराष्ट्रात शुद्ध महाराष्ट्रीयन म्हटल्यावर आर्य आणि द्रविड यांचे मिश्रण आढळते आणि त्यांचे संमिश्र गुणही मराठी माणसात आढळून येतात. महाराष्ट्रात धर्म आणि समता आढळते. ते या प्रदेशाचे वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्रात स्वातंत्र्यप्रियता ही जन्मजात असते. आपला महाराष्ट्र उत्तरेकडील राज्यांप्रमाणे धमार्बाबत आग्रही नाही. आपल्याला काही काळ गुलामगिरी पत्करावी लागली. तरी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी महाराष्ट्राने सदैव पुढाकार घेतलेला आहे. मराठी माणूस व्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्व देतो. येथील लोक साधे आहेत. प्रामाणिक आहेत. महाराष्ट्रातील लोक शेती करतात. पण त्यासोबतच ते लढाऊ सुद्धा आहेत. न्यायासाठी किंवा न्याय मिळवण्यासाठी ते कोणालाही भीत नाहीत. शत्रूलाही आधीपासूनच सूचना देतात आणि मगच त्यांच्यावर आक्रमण करतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी कोणत्याही शत्रूंना पकडल्यावर त्यांना कधीच ठार केले नव्हते, असाच इतिहास आहे. या प्रांताची जनता शिक्षणाला महत्त्व देते. असा आपला महाराष्ट्र आहे. म्हणजे हा महाराष्ट्र स्वगार्सारखाच आहे चक्रधर स्वामींनी मराठी लोकांचे वर्णन करताना म्हटले आहे की,

*महाराष्ट्र थोर आणिक कैसे थोर,*
*जेणुका अर्थी आपुली थोरी असे*
*ते तुलाही अर्थी आणिकासी थोरी करी,*
*थोरापासौनि महाथोर तयाते महाराष्ट्र म्हणिजे*

असे महाराष्ट्राच्या थोरपणाचे निर्भयतेचे महाराष्ट्राच्या शौयार्चे, युद्ध पारंगततेचे वर्णन प्राचीन वाङ्मयात दिसून येते. मराठी माणसाच्या अंगी स्वाभिमान आणि बाणेदारपणा कसा आलेला आहे. याचे उदाहरण म्हणजे पंडित नेहरू पंतप्रधान असताना, त्यांच्या मंत्रिमंडळातील चिंतामणराव देशमुख यांनी आपल्या अर्थमंत्री पदाचा राजीनामा देऊन आपला स्वाभिमान दाखवून दिला होता. महाराष्ट्राच्या महापुरुषांमध्ये हा मराठीपणा ओतप्रोत भरलेला आहे. आग्रा येथे क्रूरकर्मा औरंगजेबाच्या कैदेत शिवाजी महाराज होते. पण महाराजांनी त्याच्या दरबारात गवार्ने छाती फुगवून त्याला आव्हान द्यायला कमी केले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांची ती जबरदस्त सिंहगर्जना म्हणजेच शिवगर्जना त्याकाळी समस्त आग्राकरांनी अनुभवली. बादशाहीची खिल्लत फेकून देणारा आमचा राजा असा बाणेदार होता. त्याच गादीचे शेवटचे छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी तसेच धैर्य दाखवले. इंग्रजांनी त्यांच्यावर धोकेबाजीचे आरोप करून त्यांचे राज्य हिसकावले. पण इंग्रजांच्या धमक्यांना ते कधीच बधले नाहीत. खोट्या आरोपांना मी कधीच उत्तर देणार नाही. असे सांगून त्यांनी आपले राज्य म्हणजे स्वराज्य रक्षक संभाजी आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या गादीचा उल्लेख केला. त्यासोबतच आपण खोटेपणा असलेल्या आरोपांना जराही उत्तर देणार नाही आणि तुमच्या न पटणाऱ्या अटी मान्य करणार नाही. असे सांगून आपला बाणेदारपणा दाखवला. पानिपतच्या लढाईमध्ये अहमदशहा अब्दालीसह त्याच्या सेनापतीला 'बचेंगे तो और भी लढेंगे' हे म्हणणारे दत्ताजी शिंदे यांनी मरणाच्या दारावरही यमाला थांबवण्याचा देदीप्यमान मराठीपणा सोडला नव्हता. आज या महाराष्ट्राला अशाच मराठीपणाची गरज आहे. मराठ्यांचे हे ऐतिहासिक मराठीपण आणि स्वातंत्र्यप्रियता अंगिकारणे हाच महाराष्ट्र धर्म आहे. त्यासाठी मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावो हेच आपले ब्रीदवाक्य असले पाहिजे. महाराष्ट्राच्या या स्वातंत्र्यप्रियतेमुळेच दिल्लीच्या तक्ताला मराठ्यांची भीती वाटते. त्यामुळेच शक्य असूनही मराठी नेतृत्वाला दिल्लीचे तख्त मिळू नये. असे प्रयत्न होतात. यापुढे दिल्लीच्या राज सिंहासनावर मराठा म्हणजे मराठी ; आणि मराठी म्हणजे महाराष्ट्र दिसेल काय?

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून गोंधळ

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २ :**
राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात शेतकरी कर्ज माफीचा मुद्दा चांगलाच गाजला.

या प्रश्नावर विरोधक चांगलेच आक्रमक झाले असून काँग्रेस पक्षाचे विधिमंडळातील नेते विजय वडेट्टीवार यांनी या विषयावर स्थगन प्रस्ताव मांडला. मात्र, अध्यक्षांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला. इतकेच नाही तर विरोधक शेतकऱ्यांच्या आडून राजकारण करत असल्याचा आरोप अजित पवार यांनी केला आहे.

सरकार शक्तिपीठ महामार्गाच्या प्रकल्पासाठी २० हजार कोटी मंजूर करते. पण शेतकरी कर्जमाफी साठी सरकारकडे पैसे नाहीत का? असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

त्याला सत्ताधारी पक्षानेही जोरदार प्रत्युत्तर दिले. शेतकऱ्यांच्या आडून विरोधक राजकारण करत असल्याचा आरोप अजित पवार यांनी केला.

राज्यात शेतकरी आत्महत्या वाढत आहे. दररोज शेतकरी आत्महत्या होत आहे. राज्यात यावर्षी जानेवारी ते मार्च या कालावधीत ७६७ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. यातील २०० प्रकरणे अपात्र ठरली असून १९४ प्रकरणांची चौकशी प्रलंबित आहे. एकीकडे शेतकरी आत्महत्या होतात त्यांना मदती ही सरकार देत नसल्याचा आरोप काँग्रेस पक्षाचे विधिमंडळातील नेते विजय वडेट्टीवार यांनी केला.

कृषिमंत्री शेतकऱ्यांना भिकारी म्हणतात, माजी मंत्री बबनराव लोणीकर शेतकऱ्यांविरोधात आक्षेपार्ह विधान करतात आणि त्यांचा अपमान करतात. शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळत नाही. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाही, कापसाला भाव मिळालेले नाही.

सरकारने शेतकऱ्यांच्या मालाला दीडपट भाव देऊ असे आश्वासन दिले होते. निवडणुकीआधी कर्जमाफी करू अशी घोषणा केली होती. आता मात्र सरकार समितीला पुढे करत आहे. शेतकरी कर्जमाफीसाठी समिती नको अशी भूमिका विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत मांडली.

**विरोधक आक्रमक**

सर्व कामकाज बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा करावी अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी केली. अध्यक्षांनी स्थगन प्रस्ताव फेटाळल्यामुळे विरोधक आक्रमक झाले, शेतकरी प्रश्नावर सरकार असंवेदनशील आहे, चर्चा टाळत असल्याने सरकारचा निषेध करत विरोधकांनी सभागृहाचा बहिष्कार केला.

### शेतकऱ्यांच्या आडून राजकारण करू नका : दादांचा सल्ला



### विरोधकांनी राजकारण करु नये - अजित पवार



शेतकरी हा लाखोंचा पोशिंदा आहे आणि राज्यातलं सरकार शेतकऱ्यांचे सरकार आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, अडचणी समजून घेऊन त्या सोडवणं, शेतकऱ्यांना मदत करणं सरकारची जबाबदारी असून आमचं सरकार ती पार पाडेलंच. शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांवर केव्हाही चर्चा करण्यास सरकार तयार आहे. मात्र, विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या आडून राजकारण करु नये, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे. सरकारकडे सर्व प्रश्नांची उत्तरे आहेत. सरकार चर्चेपासून पळ काढणार नाही, विरोधी पक्षांना त्यांच्या उद्याच्या ठरावात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची संधी असल्याचे अजित पवार म्हणाले.

## ड्रग्स तस्करांना मकोका

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २ :**
राज्यात अंमली पदार्थांची तस्करी वाढली आहे. मागील पाच वर्षात जवळपास सव्वा पाच हजार किलो अंमली पदार्थ (एमडी) आणि कच्चा माल जप्त केला आहे. तर ११६ आरोपींना अटक केली. अमलीपदार्थांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन तस्करी करणाऱ्यांना मोक्का लावणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत केली. तसेच या अधिवेशनात कायद्यात सुधारणा करणारे विधेयक मांडले जाईल, अशी माहिती विधान परिषदेत दिली.

राज्यात अमली पदार्थांची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पोलिसांनी, राज्य सरकारने यावर काय कारवाई केली? वाढत्या तस्करीला आळा घालण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या? असा प्रश्न परिणय फुके यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विचारला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले. ते म्हणाले, राज्यात एमडीला आळा घालण्यासाठी २०२२ मध्ये ३०३ गुन्हे, २०२३ मध्ये ६४२ गुन्हे आणि २०२४ मध्ये ५४५ गुन्हे दाखल केले. गेल्या पाच वर्षात एएनसी मुंबई पोलीस, महसूल गुप्तचर संचालनालय आणि एनसीबी (नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो) यांनी अमली पदार्थांच्या निर्मिती करणा-या कारखान्यांवर कारवाई केली. एएनसी मुंबई पोलिसांनी या प्रकरणी १२ गुन्हे दाखल करत ७५ आरोपींना अटक केली. तसेच महसूल गुप्तचर संचालनालयाने ४ गुन्हे दाखल करून २२ जणांना अटक केली तर एनसीबीने ३ गुन्हे दाखल केले आहेत. तसेच जामिनावर बाहेर आल्यानंतर पुन्हा अशा प्रकारचे गुन्हे केल्यास केंद्र सरकारच्या सहकार्याने सगळ्या राज्यांची को-ऑर्डिनेशन कमिटी तयार झाली आहे. त्यामुळे दोषींवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यास मदत होईल, असे फडणवीस म्हणाले.

अंमली पदार्थांच्या तस्करीला आळा बसावा, यासाठी स्थापन केलेला टास्क फोर्स यावेळी पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाला आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यात एनडीपीएसचे युनिट स्थापन केले असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

## बैल नसल्यामुळे ६५ वर्षीय शेतकऱ्याने
## खांद्यावर घेतले कोळपणीचे जू



■ **वृत्तसंस्था, लातूर, दि. २ :**
महाराष्ट्र सरकार शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवण्याचे अनेक दावे करत आहे. पण या दाव्यांची चिरफाड करणारा एक व्हिडिओ लातूर जिल्ह्यातून समोर आला आहे.

या व्हिडिओत एका ६५ वर्षीय शेतकऱ्याने बैल नसल्यामुळे स्वतःला त्याच्या जागी जुंपल्याचे दिसून येत आहे. हा व्हिडिओ अहमदपूर तालुक्यातील हाडोळती गावचा आहे. त्यात अंबादास पवार व त्यांच्या पत्नी शांताबाई पवार हे दोघे बैल नसल्यामुळे स्वतःच्या खांद्यावर जू घेऊन शेतीची मशागत करताना दिसून येत आहेत.

अंबादास पवार याविषयी बोलताना सांगतात, कुटुंबाचा चरितार्थ चालवताना आमच्यावर ही वेळ आली. आम्ही बैल बारदानाही घेऊ शकत नाही. शेतीत जेवढे पैसे लावले, त्याहून कमी पैसे हातात येतात. आम्ही बँकेकडून ४० हजारांचे कर्ज घेतले आहे. बियाण्यांची बॅग ३ हजाराला घ्यावी लागते. खताचो भाव वाढलेत. सरकारने कर्जमाफी देऊन दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान, या व्हिडीओवरून विधीमंडळ अधिवेशनातही मुद्दा उपस्थित झाला.

## ..यामुळे बाबासाहेब लवकर गेले!

केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांचे मोठे विधान



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २ :**
महाराष्ट्र भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी आमदार रविंद्र चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली. केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांच्या उपस्थितीत याबाबतचं प्रमाणपत्र रविंद्र चव्हाण यांना देण्यात आले.

या कार्यक्रमात किरेन रिजिजू यांनी मोठं विधान केलं आहे. काँग्रेसने दिलेलं टेन्शन, दोन वेळा झालेला पराभव यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्याला वेळेआधी सोडून गेले, असं रिजिजू यांनी म्हटले. रिजिजू यांनी आपल्या भाषणात काँग्रेसवर सकडून टीका केली. तसेच आमचा पक्ष भारतीय संविधानाचा सन्मान करतो, लोकसभा निवडणुकीत भाजपला मत मिळाली नाही. संविधानाला वाचविण्यासाठी भाजपला मत देऊ नका असं आम्हाला सांगण्यात आल्याचं काही दलित बांधवांनी मला सांगितल्याचे ते म्हणाले.

बाबासाहेब आंबेडकरांना मानणारा वर्ग कधीही काँग्रेसला मत देणार नाही, असा विश्वास व्यक्त करत काँग्रेसने बाबासाहेब यांना अपमानित केल आहे, असा मोठा दावा रिजिजू यांनी केला.

बाबासाहेबांना भाजप पुरस्कृत सरकारने भारतरत्न पुरस्कार दिला. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदा मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर ७१वषार्नंतर पंतप्रधान मोदींनी मला कायदामंत्री केलंय. दलित व्यक्तीला बाबासाहेबांच्या खुर्चीवर बसवण्याची संधी मोदींनी दिली, असं म्हणत त्यांनी मोदींचे कौतुक केलं.

**म्हणून बाबासाहेब...**

काँग्रेसने दिलेलं टेन्शन, दोन वेळा झालेला पराभव यामुळे बाबासाहेब आपल्याला वेळेआधी सोडून गेले, असं मोठं विधान त्यांनी आपल्या भाषणात केलं. संविधान दिवस साजरा करण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घेतला. आम्ही पक्ष आणि देशाच्या संविधानाचा सन्मान करतो, असेही रिजिजू म्हणाले.

दरम्यान, आता रिजिजू यांनी केलेल्या विधानानंतर राजकीय प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे.

## त्रिभाषा सूत्रासंदर्भात नवा जीआर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :**
त्रिभाषा सूत्रासंदर्भात राज्य सरकारचा नवा जीआर जारी करण्यात आला आहे. त्यानुसार 'पुनर्विचारासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

पूर्वीचे २ जीआर औपचारिकपणे रद्द करण्यात आले आहेत. नव्या जीआरमध्ये उल्लेख करण्यात आल्याप्रमाणे माशेलकरांच्या समितीने सादर केलेल्या अहवालाचा अभ्यास ही समिती करणार आहे. तसेच नवी समिती ३ महिन्यांत शिफारसी सादर करेल.

राज्य सरकारने त्रिभाषा सूत्र संदभार्तील पूर्वीचे दोन्ही शासन निर्णय रद्द करण्यासंदर्भात नवा शासन आदेश जाहीर केला आहे. या संदर्भात १६ एप्रिल आणि १७ जून २०२५ रोजी जारी झालेले शासन निर्णय आता रद्द झाले आहेत. या जीआरमध्ये मराठी माध्यमातील शाळांमध्ये पहिल्या वर्गापासून तिसरी भाषा म्हणून हिंदी अनिवार्य केली होती, ज्यावर राज्यभर जोरदार विरोध झाला होता. त्यानंतर हे जीआर रद्द केले गेले.

या दोन्ही निर्णयांना रद्द करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशा प्रकारे समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे म्हटले होते. या वेळी फडणवीस यांनी म्हटले की, मराठी ही आमची प्राथमिक भाषा राहणार आहे. तर नवे जीआर हे केवळ मराठी विद्यार्थ्यांवर केंद्रित धोरणावर आधारित राहील.

## अचानक होणाऱ्या कोविड व्हॅक्सिनचा मृत्यूंशी संबंध नाही
## अहवालात पुष्टी




■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २ :**
इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च आणि नॅशनल सेंटर फॉर डिसीज कंट्रोल यांनी अभ्यासात म्हटले आहे की, देशात हृदयविकाराच्या झटक्याने होणाऱ्या अचानक मृत्यूंचा कोविड लसीशी थेट संबंध नाही.

हा अभ्यास १८ ते ४५ वर्षे वयोगटातील लोकांच्या अचानक मृत्यूवर आधारित आहे. आरोग्य मंत्रालयाने बुधवारी एक प्रेस रिलीज जारी करून ही माहिती दिली. या अभ्यासातून भारताची कोविड लस सुरक्षित आणि प्रभावी असल्याची पुष्टी झाली आहे. त्यामुळे होणाऱ्या गंभीर दुष्परिणामांची प्रकरणे दुर्मिळ आहेत. अभ्यासात असे म्हटले आहे की अचानक मृत्यूची इतर कारणे असू शकतात. यामध्ये अनुवंशशास्त्र, जीवनशैली, आधीच अस्तित्वात असलेले आजार आणि कोविडनंतरच्या गुंतागुंत यांचा समावेश आहे.

## शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावर
## सर्वोच्च न्यायालयात दोन वर्षांनी सुनावणी

राष्ट्रवादी काँग्रेस सारखा दिलासा मिळण्याची ठाकरेंना अपेक्षा



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :**
उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या गटाला शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण या पक्ष चिन्हाच्या अधिकाराविषयी सर्वोच्च न्यायालयात दोन वर्षांनी सुनावणी होणार आहे.

२२ फेब्रुवारी २,२३ रोजी दाखल झालेल्या विशेष याचिकेच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या निर्णयाला स्थगिती न देता पूर्णनिर्णयापर्यंत पक्ष चिन्हाचा तात्पुरता वापर कायम ठेवण्याचे आदेश दिले होते.

आता या प्रकरणी १६ जुलै २०२५ रोजी सुनावणी होणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या सुनावणीकडे पाहिले जात आहे.

या प्रकरणात उद्धव ठाकरे यांच्याविरुद्ध एकनाथ शिंदे यांच्या गटाला पक्षाचे नाव आणि चिन्ह जाहीरपणे देण्यात आले होते. निवडणूक आयोगाच्या १७ फेब्रुवारी २०२३ च्या निर्णयावर ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दाखल केले होते. पक्ष चिन्ह वरील निर्णयावर तात्काळ स्थगिती देण्याच्या ठाकरे गटाच्या अजार्ला कोटार्ने आधीच नाकारले होते.

वास्तविक निवडणूक आयोगाने बहुमत चाचणीया निकषावरून शिंदे गटाला पक्षाचे नाव आणि चिन्हाचे अधिकार दिले आहेत.

शिवसेने प्रमाणेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात देखील उभी फूट पडली होती. यातही अजित पवार यांना पक्षाचे नाव आणि चिन्ह मिळाले आहे. मात्र, या प्रकरणाचा निर्णय होईपर्यंत अजित पवार गटाला पक्ष चिन्हाच्या खाली हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात चालू असल्याचा उल्लेख करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

त्यानुसार अजित पवार यांच्या पक्षाच्या अधिकृत जाहिरातीमध्ये तसा उल्लेख दिसून येतो. तसाच दिलासा धनुष्यबाण या चिन्हासाठी देखील मिळावा, अशी उद्धव ठाकरे यांना अपेक्षा आहे.

# महाबोधी महाविहार बौद्ध समाजाच्या ताब्यात द्या!

### आमदार डॉ. नितीन राऊत यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आग्रही मागणी



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :**
बिहारमधील महाबोधी महाविहार या जगप्रसिद्ध बौद्ध धार्मिक स्थळाचे व्यवस्थापन बौद्ध भिक्खू संघ आणि बौद्ध समाजाच्या मार्गदर्शनाखाली पारदर्शक आणि धर्मनिरपेक्ष पद्धतीने व्हावे, या मागणीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात आले.

महाबोधी महाविहार हे केवळ एक विहार नाही, तर बौद्ध धर्मीयांचे जागतिक श्रद्धास्थान असून युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट असलेले ऐतिहासिक स्थळ आहे. तथापि, आजही या पवित्र स्थळाच्या व्यवस्थापनात बौद्ध समाजाची आणि भिक्खू संघाची सहभागिता अत्यंत मर्यादित आहे.

हा केवळ धार्मिक नाही, तर बौद्ध समाजाच्या आत्मसन्मानाचा आणि सांस्कृतिक अस्तित्वाचा प्रश्न आहे. म्हणूनच बौद्ध समाजाच्या भावना लक्षात घेऊन, या स्थळाचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्धांच्या हाती देण्याचा निर्णय शासनाने तात्काळ घ्यावा, ही संपूर्ण बौद्ध धर्मियांची ठाम आणि न्याय्य मागणी आहे असे डॉ नितीन राऊत म्हणाले.

बौद्ध धर्माच्या मूलभूत तत्त्वांनुसार - शांती, करुणा आणि समता यांचा प्रसार करणाऱ्या या स्थळाचे व्यवस्थापनदेखील तितक्याच आदर्श मूल्यांच्या आधारे व्हावे, असे समाजाचे मत आहे.

जर शासनाने या मागणीवर तातडीने निर्णय घेतला नाही, तर संपूर्ण देशभरात जनजागरण मोहीम आणि लोकशाही मागार्ने आंदोलनाचे स्वरूप घेण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

शिष्टमंडळात अखिल भारतीय भिक्षु संघाचे प्रतिनिधी भदंत विनय रखिखतो, भदंत ज्ञानबोधि महाथेरो, भिक्षुणी धम्मदिन्ना इतर भिक्षुसंघ, अशोक गोडघाटे, बंडोपंत टेंभुर्णे, अनिल नगरारे, सुरेश पाटील, अशोक कोल्हटकर, अमन कांबळे, भीमराव वैद्य, एन. टी. मेश्राम, राजेश लाडे, उमेश बोरकर, श्रीमती तक्षशिला वाघधरे व इतर बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माझी हत्या झाली तर...

सदावर्तेंनी घेतली ३ नेत्यांची नावे



**मुंबई :** कायदेतज्ज्ञ गुणरत्न सदावर्ते यांनी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यावर ५ जुलैच्या मोर्चाच्या आयोजनाबाबत टीका केली होती. त्यानंतर आता सदावर्ते यांना धमक्या मिळत आहेत. तसेच सदावर्ते यांच्या निवासस्थानाबाहेर काही कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला असल्याचेही समोर आले आहे. यावर बोलताना सदावर्ते यांनी माझी हत्या होऊ शकते असं विधान केलं आहे, तसेच हत्येसाठी जबाबदार नेत्यांचीही नावे सांगितली आहेत.

गुणरत्न सदावर्ते म्हणाले, माझी हत्या करण्यापर्यंत मला धमक्या मिळाल्या आहेत. माझ्या लेकराबाळांना अर्वाच्य शिवीगाळ करण्यात येत आहे. याबाबत पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त दखल घेतील. परंतु, राज ठाकरे और उद्धव ठाकरे गल्ली की राजनीति चलाने वाले चुट पुट लोग हैं. ते नतद्रष्ट लोक आहेत. या लोकांमुळे मराठी शाळा बंद पडतील. मला धमकी दिली जात आहे. हे लोक माझी व माझ्या कुटुंबाची हत्या करतील, कानाखाली मारतील. माझी हत्या झाली तर राज ठाकरे आणि यांची पिलावळ ,उद्धव ठाकरे आणि वयोवृद्ध पुढारी शरद पवार हे जबाबदार असतील असं सदावर्ते यांनी म्हटलं आहे.

## देशभक्तीचा ठेका घेतलेला नाही

मनसे नेते देशपांडे यांचा निशाणा



**मुंबई :** भारतीय जनता पक्षाने देशभक्तीचा ठेका घेतलेला नाही, असे म्हणत मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी निशाणा साधला आहे. आम्ही देशभक्त असल्याचा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला होता. यावरुन संदीप देशपांडे यांनी ही टीका केली आहे. राज्यात हिंदी सक्ती विरोधात आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते.

संदीप देशपांडे म्हणाले, ते देशभक्त नाहीत, असे कोणीच म्हटले नाही. त्यांनी विरोधकांना काय बोलावे आणि काय बोलू नये, हा त्यांचा प्रश्न आहे. मात्र देशभक्तीचा ठेका हा केवळ भाजपने घेतलेला नाही, ऑपरेशन सिंदूर झाले त्यावेळी बाहेरच्या देशांमध्ये देखील विरोधी पक्षाच्या नेत्यांनाच पाठवले गेले. त्यामुळे देशभक्ती केवळ आमचाच ठेका आहे, असे कोणीही समजू नये. ते योग्य देखील नाही, असे देखील संदीप देशपांडे यांनी म्हटले आहे.

## त्यांनी पीडितेवर बोलू नये

अंजली दमानिया यांचा घणाघात



**मुंबई :** बीडमधील अल्पवयीन मुलीच्या लैंगिक छळ प्रकरणी एसआयटी चौकशी केली जाणार आहे. माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. यावरून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांना यावर बोलण्याचा हक्क नाही असे म्हणले आहे.

अंजली दमानिया म्हणाल्या, काल धनंजय मुंडेंना बीड च्या अल्पवयीन मुलीवर भाष्य करताना बघून खूप राग आला. जो माणूस स्वतः महिलांना त्रास देतो, ज्याच्यावर महिला अत्याचाराच्या केसेस आहेत. आशा माणसाला कुठल्याही महिलेबद्दल बोलण्याचा अधिकार नाही. असे असताना तो मागणी करतो की एसआयटी लावावी आणि मुख्यमंत्री एका दिवसात त्यांचे म्हणणे ऐकून एका महिला आयपीएसची एसआयटी लावतात? का? कुठली आली आहे एवढी मित्रता? बीडच्या त्या अल्पवयीन मुलीला तातडीने न्याय मिळालाच पाहिजे, पण त्यासाठी लढायला चांगली सुसंस्कृत माणस आहेत. आम्ही नेहमी प्रमाणे लढूच. ह्यावर बोलण्याचा हक्क धनंजय मुंडेंना नक्कीच नाही.

## मातोश्रीबाहेर डिवचणारे बॅनर्स

**मुंबई:** मातोश्री परिसर पुन्हा एकदा बॅनरराजकारणाच्या भाळावर वादळ निर्माण करणाऱ्या फलकांनी गजबजला आहे. यावेळी शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांना त्रिभाषा सूत्राबाबत थेट डिवचणारे बॅनर्स लावण्यात आले असून, या बॅनर्सची चर्चा संपूर्ण मुंबईत रंगली आहे.

या आज्ञात बॅनर्सवर कुठल्याही पक्षाचे नाव नाही. मात्र, उद्धव ठाकरेंचा फोटो लावून, ते मुख्यमंत्री असताना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत त्रिभाषा सूत्र मंजूर केल्याच्या निर्णयावरून त्यांना टोला लगावण्यात आला आहे. विशेष म्हणजे, ५ जुलै रोजी ठाकरे बंधू झ्र उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे झ्र यांची पहिल्यांदाच संयुक्त सभा होत आहे. अशावेळी मातोश्री परिसरात अशा बॅनर्स लावल्यामुळे राजकीय वातावरण तापले आहे.

# हाडाचा कार्यकर्ता प्रदेशाध्यक्ष होतो
# हे केवळ भाजपामध्येच शक्य

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे गौरवोद्गार



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २:**
भाजपचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या रुपाने पक्षाचा तळागाळातील हाडाचा कार्यकर्ता पक्षाचा प्रदेशाध्यक्ष झाला आहे. भाजपा ही कार्यकर्त्यांची पार्टी असून सामान्य कार्यकर्ता पक्षाचा अध्यक्ष होऊ शकतो, हे केवळ भाजपामध्येच शक्य आहे, असे गौरवोद्गार केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री व भाजपा माजी राष्ट्रीय अध्यक्ष नितीन गडकरी यांनी मुंबईत केले. भाजपाच्या प्रदेशाध्यक्षपदाच्या निवडीची घोषणा करण्याच्या कार्यक्रमाचा समारोप त्यांच्याच भाषणाने झाला.

त्यांनी सांगितले की, रविंद्र चव्हाण यांचे आई वडील कोणी आमदार नव्हते, त्यांच्या पाठीशी कुटुंबाचा उद्योग व्यवसाय नव्हता.मात्र ते पक्षाचे तळमळीचे कार्यकर्ते आहेत. त्यांनी कोकणातील गावागावात जाऊन पक्षाचा विस्तार केला आणि पक्षाला यश मिळवून दिले. असे दैवदुर्लभ कार्यकर्ते ही भाजपाची संपत्ती आहे. कार्यकर्त्यांच्या त्याग व बलिदानामुळे पक्ष मोठा झाला असल्याने त्यांच्या रुपाने आपल्यातील एक कार्यकर्ता प्रदेशाध्यक्ष झाल्याचा कार्यकर्त्यांना आनंदच असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

ते म्हणाले की, काँग्रेस पक्ष सत्तेच्या साठ वर्षात जे काम करू शकला नाही ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात गेल्या अकरा वर्षात देशात झाले आहे. पण अजूनही काम करायचे आहे.
देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलिअन डॉलर्सची करून जगात तिसऱ्या क्रमांकावर नेण्याचे स्वप्न पूर्ण करायचे आहे आणि हे स्वप्न पूर्ण करण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा असेल, असा ठाम विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यातील महायुती सरकार ताकदवान आहे. त्यासोबत रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात संघटनही मजबूत असेल. दोन्हीच्या समन्वयातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर आधारित राज्यात शिवशाही आणू असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पक्षाचे मावळते प्रदेशाध्यक्ष व राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्याचा गौरव करताना गडकरी म्हणाले की, पक्षाचा संघर्षशील कार्यकर्ता किती मोठा होऊ शकतो याचे उदाहरण म्हणजे चंद्रशेखर बावनकुळे आहेत. त्यांनी प्रदेशाध्यक्ष झाल्यावर रात्रंदिवस प्रवास करून पक्षासाठी काम केले. त्यांच्याच नेतृत्वात पक्षाला विधानसभा निवडणुकीत यश मिळाले.

### भाजपचे माझ्यावर उपकार

रवींद्र चव्हाण यांची भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली आहे. मुंबईत आयोजित कार्यक्रमात त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. रवींद्र चव्हाण हे आधी कार्याध्यक्ष होते, आता ते राज्यात भाजपचे नेतृत्व करताना दिसणार आहेत. प्रदेशाध्यक्ष बनल्यानंतर रवींद्र चव्हाण म्हणाले की, कधीच रवी दादा आगे नाही, ना रविंद्र चव्हाण आगे बढो नाही, तर भाजप आगे बढो असं पाहिजे. माझी आज या पदावर निवड झाली, भाजपने माझ्यावर उपकार केलेत. माझ्याबरोबर काम करणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांना त्याची जाण आहे.

पुढे बोलताना चव्हाण म्हणाले की, माझी ओळख भारतीय जनता पार्टी आहे. एवढ्या मोठ्या पक्षाच्या मोठ्या पदावर माझी नेमणूक झाली आहे. २००२ पासून पक्षाचे काम करायला सुरुवात केली. सामान्य कुटुंबातून आलेला माणूस पक्षाचा प्रमुख होतो, भाजपची विचारधारा गंगेसारखी निर्मळ आणि प्रभावी अशी आहे. महाराष्ट्रातील लोकांपर्यंत ती पोहोचवणं ही आपली जबाबदारी आहे.

राष्ट्रीयत्वाचा धागा मला सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवायचा आहे. बावनकुळेंनी जे सांगितले हे आपल्याला सर्वांपर्यंत पोहोचवायचे आहे, असेही चव्हाण यावेळी बोलताना म्हणाले.

## मोदींना सांगून सर्व परदेशी शाळा बंद करा

संजय राऊत यांचे प्रत्युत्तर



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २ :**
आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे यांनी शिक्षण घेतलेल्या बॉम्बे स्कॉटिश शाळेचा संदर्भ देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर टीका केली होती. त्याला प्रत्युत्तर देत उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी देशातील सर्व परदेशी शाळा बंद करण्याचे आवाहन केले आहे. इतकेच नाही तर पाच तारखेला होणाऱ्या विजयी मेळाव्याचे खुले आमंत्रण देखील राऊत यांनी दिले आहे.

मोदींना सांगून या देशातल्या सर्व इंटरनॅशनल स्कूल, परदेशी शाळा बंद करा, या संदर्भात एक उत्तम जीआर काढा, तुम्हाला जीआर काढण्याची हौस आहेच, अशा शब्दात राऊत यांनी पलटवार केला आहे. या महाराष्ट्रातील सर्व इंटरनॅशनल शाळांच्या छत्र्या उगवलेल्या आहेत, तो धंदा तुमचेच लोक करत आहेत. तुमच्या शिक्षण सम्राटांचा हा धंदा बंद करण्याचे आवाहन राऊत यांनी केले आहे.

मुंबईला कमजोर करण्याचे, मुंबई तोडण्याचे प्रयत्न तुमचे दिल्लीतले 'बाप' करत आहेत. अशा शब्दात राऊत यांनी देवेंद्र फडणवीस यांना सुनावले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भावनिक मुद्दे काढले जातील, मुंबई तोडण्याची भीती दाखवली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले होते. त्याला देखील राऊत यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

चोराच्या मनात चांदणे, असे म्हणत राऊत यांनी फडणवीस यांना स्वप्नात देखील मुंबई तोडलेली दिसत असेल, असा आरोप केला आहे. वास्तविक त्यांच्यावर नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांचा दबाव असल्याचे म्हटले आहे. तसे नसते तर धारावी आणि मुंबईची जागा त्यांनी गौतम अदानी यांच्या घशात घातली नसती, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या पाच तारखेच्या विजयी मेळाव्याची दोन्ही बाजूने तयारी सुरू आहे. या मेळाव्याचे आम्ही घरोघरी जाऊन निमंत्रण देणार नाही. सर्वांनी या मेळाव्यात सहभागी होण्याचा आवाहन उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी केलेले आहे. राजकीय पक्ष, जात, धर्म याचा विचार न करता या मेळाव्याला सर्वांनी उपस्थित रहावे, अशी आमची भूमिका असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. हा राजकीय मेळावा नाही. यासंदर्भात राज ठाकरे यांच्याशी देखील माझे बोलणे झाले आहे. मान,अपमान, सन्मान हा विषय या मेळाव्यात येणार नाही. आम्ही सर्वांना जाहीरपणे आमंत्रित केले आहे. ज्यांना या मेळाव्यात उपस्थित राहायचे आहे, त्या सर्वांचे स्वागत केले जाईल, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे.

**हिंदी सक्ती स्वीकारणार नाही म्हणजे नाही**

या संदर्भात नवीन समिती गठित करण्यात येत आहे. मात्र, समिती- समिती खेळणे, ठराव - ठराव खेळणे आणि डराव- डराव करणे हा देवेंद्र फडणवीस यांचा आवडता छंद आहे. एसआयटी स्थापन करणे आणि त्या माध्यमातून काहीही न करणे, हा त्यांचा खेळ आहे. नरेंद्र जाधव हे नक्कीच अर्थतज्ज्ञ आहे. ते लेखक देखील आहेत. मात्र, शालेय शिक्षणासंदर्भात एक वेगळी समिती स्थापन करता आली असती. मात्र, अशा समितीची गरजच नाही. हिंदी सक्ती आम्ही स्वीकारणार नाही, असे राऊत म्हणाले.

## १६ वर्षीय विद्यार्थ्यावर शिक्षिकेकडून लैंगिक अत्याचार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २:**
एका नामांकित शाळेत काम करणाऱ्या शिक्षिकेने १६ वर्षीय विद्यार्थ्यावर वर्षभर लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या शिक्षिकेला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे.

या विवाहित व मुले असलेल्या या शिक्षिकेवर पोक्सो कायद्यांतर्गत तसेच बाल न्याय व भारतीय दंड संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वर्षभर या शिक्षिकेने १६ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थ्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. या विद्यार्थ्याला कधी निर्जन स्थळी तसेच पंचतारांकित हॉटेलमध्ये नेत त्याच्यासोबत अश्लील चाळे करण्यात आल्याचे समोर आले आहे. यावर अद्याप शाळेकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी महिला ही इंग्रजी विषयाची शिक्षिका असून पीडित विद्यार्थी अकरावीत असताना शिकवत होती. वार्षिक शाळेच्या कार्यक्रमासाठी नृत्य गट स्थापन करण्यात आला होता. या गटात पीडित विद्यार्थी देखील होता. याच दरम्यान शिक्षिका या विद्यार्थ्याकडे आकर्षित झाली. या शिक्षिकेने या विद्यार्थ्याला लैंगिक हावभाव देखील दाखवल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

पीडित मुलाला हे चांगले वाटले नाही म्हणून त्याने या शिक्षिकेला टाळण्यास सुरू केले. मुलगा आपल्याला टाळतोय असे लक्षात आल्यावर महिलेने तिच्या एका मैत्रिणीची मदत घेतली.

या मैत्रिणीने मुलाला सांगितले की ती शिक्षिका आणि तू एकमेकांसाठी बनलेले आहात. त्यानंतर विद्यार्थ्याने शिक्षिकेला भेटण्याचा निर्णय घेतला. शिक्षिकेने या विद्यार्थ्याला एका निर्जन स्थळी नेते व तिथे त्याच्यावर लैंगिक अत्याचार केले. या घटनेनंतर विद्यार्थी तणावात राहायला लागला. तणावात राहू नये म्हणून या शिक्षिकेने त्याला काही औषध देण्यासही सुरू केले, असे तपासत समोर आले. पोलिसांच्या तपासात असे देखील समोर आले की शिक्षिका या अल्पवयीन पीडित विद्यार्थ्याला दारू देखील पाजायची. कधी दक्षिण मुंबईतील तर कधी विमानतळाजवळ असलेल्या एक पंचतारांकित हॉटेलमध्ये घेऊन जायची. तिथे त्याला जबरदस्तीने लैंगिक संबंध ठेवण्यास भाग पाडायची. आता या शिक्षीकेला पोलिसांनी अटक केली आहे.

## मुंबई महापालिकेसाठी भाजपची मोर्चेबांधणी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २:**
आगामी मुंबई महापालिका निवडणुकीसाठी भाजपने मोचेबांधणी सुरु केली असून निवडणूक व्यवस्थापन आणि प्रत्यक्ष कार्यवाहीसाठी पक्षाचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. या समितीत फडणवीस यांचे निकटवर्ती मानले जाणारे आमदार प्रवीण दरेकर, प्रसाद लाड यांना स्थान न मिळाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

या समिती सदस्य म्हणून माजी खासदार किरीट सोमैया, माजी मंत्री प्रकाश मेहता, भाई गिरकर, माजी आमदार मधू चव्हाण, राज पुरोहित, आमदार कालीदास कोळंबकर, पराग अळवणी, कॅप्टन तमिल सेल्वन, राम कदम, पराग शहा, श्रीकांत भारतीय, जयप्रकाश ठाकूर, माधव भांडारी, हाजी अराफत शेख, राणी द्विवेदी, संजय पांडे, दिलीप पटेल आणि अरुण देव यांचा समावेश आहे. केंद्रीय पदाधिकारी आणि मुंबई कोअर कमिटी सदस्य हे या समितीवर कायम निमंत्रित सदस्य म्हणून असणार आहेत.

## पुण्यात ७ जुलैला आठवे उलगुलान वेध साहित्य संमेलन

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २ :**
आदिवासी साहित्य आणि संस्कृती संवर्धन संस्था, बल्लारपूर, जिल्हा चंद्रपूर आणि विदिशा विचार मंच, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आठवे आदिवासी उलगुलानवेध साहित्य संमेलन सोमवार दिनांक ७ जुलै रोजी आयोजित करण्यात आले आहे.

या संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ लेखक, समीक्षक आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती विदिशा विचार मंचच्या संस्थापक-संचालक ममता क्षेमकल्याणी यांनी दिली आहे.

या संमेलनानिमित्त ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष कोहिनूर ग्रुप, पुणेचे चेअरमन आणि कार्यकारी संचालक कृष्णकुमार गोयल असून संमेलनाचे उद्घाटन सकाळी १०.३० वाजता अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, पुणेचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी सुनीताराजे पवार, बल्लारपूर, जि. चंद्रपूर येथील आदिवासी साहित्य आणि संस्कृती संवर्धन संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. विनायक तुमराम आणि प्रसिद्ध लेखक विश्वास वसेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

दुपारी १२.३० वाजता प्रा. विश्वास वसेकर, प्रा. तुलसीदास भोयर हे आदिवासी साहित्याचे अभिवाचन करतील. दुपारी ३ वाजता 'मराठी साहित्य विश्वाच्या पटलावर आदिवासी साहित्य व साहित्यिकांचे योगदान' या विषयावर परिसंवाद होणार आहे. परिसंवादाचे अध्यक्षस्थान सुनिताराजे पवार भूषविणार असून त्यामध्ये पैठण येथील आदिवासी साहित्याचे अभ्यासक डॉ. हंसराज जाधव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. तुकाराम रोंगटे, पुणे येथील आदिवासी साहित्य अभ्यासक प्रा. डॉ. कृष्णा भवारी आणि प्रा.डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर सहभागी होणार आहेत. संमेलनाचा समारोप दुपारी ४.३० वाजता 'आदिवासी जीवन आणि निसर्ग' या कवी संमेलनाने होणार आहे.

## ठाण्यात गुजराती दुकानदाराला मनसे कार्यकर्त्यांची मारहाण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २:**
महाराष्ट्रातील ठाण्यात राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी गुजराती दुकानदाराला मारहाण केली. दुकानदाराने त्यांना फक्त मराठी बोलणे का आवश्यक आहे असे विचारले होते. त्याला उत्तर देताना कार्यकर्त्यार्ने त्याला सांगितले की हा महाराष्ट्र आहे, म्हणून येथे मराठी बोलावे लागेल.

व्हिडिओमध्ये मनसेचे अनेक कार्यकर्ते दुकानदाराला घेरून त्याच्याशी वाद घालताना दिसत आहेत. एक सदस्य दुकानदाराला म्हणतो, 'तू मला विचारले होते की मराठी का बोलावे? एक कार्यकर्ता दुकानदाराला शिवीगाळ करतो आणि त्याला इशारा देतो की त्याला या भागात व्यवसाय करू दिला जाणार नाही. नंतर मारहाण केली गेली.

## मराठा आंदोलनासंदर्भात सरकारने भूमिका स्पष्ट करावी

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २ :**
राज्यात गेल्या दोन वर्षांपासून मराठा समाजाच्या हक्कासाठी मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन पुकारले आहे. आंदोलनाबाबत राज्य सरकारची भूमिका स्पष्ट होणे आवश्यक आहे, असे मत ओबीसी एकजूट पारिषदेचे अध्यक्ष हेमंत पाटील यांनी व्यक्त केले.



यांसदर्भात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांना पत्र लिहले आहे.ऑगस्ट महिन्यात मराठा समाजाकडून केल्या जाणाऱ्या आंदोलनासंदर्भात सरकारने भूमिका स्पष्ट करावी; यासाठी त्यांना नोटीस पाठवावी, अशी विनंती त्यांनी न्यायालयाला केली आहे. २२

## राष्ट्राच्या प्रगतीसाठी विद्यार्थ्यांची भूमिका महत्वाची

प्रति कुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ यांचे प्रतिपादन



■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. २ :**
विद्यार्थी हे राष्ट्राच्या प्रगतीसाठी महत्वाची भूमिका निभवणारी व्यक्ती असतात त्यामुळे विद्यार्थ्यांची भूमिका महत्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाचे मा. प्रति-कुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ यांनी केले.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील ग्रीन कॅम्पसला उदोजी होरायझन स्कूलच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली. याप्रसंगी नाशिक येथील उदोजी होरायझन स्कूलच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. याप्रसंगी उपकुलसचिव डॉ. सुनिल फुगारे, जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे, सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रदिप आवळे, प्रा. प्रशांत शिवगुंडे, उदोजी होरायझन स्कूलचे अतुल हेडाव, श्रीमती लीना थोरात उपस्थित होते.

डॉ. मिलिंद निकुंभ यांनी सांगितले की, विद्यापीठ परिसरात पंचज्ञानेंद्रिये आधारित वृक्षांची लागवड करुन सेन्सरी गार्डन विकसित करण्यात आले आहे. पर्यावरण संतुलनासाठी विद्यापीठार्फे विविध प्रकल्प राबविण्यात येत आहे. शरिराला झोप आवश्यक असते यासाठी मानसिक शांतता मिळावी यासाठी प्रत्येकाने प्राणायम व योगअभ्यास करणे गरजेचे आहे.

विद्यापीठात उभारण्यात येणाऱ्या नक्षत्र गार्डन, आरोग्य मानव, राशी गार्डन याबाबत माहिती दिली. विद्यालयीन जीवन हे व्यक्तीच्या जीवनात शिक्षण, संस्कार व व्यक्तिमत्व विकासाठी अत्यंत महत्वाचे असते. विद्यार्थ्यांचे शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नसून, त्यांच्यात सामाजिक कौशल्य, नेतृत्वगुण आणि नैतिक मूल्ये विकसीत करणे देखील आवश्यक असते.

सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रदिप आवळे यांनी सांगितले की, आपली नियमित दिनचर्या कशी असावी आहार, प्राणायम, योगा, झोप, एकाग्रता याबाबत माहिती दिली. शिक्षणाबरोबरच, विद्यार्थ्यांना संस्कार, सुसंस्कृतता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव असायला हवी. विद्यार्थ्यांनी आपले स्वप्न साकार करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे आणि कठीण परिस्थितीतही धैर्यानें उभे राहावे, हीच यशाची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी सांगितले.

# उद्धव - राज एकत्र येणार, मविआत फुट?

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २ :**
महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या भूकंपाची शक्यता व्यक्त केली जात आहे. शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चांनी जोर धरला आहे.

दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्यास, आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडीतील काँग्रेसला स्वबळावर लढावे लागू शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी याबाबत महत्त्वाचे संकेत दिले आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीत फूट पडणार का? हा प्रश्न राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे.

**काँग्रेसची बैठक आणि नाराजी**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या नेत्यांची सोमवारी दिल्लीत बैठक झाली. मात्र या पूर्वनियोजित बैठकीला राहुल गांधी, पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे किंवा सरचिटणीस के.सी. वेणुगोपाल यांची अनुपस्थिती जाणवली.

यात प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, वर्षा गायकवाड, यशोमती ठाकूर, भाई जगताप, नाना पटोले, सतेज पाटील, पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, मुकुल वासनिक, अविनाश पांडे, रजनी पाटील यांसह अनेक नेते उपस्थित होते.



बैठकीत स्थानिक निवडणुका, संघटनात्मक मुद्दे आणि संभाव्य आघाड्यांवर चर्चा झाली. मात्र पक्षश्रेष्ठी अनुपस्थित राहिल्याने नाराजीचा सूर उमटला. एका नेत्याने, जर प्रभारी आणि प्रदेशाध्यक्षच बैठक घेणार असतील, तर ती मुंबईतही होऊ शकली असती, असा सवाल केला. बैठक कशासाठी बोलावली हेच कळलं नाही, अशी तिखट प्रतिक्रिया अन्य नेत्याने दिली.

बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी राज ठाकरे यांच्या भूमिकेला काँग्रेसचा विरोध असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी म्हटले, राज ठाकरे यांची उत्तर भारत आणि दक्षिण भारताबाबतची भूमिका आम्हाला मान्य नाही. भारत एक आहे.

या विधानामुळे, महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्वबळाची भूमिका घेणार का? हा प्रश्न उभा राहिला आहे. तसेच उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आल्यास, महाविकास आघाडीत फूट पडणार की राजकीय समीकरणे पुन्हा बदलणार? ५ जुलै रोजी उबाठा आणि मनसेच्या विजयी मेळाव्यात काय होते? यावर पुढील समिकरणे अवलंबून असणार आहेत.

# भरधाव ट्रकच्या धडकेत एक ठार, एक जखमी

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०२ जुलै**

ट्रकने दुचाकीला धडक दिली, यात दुचाकीवरील एकाचा मृत्यू झाला, तर एक गंभीर जखमी झाला, हा अपघात धोत्रा चौरस्ता येथे ३० जून रोजी दुपारी झाला, याप्रकरणी अल्लीपूर पोलिसांनी ट्रक चालकावर गुन्हा दाखल केला, वैभव शंकर महाजन (२७) रा. एकुर्ली असे जखमीचे नाव आहे, वैभव महाजन आणि शंकर महाजन हे दोघे एम. एच. ३२, एव्ही. ९६९२ क्रमांकाच्या दुचाकीने नियोजित ठिकाणी जात होते, दुचाकी धोत्रा चौरस्ता परिसरात परिसरात आली, असता एम. एच. १६, सी. सी. ७५७५ क्रमांकाच्या ट्रकने दुचाकीला जबर धडक दिली, यात वैभवला मृत्यू झाला तर शंकर गंभीर जखमी झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

प्रकरण वर्धा नदीच्या रेती चोरीचे.....!

# आमदार केचे यांचा पावसाळी अधिवेशनातील प्रश्नाचा परिणाम ; रेती माफीया सुटले आणी लहान कर्मचारी अडकले

**नरेंद्र देशमुख**
**वर्धा, दि. २जुलै**

वर्धा नदीमधील रेती चोरी करणाऱ्या माफीयांवर व अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी याकरीता आमदार दादाराव केचे यांनी पावसाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला होता मात्र याचा परिणाम उलटाच झाला. मोठे अधिकारी व रेती माफीया सुटले आणी पटवारी व कोतवालांवर कारवाईचा बडगा उगारल्या गेला. यामुळे उलट सुलट चर्चेला उधाण आले आहे.

राजकीय नेत्यांचा मिळालेला आशिर्वादाचा लाभ उचलत त्यांच्या सोबत जवळीक साधणाऱ्या माफीयांनी मोठ्या प्रमाणात खुलेआम रेती चोरी सुरू केली. नदीमधील रेती उपसा करण्याकरीता डोंग्यावर यंत्र लावले. नदी काठावरील याचे मोठमोठे ढिगारे लावण्यात आले. खुलेआम अवैधरित्या रेती विक्री सुरू केली. काही घरकुल धारकांनी याबाबतची तक्रार आमदार दादाराव केचे यांच्याकडे केली. त्यांनी भर उन्हात नदी काठावर जावुन रेतीचे ढिगारे महसूल विभागाला पकडून दिले. रेती माफीयांची नावे सुध्दा उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, ठाणेदार यांच्या पुढे उजागर केली. वृत्तपत्रात सुध्दा ती प्रसिध्द झाली. मात्र महसूल विभागाने अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करुन कारवाई थंड बस्त्यात पाडली. यामुळे संतप्त झालेल्या आमदार


रेती माफिया बोहराच्या मते... एक बायको दोन नवरे....

दादाराव केचे यांनी रेती माफीयांवर व त्याला अभय देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी या अपेक्षेने पावसाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला मात्र झाल भलतच राज्याचे महसुल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांनी याला उत्तर देतांना पटवारी व कोतवालावर निलंबनाची कारवाई करण्यात येईल असे सांगीतले आणी रेती चोरीचा प्रश्न निकाली काढण्यात आला.

**निलंबाची कारवाई सुरू, प्रकरण जिल्हाधिकारी यांच्याकडे जाणार**

राज्याचे महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशाप्रमाणे रेती चोरी प्रकरणी देऊरवाडा ग्राम महसुल अधिकारी शुभांगी डेहनकर व वाठोडा मंडळ अधिकारी किशोर चौधरी यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात येणार असुन प्रकरण जिल्हाधिकारी वर्धा यांच्याकडे पाठविण्यात येईल, अशी माहिती तहसीलदार हरिष काळे यांनी दिली आहे.

**रेती माफीयांना अभय कुणाचे**

शेतकऱ्यांच्या शेतात मोठमोठाली ढिगारे लागली. बसण्याकरीता सोफा आला. जेवणावळी उठल्या. रेती उपसा करण्याकरीता डोंग्याचा व मशीनचा वापर झाला. सहा चक्का, दहा चक्याने हजारो ब्रास रेतीची चोरटी वाहतुक झाली. शेतकऱ्याने या संदर्भात तक्रार सुध्दा केली. प्रसिध्दी माध्यमांनी रेती माफियांची नावे सुध्दा उजागर केली तरी महसूल व पोलिस विभागाने संगनमत करुन एका बड्या नेत्याच्या इशा-यावर गुन्हा दाखल केला तो अज्ञात चोरट्यांविरुध्द! प्रसिध्दी माध्यमाने त्या गुंड प्रवृत्तीच्या रेती माफियांचे नावे प्रकाशित केल्यानंतरही पोलीस त्या रेती चोरट्यांचा शोध घेवु शकले नाही याबाबत आश्चर्य व्यक्त केल्या जात असुन रेती माफीयांना अभय कुणामुळे व कुणाचे याचीच चर्चा आता आर्वीसह राज्यभर रंगू लागली आहे.


महासागर
'दैनिक महासागर' विधान परिषदेत
■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ : विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी आज मंगळवारी विधान परिषदेत दैनिक महासागरच्या प्रकर्षाने उल्लेख करण्यात आला.
विधान परिषद सदस्य दादाराव केचे यांनी सभागृहात वर्धा जिल्ह्यातील रेतीचे अवैध उत्खनन आणि विक्रीचा मुद्दा उपस्थित केला. दैनिक महासागरने या प्रकरणाला वाचा फोडत २४ मार्च रोजीच्या अंकात अनेक रेती माफियांची नावे प्रकाशित केली. मात्र, या रेती माफियांवर कारवाई झाली नसल्याचे त्यांनी सांगितले. दै. महासागरच्या वृत्ताची दखल घेत सरकारने कोणती कारवाई केली? अशा रेती चोरांवर कोणती कारवाई केली जाणार आहे? असे प्रश्न उपस्थित करीत त्यांनी रेतीचोरीला आळा घालण्याची मागणी केली.
श्री दादाराव केचे, भाजपा
02 Jul 2025 - Page 1 | epaper.dainikmahasagar.in
Powered by | softisky.com

**आलेले उत्तर सभागृहाची दिशाभुल करणारा असल्याचा आरोप : आमदार केचे**

महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या उत्तराने आमदार दादाराव केचे हे समाधानी झालेले नाही. आलेले उत्तर हे सभागृहाची दिशाभुल करणारे असुन अधिकाऱ्यांच्या माध्यमातुन बनवाबनवी केल्याचा त्यांनी सभागृहात आरोप लावला आहे. रेती माफीयांचा शोध घेवुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल अशी त्यांची अपेक्षा होती. मात्र झाल भलतच रेती माफीया सुटले आणी छोट्या कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला गेल्याची खंत यावेळी आमदार केचे यांनी वृत्तपत्र प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केली.

**आर्वीकरांच्या आलेल्या उत्तरावर संमिश्र प्रतिक्रीया**

लोकप्रतिनिधी असलेल्या रेती माफिया हुजेफा बोहराने या सर्व उठाठेवीवर आर्वीमध्ये एक बायको दोन नवरे असा उल्लेख करीत लोकनियुक्त प्रतिनिधींना आवाहन दिले. या उपर विधान परिषद सदस्य दादाराव केचे यांना खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकीसुध्दा दिली. समाज


महासागर

माध्यमांवर अब्रू नुकसानीकारक लेख प्रसिध्द करुन लोकप्रतिनिधीची समाजात बदनामी केली. याच बोहराने शिवाजी चौकातील बंद पडलेल्या जेसीबीला मद्यप्राशन अवस्थेत स्वतच गाडीला डॅश मारुन अपघाताने जखमी झाल्याचा बनाव करीत आर्वी पोलिसामध्ये विधान परिषद सदस्य दादाराव केचे यांच्या गुंडानी माझा अपघात करुन हल्ला चढविल्याची बनावट तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न झाला. एवढ्यावरच प्रकरण थांबले नसुन


राजाश्रयात आर्वीतही रेती तस्करी उजागर!
घरकुल लाभार्थी उपाशी ; रेती तस्कर तुपाशी

आर्वी पोलिसांना आलेल्या तक्रारीवर गांभीर्याने विचार करुन संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करा असा फोन करणारा तो लोकप्रतिनिधी कोण? याबाबत शहरात तर्कवितर्क सुरु झाले. या बनाव प्रकरणाने पोलिस विभागसुध्दा येथून माझी बदली कधी होईल व मला मोकळा श्वास कधी घेता येईल या विंवचनेत अडकल्याचे पोलिस विभागातील एका बड्या अधिका-याने प्रतिनिधीशी बोलताना आपबिती कथन केली. या संदर्भात विधान परिषदेमध्ये दादाराव केचे यांनी मांडलेल्या प्रस्तावावर महसूल मंत्र्यांनी सभागृहात उत्तर देताना प्रस्ताव मांडणारी व्यक्ती ही स्वपक्षातील लोकप्रतिनिधी असुन त्यांना जीवे मारण्याची धमकी, समाज माध्यमावर अब्रू नुकसानीकारक लेख व अपघात करुन हल्ला चढविल्याचा बनाव करणा-या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल का नाही, कुणाच्या इशा-यावर हुजेफा बोहरा व इतर साथीदारांना पाठीशी घालण्यात आले याबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वपक्षाच्या आमदारांना सुरक्षा पुरविण्याऐवजी चोरट्यांची बाजू घेतली या चर्चेवरुन आर्वी शहरात दुस-या एका बड्या नेत्याविरुध्द रोष व्यक्त होवू लागला.

# अंबिका सोशल फाऊंडेशनने केले शालेय साहित्य वाटप



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०२ जुलै**

अंबिका सोशल फाऊंडेशनच्यावतीने १ जुलै रोजी बोरगाव (मेघे)येथील चारही शाळेतील हजारो विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटपकरण्यात आले. समाजातील दुर्बल घटकातील तसेच आर्थिक स्थिती बेताची असलेल्यांना मदतीचा हात म्हणून अंबिका सोशल फाऊंडेशनच्यावतीने कै. आनंदराव मेघे विद्यालय , जिल्हा परिषद केंद्र शाळा गणेश नगर , जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा ग्रामपंचायत जवळ ,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टेकडी येथील हजारो विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य नोटबुक पेन, कंपासचे वाटप करण्यात आले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक संजय भस्मे, पराते, नगराळे, मुख्याध्यापिका शारदा मोटकुळे यांच्यासह सोशल फाऊंडेशनच्या अध्यक्षा अंबिका हिंगमिरे, कांचन सुखदेवे, रुपाली केळझरकर, यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# कारंजा ते भारसिंगी रस्त्याचे काम संथगतीने

**२५ जुलैपर्यंत रस्त्याचे काम सुरू झाले नाही तर नागरिक करणार उपोषण**



**महासागर प्रतिनिधी**
**कारंजा (घा.),दि. ०२जुलै**

येथील कारंजा ते भारसिंगी या राज्यमार्गाचे काम सुरु झाले असून ते अतिशय संथ गतीने सुरू आहे. ऐन पावसाळ्यात सुरु असलेल्या या कामामुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे.येत्या २५ जुलैपर्यंत रोडचे काम सुरू झाले नाही उपोषण करण्याचा इशारा नागरिकांनी आज दी. २ बुधवार ला पंचायत समितीचे माजी सदस्य टिकाराम घागरे यांच्या नेतृत्वात तहसीलदाराला दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

**नागरिकांना तहसीलच्या ठिकाणी करावी लागते ये-जा**

नारा, आजनादेवी, सावरडोह, बेलगांव, सुसुंद्रा, वाघोडा, तरोडा, काकडा, परसोडी, व इतर २० ते २५ गावातील स्त्री, पुरूष व शाळेतील मुले कारंजा हे तहसिलचे ठिकाण असल्यामुळे गावातील लोकांना व मुलांना दररोज कारंजा (घा.) येथे जाणे-येणे करा लागते.

मे महिण्या पासुन कारंजा ते वाघोडा गावापर्यंत रोड खोदुन ठेवला आहे. पण पावसाळा लागुन सुध्दा रोडचे कोणतेच काम प्रगतीपथावर नाही रोड कुठे खोदला आहे. तर कुठे मुरूम टाकुन ठेवली आहे. त्यामुळे पावसाळ्यात रोडवर कमीत कमी २० ते ३० मोटार सायकल मोठ्या गाड्या स्लिप होणे, मोटार सायकल घसरून पडने, गाड्या एकमेकांना भिडणे असा प्रकार रोडवर दररोज सुरू आहे. दररोज २० ते २५ मोटार सायकल घसरून पडतात व अपघात होतात, मार लागणे,अपघात होणे असे प्रकार वाढलेले आहे.जर येत्या २५ जुलै पर्यंत रोडचे काम सुरू झाले नाही तर गावकरी नागरिक यांच्यासह उपोषण करण्यात येईल असा इशारा आज निवेदनातून देण्यात आला आहे. जर कोणाची जिवित हाणी झाली तर त्याला हे काम करत असलेले ठेकेदार स्वतः जबाबदार राहील.असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे निवेदनाच्या प्रति जिल्हाधिकारी वान्मथी सी, खासदार अमर काळे, आमदार सुमित वानखेडे, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यकार्यकारी यांना पाठविण्यात आल्या आहे.यावेळी परिसरातील गावातील नागरिक उपस्थित होते.

# कायद्यांमुळेच वाघ आणि त्यांचा अधिवास सुरक्षित - डॉ. वडतकर

**बहार नेचर फाउंडेशनच्या वर्धापन दिनी व्याख्यान**



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा,दि. ०२जुलै**

यादेशात व्याघ्रसंवर्धनाचा पाया माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी रचला. त्यांच्या काळात झालेल्या कायद्यांमुळेच आजही वाघ आणि वाघांचा अधिवास सुरक्षित आहे. याच कायद्यांच्या आधारे पर्यावरणप्रेमी कार्यकर्त्यांनी वेळोवेळी आवाज उठविला आणि अभयारण्ये वाचविली, असे प्रतिपादन महाराष्ट्र पक्षिमित्र संस्थेचे अध्यक्ष व अमरावती जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक डॉ. जयंत वडतकर यांनी बहार नेचर फाऊंडेशनच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत केले.

स्थानिक निसर्ग सेवा समितीच्या ऑक्सिजन पार्क येथे आयोजित या कार्यक्रमात डॉ. वडतकर यांनी 'वाघांचे संवर्धन आणि सद्यःस्थिती' या विषयाची अभ्यासपूर्ण सचित्र मांडणी केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहार नेचर फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. बाबाजी घेवडे होते.

यावेळी जिल्हा उपवनसंरक्षक हरवीर सिंह, निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष वृक्षमित्र मुरलीधर बेलखोडे, जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक तथा बहारचे उपाध्यक्ष संजय इंगळे तिगावकर, संस्थापक अध्यक्ष प्रा. किशोर वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वातंत्र्योत्तर काळात वने आणि वन्यजीव यांच्या संरक्षणासाठी झालेल्या वाटचालीचा मागोवा घेताना डॉ. जयंत वडतकर म्हणाले, एकीकडे संविधानाची निर्मिती होत असतानाच १९५२ मध्ये वन्यजीव मंडळाची स्थापना करण्यात आली होती. या मंडळाचे अधिकारक्षेत्र व्यापक करण्यासाठी १९७२ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी वन्यजीव संरक्षण कायदा लागू केला. त्यांच्याच कारकिर्दीत १९७३ साली जिम कार्बेट हा पहिला व्याघ्र प्रकल्प देशात कार्यान्वित झाला. तर, १९८० मध्ये त्यांनी पर्यावरण संरक्षण अधिनियम अंमलात आणला. या कायद्यांमुळे जल, जमीन, जंगल आणि एकूणच पर्यावरणाच्या संरक्षणाची आपली लढाई टिकून आहे. कायद्यामुळेच राजस्थान मधील सरिस्का तसेच मेळघाट येथील वाघांच्या शिकारींवर नियंत्रण मिळविता आले. पन्ना व्याघ्र प्रकल्पातील हिऱ्यांच्या खाणीमुळे आणि तेथील डायमंड लॉबीमुळे वाघ संपुष्टात आला होता. खाण व्यावसायिकांनी जाणीवपूर्वक अभयारण्यातील वाघ संपवले. कारण वाघ संपले तर वनांचा संरक्षित दर्जा काढला जाईल आणि आपल्या खाणींचा विस्तार करता येईल, ही भांडवलदारी भूमिका त्यामागे असते. जागृत कार्यकर्त्यांमुळे २००९ मध्ये पन्ना व्याघ्र प्रकल्पात पुन्हा वाघ आणि वाघांचा अधिवास वाढला. पर्यावरणप्रेमी कार्यकर्त्यांनी उठवलेला आवाज आणि सरकारने उचललेली सकारात्मक पावले, यामुळे हे कार्य आजतागायत होऊ शकले, डॉ. वडतकर यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबाजी घेवडे यांनी बहारच्या दहा वर्षातील वाटचालीचा मागोवा घेतला. मुरलीधर बेलखोडे यांनी यावेळी वृक्षांचे महत्त्व प्रतिपादित केले. तर, उपवनसंरक्षक हरवीर सिंह यांनी मानव वन्यजीव संघर्ष आणि वनकायद्यांमध्ये झालेल्या नव्या प्रगत सुधारणांची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय इंगळे तिगावकर यांनी केले. अतिथींचा परिचय जीवशास्त्रज्ञ दर्शन दुधाने यांनी करून दिला. संचालन बहारचे सचिव जयंत सबाने यांनी केले व उपाध्यक्ष दीपक गुढेकर यांनी आभार मानले. व्याख्यानापूर्वी अतिथींच्या हस्ते परिसरात वृक्षारोपण करून अरण्यऋषी पद्मश्री मारुती चित्तमपल्ली यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

या आयोजनात बहारचे कोषाध्यक्ष राजदीप राठोड, सहसचिव देवर्षी बोबडे, डॉ. आरती प्रांजळे घुसे, सल्लागार अतुल शर्मा यांच्यासह वनविभागातील अधिकारी व कर्मचारी वृंदाचे सहकार्य लाभले. निसर्गरम्य परिसरात आयोजित या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने सुजाण नागरिकांची व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# जिल्ह्यात ९० दिवस राष्ट्रासाठी मध्यस्थी विशेष मोहिम

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धादि. ०२जुलै**

न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांचा जलद निकाल, न्यायप्रक्रियेवरील ताण कमी करणे व पक्षकारांना परस्पर समजुतीने न्याय मिळवून देण्यासाठी जिल्ह्यात दि. १ जुलै पासुन ९० दिवस राष्ट्रासाठी मध्यस्थी विशेष मध्यस्थी मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा न्यायालयामध्ये ज्या पक्षकारांचे प्रकरण प्रलंबित आहेत, त्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारुका यांनी केले आहे.

राष्ट्रासाठी मध्यस्थी या विशेष मध्यस्थी मोहिमेची संकल्पना राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व सर्वोच्च न्यायालयाच्या मध्यस्थी व सलोखा प्रकल्प समितीने संयुक्तपणे केली आहे. सरन्यायाधीश भुषण गवई व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष तथा मध्यस्थी व सलोखा प्रकल्प समितीचे अध्यक्ष न्यायमूर्ती सुर्यकांत यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहिम संपूर्ण भारतात राबविण्यात येत आहे.

जिल्ह्यात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारुका यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा न्यायिक जिल्हा राष्ट्रासाठी मध्यस्थी ही विशेष मध्यस्थी मोहिम दि. १ जुलैपासून प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. मोहिमेमध्ये न्यायालयात प्रलंबित असलेले वैवाहीक वाद, अपघात भरपाई प्रकरणे, कौटूंबिक हिंसाचार प्रकरणे, धनादेश न भरण्याचे प्रकरणे, व्यावसायिक वाद प्रकरणे, सेवाविषयक वाद प्रकरणे, तडजोड पात्र फौजदारी प्रकरणे, ग्राहक तक्रार मंचाकडील प्रकरणे, कर्जवसुली प्रकरणे, जमीन मालमत्ता वाटप प्रकरणे, घरमालक व भाडेकरु वाद प्रकरणे, जमीन संपादन प्रकरणे तसेच इतर नागरी प्रकरणे मध्यस्थीसाठी ठेवले जावू शकतात.विशेष मध्यस्थी मोहिम दररोज पक्षकारांच्या सोयीनुसार होणार असून ऑनलाईन, ऑफलाईन व हायब्रिड पध्दतीचा वापर करुन केली जाणार आहे. या मध्यस्थी प्रक्रियेमध्ये ४० तास प्रशिक्षण घेतलेले सर्व मध्यस्थी सहभागी होणार आहे, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्यावतीने कळविण्यात आले आहे.

**मध्य रेल्वे**
निविदा सूचना क्रमांक एनजीपी/सी/सीपी/ई-लिलाव/प्रकाशन/२०२५-१२
तारीख: ०१.०७.२०२५
कॅटलॉग क्रमांक: एनजीपी-एडीवीटी-२५-०६. १. एडीवीटी-एनजीपी-एनजीपी-ओएच-१९८-२४-१/गॅन्ट्री एफसी गणेश टेकडी (एस-११ आकार 40X10) वर ६ महिन्यांच्या कालावधीसाठी थेट होर्डिंग मीडियाद्वारे जाहिरात. २२.०७.२५ रोजी १५:००:०० वाजता सुरू / २२.०७.२५ रोजी १५:३०:०० वाजता समाप्त २. एडीवीटी-एनजीपी-अजनी -ओएच-१७०-२४-१/ वंजारी नगर उड्डाणपुलाच्या मध्यभागी तुकडोजी पुतळा चौकाकडे असलेल्या होर्डिंग मीडियावरून ५ वर्षांच्या कालावधीसाठी जाहिरात. (साइट एन-०१-30X20-600 चौ. फूट) २२.०७.२५ रोजी १५:००:०० वाजता सुरू / २२.०७.२५ रोजी १५:४०:०० वाजता समाप्त ३. एडीवीटी-एनजीपी-अजनी -ओएच-१९२-२४-१/ जाहिरात वंजारी नगर टी पॉइंट, तुकडोजी पुतळा चौकाच्या समोर ५ वर्षांच्या कालावधीसाठी होर्डिंग मीडियाद्वारे. (साइट क्र. एस-२६-४०० चौ.फूट - 20X20). २२.०७.२५ रोजी १५:००:०० वाजता सुरू / २२.०७.२५ रोजी १५:५०:०० वाजता समाप्त ४. एडीवीटी-एनजीपी-बीझेडयु-ओएसएन-१८४-२४-१/ बैतुल रेल्वे स्थानकावरील साइनबोर्ड मीडियाद्वारे ५ वर्षांच्या कालावधीसाठी जाहिरात. (३५०० चौरस फूट). २२.०७.२५ रोजी १५:००:०० वाजता सुरू / २२.०७.२५ रोजी १६:००:०० वाजता समाप्त ५. सेवाग्राम रेल्वे स्थानकावरील साइन बोर्डद्वारे ३ वर्षांच्या कालावधीसाठी एडीवीटी-एनजीपी-एसईजीएम-ओएसएन-१६२-२३-३/जाहिरातीचे अधिकार. (एकूण २१२७ चौरस फूट मीडिया). २२.०७.२५ रोजी १५:००:०० वाजता सुरू / २२.०७.२५ रोजी १६:१०:०० वाजता समाप्त ६. धामणगाव रेल्वे स्थानकावरील साइन बोर्डद्वारे ३ वर्षांच्या कालावधीसाठी एडीवीटी-एनजीपी-डीएमएन-ओएसएन-१५९-२३-२/जाहिरात. (एकूण १५८० चौरस फूट मीडिया). २२.०७.२५ रोजी १५:००:०० वाजता सुरू / २२.०७.२५ रोजी १६:२०:०० वाजता समाप्त. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.
एसीएम (जनरल अँड कॅटग)/नागपूर
अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है NGP-108

# प्लास्टिक प्रदूषणामुळे समस्त जीवसृष्टीवर संकट

**(आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिन विशेष ३ जुलै २०२५)**

जगात करण्यात आलेले सर्व शोध मानवजातीच्या विकासासाठी केले गेले, पण मानवाने आपल्या गरजांच्या मर्यादा तोडल्या आणि आपल्या स्वार्थ, लालसेप्रमाणे वागू लागले, परिणामी स्वतःसाठी तसेच संपूर्ण जगासाठी विनाशाचा रणशिंग फुंकला. असेच प्लास्टिक प्रदूषण आज आपल्या पृथ्वीसाठी एक मोठी समस्या बनले आहे. जमीन असो, आकाश, पाणी किंवा हवा असो, संपूर्ण वातावरणात प्लास्टिक प्रदूषणाने जीवनाला धोका निर्माण केला आहे आणि हा धोका वेगाने प्राणघातक पातळीवर वाढत आहे, तरीही लोक हे समजून घेण्यास तयार नाहीत. आपण अनेकदा पाहतो की विशिष्ट प्लास्टिक पिशव्या आणि इतर प्लास्टिक साहित्यांवर बंदी असूनही, त्यांचा वापर बेकायदेशीरपणे केला जात आहे. प्लास्टिक प्रदूषण जीवनचक्र विस्कळीत करून फार नुकसान करत आहे. या समस्येचे गांभीर्य समजून घेण्यासाठी, दरवर्षी ३ जुलै रोजी आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिन साजरा केला जातो.

---------------

या वर्षी २०२५ ची थीम एकदा वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर कमी करा आणि शाश्वत पर्यायांना प्रोत्साहन द्या आहे. ही थीम डिस्पोजेबल प्लास्टिक पिशव्यांची समस्या संपवण्याच्या गरजेवर भर देते आणि पुन्हा वापरता येण्याजोग्या पर्यायांचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करते. प्लास्टिक प्रदूषणाच्या पर्यावरणीय परिणामांबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि प्लास्टिकमुक्त भविष्यासाठी कृती करण्यास प्रेरणा देणे हे देखील या मोहिमेचे उद्दिष्ट आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमानुसार, दरवर्षी ४६० दशलक्ष मेट्रिक टनांपेक्षा जास्त प्लास्टिकचे उत्पादन होते. बांधकामापासून वाहनांपर्यंत, इलेक्ट्रॉनिक्स ते शेतीपर्यंत, जवळजवळ सर्व औद्योगिक उपक्रमांमध्ये आणि सर्व ग्राहकांद्वारे प्लास्टिकचा वापर केला जातो. २०१९ मध्ये पर्यावरणातील एकूण जागतिक प्लास्टिक कचऱ्यापैकी ८८ टक्के, किंवा अंदाजे २० दशलक्ष मेट्रिक टन, मॅक्रोप्लास्टिक्स होते, जे सर्व परिसंस्थांना प्रदूषित करतात.

जगातील बहुतेक प्लास्टिक प्रदूषण हे बाटल्या, टोप्या, शॉपिंग बॅग, कप, स्ट्रॉ यासारख्या एकदा वापरल्या जाणाऱ्या उत्पादनांमधून होते. दररोज २००० ट्रक प्लास्टिक कचरा जगातील महासागर, नद्या आणि तलावांमध्ये टाकला जातो. यूएनईपी २०२५ नुसार, आतापर्यंत उत्पादित झालेल्या प्लास्टिकपैकी फक्त ९ टक्के प्लास्टिकचा पुनर्वापर म्हणजे रिसायकल करण्यात आला आहे.

ईएमएफ २०१६ नुसार, २०५० पर्यंत समुद्रात माशांपेक्षा जास्त प्लास्टिक असू शकते. यूके सरकारच्या २०१८ च्या अहवालानुसार, सागरी प्लास्टिक प्रदूषणामुळे दरवर्षी १,००,००० हून अधिक सागरी सस्तन प्राणी आणि दहा लाख समुद्री पक्षी मृत्युमुखी पडतात. सर्व समुद्री कचऱ्यापैकी ८० टक्के हे प्लास्टिक आहे. प्लास्टिक हा एक न विघटनशील कचरा आहे जो हजार वर्षांपर्यंत टिकू शकतो.

१९५० पासून जगभरात ९.२ अब्ज टनांपेक्षा जास्त प्लास्टिक तयार झाले आहे, त्यापैकी सुमारे ७ अब्ज टन कचरा म्हणून टाकून देण्यात आला आहे. गेल्या चार दशकांत जागतिक प्लास्टिक कचऱ्याचे उत्पादन सात पटीने वाढले आहे असे स्टेटिस्टा दाखवते. आशिया हा असा प्रदेश आहे जो सर्वात जास्त अनियंत्रित प्लास्टिक कचरा निर्माण करतो, जो जागतिक एकूण कचऱ्यापैकी ६५ टक्के आहे.

आपल्या अन्नातून, पिण्याच्या पाण्यातून आणि श्वास घेत असलेल्या ऑक्सिजनमधूनही प्लास्टिकचे प्रदूषण आपल्या शरीरात प्रवेश करते. सौर किरणे, वारा, प्रवाह आणि इतर नैसर्गिक घटकांमुळे प्लास्टिकचे सूक्ष्म प्लास्टिक आणि नॅनोप्लास्टिक्समध्ये विघटन होते. नॅनोप्लास्टिक्स शरीरात सहजपणे प्रवेश करू शकतात.

आपल्या हृदयात, फुफ्फुसात, यकृतात, प्लीहामध्ये, मूत्रपिंडात आणि मेंदूमध्येही सूक्ष्म प्लास्टिक आढळले आहे आणि अलीकडील एका अभ्यासात नवजात मुलांच्या प्लेसेंटामध्ये सूक्ष्म प्लास्टिक आढळून आले आहे. प्लास्टिकमधून बाहेर पडणारी किमान ४,२१९ रसायने चिंतेचा विषय आहेत.

समुद्रात २४ ट्रिलियन सूक्ष्म प्लास्टिकच्या तुकड्यांसह, सागरी जीव बहुतेकदा प्लास्टिकचे सेवन करतात. जेव्हा मानव सागरी जीव खातात तेव्हा ते प्लास्टिक मानवी शरीरात प्रवेश करते. संशोधकांचा अंदाज आहे की सरासरी व्यक्ती दरवर्षी समुद्री खाद्यपदार्थांमधून सुमारे ५३,८६४ सूक्ष्म प्लास्टिक कण खातो.



डॉ. प्रितम भी. गेडाम
८२३७४ १७०४१
prit00786@gmail.com

भारतात दरडोई प्लास्टिकचा वापर दरवर्षी अंदाजे ११ किलोपर्यंत वाढला आहे आणि तो वाढतच राहण्याची शक्यता आहे. दरवर्षी ५.८ दशलक्ष टनांहून अधिक प्लास्टिक कचरा जाळला जातो, ज्यामुळे हवेत डायऑक्सिनसह अनेक हानिकारक प्रदूषक सोडले जातात, ज्यामुळे श्वसनाचे आजार होतात आणि कर्करोगाचा धोका वाढतो.

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीनुसार, प्लास्टिक कचऱ्याचे योग्य संकलन न केल्यास २०३० पर्यंत भारताला १३३ अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त भौतिक मूल्याचे नुकसान होऊ शकते. नेचरमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासातून असे दिसून आले आहे की, भारत प्लास्टिक प्रदूषणात जगातील सर्वात मोठा वाटा देणारा देश बनला आहे, जो एकूण जागतिक प्लास्टिक कचऱ्याच्या जवळपास २० टक्के आहे. भारत दरवर्षी ९.३ दशलक्ष टन प्लास्टिक कचरा निर्माण करतो, जो पर्यावरण प्रदूषणाच्या बाबतीत जगातील इतर कोणत्याही प्रदेशापेक्षा जास्त आहे. भारताचा अधिकृत कचरा संकलन दर ९५ टक्के आहे, तर संशोधनातून असे दिसून आले आहे की प्रत्यक्ष दर ८१ टक्के आहे.

अलीकडील आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, भारतातील दररोजच्या प्लास्टिक कचऱ्यापैकी फक्त ८-१० टक्के रिसायकल केला जातो, उर्वरित जाळला जातो किंवा लँडफिल आणि जलमार्गांमध्ये टाकला जातो.

प्लास्टिक पिशव्यांमुळे प्राण्यांचा मृत्यू होतो, ते जैविकरित्या विघटित होत नाहीत, प्लास्टिक पिशव्या पेट्रोलियम उत्पादनांपासून बनवल्या जातात, त्यांच्या उत्पादनादरम्यान विषारी रसायने सोडली जातात. प्लास्टिक अन्न साठवणुकीच्या पॅकेजेसमध्ये विषारी रसायने असतात. प्लास्टिक पिशव्यांचे मोठे संचय अनेकदा ड्रेनेज सिस्टममध्ये अडथळा आणतात.

प्लास्टिक पिशव्यांमुळे मुलांमध्ये फुफ्फुसांच्या गुंतागुंतीचा धोका वाढतो आणि महिलांमध्ये प्रजनन क्षमतेवर परिणाम होऊ शकतो, तसेच प्लास्टिकमुळे पुरुषांमध्ये प्रोस्टेट कर्करोगाचा धोका देखील वाढू शकतो. प्लास्टिक पिशव्या भूजल प्रदूषित करतात, प्लास्टिक प्रदूषणामुळे नैसर्गिक अन्नसाखळी विस्कळीत होते. प्लास्टिक पिशव्यांच्या उत्पादनात भरपूर पाणी वापरले जाते.

अज्ञान म्हणा किंवा निष्काळजीपणा, लोक गरम अन्नपदार्थ पॅक करण्यासाठी प्लास्टिकच्या कॅरी बॅगचा वापर करतात. आपण आपल्या आजूबाजूला पाहतो की लोक लहान-लहान कॅरी बॅगमध्ये गरम पेये, चहा, कॉफी घेऊन जातात.

अनेक हॉटेल, रेस्टॉरंट किंवा रस्त्यावर स्ट्रीट फूड, नाश्ता, अन्न देखील प्लास्टिकच्या प्लेटमध्ये खाल्ले जाते किंवा प्लास्टिकच्या कॅरी बॅग पार्सल म्हणून वापरल्या जातात, जे आरोग्यासाठी खूप हानिकारक आहे.

प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये गरम अन्न किंवा खाद्य ठेवणे हे विषासारखे आहे, कारण गरम अन्नपदार्थ प्लास्टिकच्या संपर्कात येताच रासायनिक प्रक्रिया सुरू करतात. प्लास्टिक गरम होताच, त्यातून बाहेर पडणारे हानिकारक रसायने अन्नपदार्थांमध्ये शोषले जातात आणि ते अन्न सेवन करून माणूस थेट प्राणघातक आजारांना आमंत्रण देतो. हे माहित असूनही, देशात अन्नपदार्थांसाठी प्लास्टिकचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो.

ग्राहकांच्या मागणी पूर्ण करण्यासाठी प्लास्टिकचे उत्पादन केले जाते, जर आपण ग्राहक प्लास्टिकपासून दूर राहिलो तर ही समस्या बऱ्याच प्रमाणात दूर होऊ शकते. प्लास्टिकला इतर पर्यायांचा अवलंब, पर्यावरण वाचवण्यासाठी जागरूकता आणि आपली प्रबळ इच्छाशक्ती आवश्यक आहे.

सर्वप्रथम, आपला स्वार्थ आणि आळस सोडून द्या, सरकारी धोरणे आणि नियमांचे काटेकोरपणे पालन करा. मग प्लास्टिकला शक्य असलेले पर्याय स्वीकारा. वापरा आणि फेकून द्या सारख्या वस्तूंना नाही म्हणा. प्लास्टिकच्या पिशव्या पूर्णपणे विसरून जा, अन्नपदार्थांच्या पॅकेजिंगमध्ये प्लास्टिक वापरणे टाळा.

आज प्लास्टिक ही सोय आहे पण आयुष्यभरासाठी धोका आहे, हे समजून घ्या. पर्यावरण आपल्याला चांगले जीवन देण्यासाठी आहे, जर आपण आपले पर्यावरण नष्ट केले तर पर्यावरण आपल्याला देखील नष्ट करेल. याचे गांभीर्य समजून घ्या आणि जागरूक नागरिकाचे कर्तव्य बजावा.

■ ■ ■

# आणीबाणीच्या आठवणी!

आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १८ जानेवारी १९७७ रोजी अचानकपणे लोकसभा निवडणुकांची घोषणा केली. त्यांचा हा निर्णय सर्वांनाच आश्चर्यचकित करणारा होता.

त्यांनी आणीबाणी जारी केली तेंव्हा देशातील जनतेला जो धक्का बसला होता, त्यापेक्षा जास्त धक्का त्यांनी लोकसभा निवडणुकांची घोषणा केल्यानंतर देशातील जनतेला बसला.विरोधी पक्षाच्या नेत्यांचा तर त्यावर विश्वासच बसला नव्हता.

तुरूंगात असलेल्या विरोधी पक्षाच्या काही नेत्यांनी इंदिरा गांधी यांचे रेडिओ वरील भाषण ऐकले नव्हते, त्यामुळे तुरूंगाचे दरवाजे उघडून त्यांची जेंव्हा सुटका झाली तेव्हा त्यांना आश्चर्याचा सुखद धक्का बसला.



**अभय गोखले**

इतकेच नव्हे तर इंदिरा गांधी यांच्या काही सहकाऱ्यांनाही त्याची माहिती नव्हती, त्यामुळे तेही आश्चर्यचकित झाले. फेब्रुवारी १९७७ मध्ये जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीच्या रामलीला मैदानात विरोधी पक्षांची जी सभा झाली तीला उपस्थित असलेला प्रचंड जनसमुदाय पाहता, लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे काय होणार याचा अंदाज सर्वांनाच आला होता.

२ फेब्रुवारी १९७७ रोजी इंदिरा गांधी यांना आणखी एक धक्का बसला.इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळातील त्यांचे निकटचे सहकारी जगजीवन राम यांनी अचानकपणे आपल्या मंत्रिपदाचा तसेच पक्षाचा राजीनामा देऊन इंदिरा गांधी यांना अनपेक्षित धक्का दिला. त्यांच्याबरोबरच उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री हेमवतीनंदन बहुगुणा आणि ओरिसाच्या माजी मुख्यमंत्री नंदिनी सत्पथी यांनी पक्षाचा त्याग केला.त्यांच्या पक्षत्यागामुळे वारे कोणत्या दिशेने वाहत आहेत याचा अंदाज सर्वांना आला.

काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर वरील नेत्यांनी ' काँग्रेस फॉर डेमॉक्रसी ' या पक्षाची स्थापना केली आणि आपला पक्ष जनता पक्षाबरोबर आघाडी करणार असल्याचे जाहीर केले.

या पार्श्वभूमीवर लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा दारुण पराभव होणार हे मतदानाअगोदरच निश्चित झाले होते. २० मार्च १९७७ रोजी जेंव्हा निवडणुकीचे निकाल बाहेर येऊ लागले तेंव्हा पहिल्या तासातच काँग्रेसचा मोठा पराभव होणार याचा अंदाज आला.

दक्षिण भारताने काँग्रेसची लाज राखली, मात्र उत्तर भारतात काँग्रेसचा पुर्णपणे सफाया झाला. उत्तर भारतात काँग्रेसला एकही जागा जिंकता आली नाही. इंदिरा गांधी यांचा रायबरेलीतून तर संजय गांधींचा अमेठीतून पराभव झाला.

इंदिरा गांधी यांचे विशेष सहाय्यक मोहंमद युनूस यांनी आपल्या 'परसन्स पॅशन्स आणि पोलिटिक्स 'या आपल्या पुस्तकात इंदिरा गांधी यांचा निवडणुकीत पराभव झाल्यानंतरचा घटनाक्रम मोठ्या रोचकतेने मांडला आहे.

इंदिरा गांधी या त्यांच्या रायबरेली मतदार संघातून निवडणूक हरत असल्याचे संकेत १९ मार्च रोजी दुपारी चार वाजता मिळाले होते.

एका बातमी नुसार इंदिरा गांधी या त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी राजनारायण यांच्या बऱ्याच मागे पडत चालल्या होत्या. ही बातमी पंतप्रधानांचे खाजगी सचिव धवन यांनी पंतप्रधानांच्या निवासातील एका खोलीत येऊन सांगितली. त्यावेळी त्या खोलीत इंदिरा गांधी, मोहंमद युनूस आणि इंदिरा गांधी यांची नातवंडे बसले होते

मोहंमद युनूस लिहितात की, आम्हाला ती बातमी ऐकून आश्चर्याचा धक्काच बसला.परंतु त्याही परिस्थितीत न डगमगता इंदिरा गांधी यांनी धवन यांना सांगितले की, त्यांनी रायबरेली येथे फोन करून तिथे नक्की काय परिस्थिती आहे हे जाणून घ्यावे. रात्री आठ वाजता इंदिरा गांधी या मोठ्या मताधिक्याने हरणार हे नक्की झाले, तेंव्हा मोहंमद युनूस हे तिथेच होते. इतक्या वर्षांचा इतिहास त्यांच्या डोळ्यासमोर आला. युनूस पुढे लिहितात की इंदिरा गांधी यांनी माझ्याकडे पाहून स्मितहास्य केले आणि म्हणाल्या, तू राजकारणात नसल्यामुळे तुला आता हायसे वाटत असेल.

तेवढ्यात एक सामाजिक कार्यकर्त्या आणि पंतप्रधानांच्या कुटुंबाशी निकटचे संबंध असलेल्या, पुपूल जयकर आत आल्या. त्या खूपच खचलेल्या वाटत होत्या. इंदिरा गांधी यांनी त्यांची समजूत काढत म्हटलं की, असं कधी कधी घडतं. तू खचून जाऊ नकोस. त्यावर डोळ्यात पाणी आणून पुपूल जयकर उत्तरल्या की, इंदू ,ते ठीक आहे, पण ते तुझ्या बाबतीत घडायला नको होतं.

युनूस यांनी पुढे लिहिले आहे की, त्यानंतर आम्ही ड्रॉइंग रुममध्ये त्याबाबत काही काळ चर्चा केली. नंतर सोनिया गांधी आम्हाला डायनिंग रूमकडे घेऊन गेल्या. तेथे इंदिरा गांधी या स्वस्थपणे जेवत होत्या. इतरांचे मात्र जेवणाकडे लक्ष नव्हते.

इंदिरा गांधी या मनातल्या मनात पुढील हालचालींचा विचार करत असाव्यात. रात्री साडेदहा वाजता केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक बोलावण्यात आली. त्या बैठकीत आणीबाणी उठवण्यात आली. बैठक मध्यरात्री संपली. तो पर्यंत इंदिरा गांधी यांच्या निवडणुकीतील पराभवावर शिक्कामोर्तब झाले होते.

रात्री अकरा वाजता संजय गांधी आणि त्यांची पत्नी मनेका गांधी हे अमेठीहून परत आले. मध्यरात्री राजकारणी लोक आपापल्या घरी परतले.

मात्र रात्री दोन वाजता इंदिरा गांधी यांच्या भोवती कॅबिनेट सेक्रेटरी, होम सेक्रेटरी आणि इतर खासगी सचिवांचा घोळका कायम होता. त्या पटापट कागदपत्रांवर सह्या करत होत्या, चर्चा करत होत्या, अधिकाऱ्यांशी बोलत होत्या, मध्येच आपल्या कुटुंबातील व्यक्तींशी बोलत होत्या. निवडणूक हरल्यामुळे निर्माण होणाऱ्या निराशेचा लवलेशही त्यांच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता.

मोहंमद युनूस जेंव्हा पहाटे परत इंदिरा गांधी यांच्या निवासस्थानी गेले तेंव्हा त्यांनी पाहिले की घरातील सर्वजण अगोदरच उठून सामानाची बांधाबांध करत होते.इंदिरा गांधी यांनी घरातील सर्वांना सक्त सूचना दिल्या होत्या की आपण आता इथे एक क्षणही राहणे इष्ट ठरणार नाही. १२, विलिंग्डन क्रिसेंट हे निवासस्थान इंदिरा गांधी यांना उपलब्ध करून देण्यात आले होते.या नवीन जागेत सुध्दा इंदिरा गांधी यांना भेटण्यासाठी रोज बरेच लोक येत असत.

■ ■ ■

# अंतराळात भारताची लष्करी शक्ती

ऑपरेशन सिंदूर नंतर, भारत आता अंतराळात आपली लष्करी शक्ती आणखी मजबूत करणार आहे. सरकारने निर्णय घेतला आहे की २०२९ पर्यंत (पुढील ४ वर्षांत) ५२ विशेष संरक्षण उपग्रह अवकाशात पाठवले जातील, हे सर्व उपग्रह अंतराळात भारताचे डोळे बनतील आणि पाकिस्तान-चीन सीमेवर सतत लक्ष ठेवतील.

हे उपग्रह कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित असतील. ते ३६ हजार किमी उंचीवरून एकमेकांशी संवाद साधू शकतील. यामुळे पृथ्वीवर सिग्नल, संदेश आणि चित्रे पाठवणे सोपे होईल.

हे संपूर्ण अभियान संरक्षण अंतराळ संस्थेच्या अंतर्गत चालवले जात आहे आणि यासाठी सरकारने 'अंतराळ-आधारित देखरेख फेज-३' (SBS-t) योजना तयार केली आहे. यासाठी २६,९६८ कोटींचे बजेट आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीने याला मान्यता दिली.

या योजनेअंतर्गत, इस्रो २१ उपग्रहांची निर्मिती आणि प्रक्षेपण करेल, तर ३१ उपग्रह तीन खासगी भारतीय कंपन्या तयार करतील. पहिला उपग्रह एप्रिल २०२६ पर्यंत प्रक्षेपित केला जाईल, परंतु अंतिम मुदत आणखी कमी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. हे उपग्रह लो-अर्थ ऑर्बिट आणि जिओस्टेशनरी ऑर्बिटमध्ये तैनात केले जातील.

एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मते, एसबीएस-३ चा उद्देश पाकिस्तान, चीन आणि हिंद महासागर प्रदेश अधिक तपशीलवार कव्हर करणे आहे, ज्यामुळे कमी वेळेत उच्च-रिझोल्यूशन देखरेख शक्य होईल.

**HAPS विमानांमुळे ताकदही वाढेल**

इस्रोच्या उपग्रहांव्यतिरिक्त, हवाई दल तीन हाय-अल्टिट्यूड प्लॅटफॉर्म सिस्टम (HAPS) विमाने खरेदी करण्याची योजना आखत आहे. ही ड्रोनसारखी मानवरहित विमाने असतील, जी दीर्घकाळ उंचावर उड्डाण करून देखरेख करण्यास मदत करतील. यामुळे उपग्रहांच्या देखरेखीची क्षमता बळकट होईल.

■ ■ ■




# लेकरांची 'विठूमाऊली'



'श्री विठ्ठल' अवघ्या महाराष्ट्राचे लाडके दैवत. श्री विठ्ठलाचे भक्त म्हणजेच वारकरी विठ्ठलाला 'माउली' संबोधतात. आई ज्याप्रमाणे बाळाच्या सर्व इच्छा पुरवते, त्याचे लाड करते आणि त्याची काळजीही घेते त्याप्रमाणे विठूमाऊली तिच्या भक्तांच्या समस्त इच्छा पुरवते. भक्तांवर येणारी संकटे परतवून लावते, प्रसंगी भक्ताच्या घरी जाऊन त्याची सेवाही करते. माऊलीच्या अशाच एका भक्ताची कथा संक्षिप्त स्वरूपात आज पाहणार आहोत.

निस्सीम भक्ती आणि पराकोटीच्या भावामुळे साक्षात विठ्ठलालाच बोलावून बंधनमुक्त करण्यास भाग पाडणाऱ्या संत सखुबाई वारकरी संप्रदायाच्या इतिहासात कायमच्या अजरामर झाल्या. कृष्णा नदीच्या काठावर कऱ्हाड या ठिकाणी पती आणि सासू-सासऱ्यांसह राहणाऱ्या सखुबाई भगवंताच्या भक्तीमध्ये सदैव लीन राहायच्या.

सखूबाईंचे पती, सासू आणि सासरे या तिघांनाही सखूबाईची भगवत भक्ती रुचत नव्हती त्यामुळे ते तिघेही तिचा पुष्कळ छळ करत; मात्र या छळाला भगवंताची देणगी मानून त्या सर्व काही सहन करत असत. एकदा कृष्णा नदीकाठी सखू पाणी भरण्यासाठी गेल्या असता त्यांना पंढरीकडे निघालेली दिंडी दिसली.

विठ्ठल दर्शनाच्या ओढीने त्याही दिंडीत सहभागी झाल्या. याविषयी त्यांच्या घरी कळताच त्यांच्या पतीने त्यांना मारहाण करत घरी आणले आणि घरात एका खुंटीला बांधून ठेवले. पंढरपूर यात्रा संपेपर्यंत त्यांना बांधून ठेवायचे, दोन सप्ताह काहीच खायला प्यायला द्यायचे नाही असे ठरवून तिघेही आपापल्या कामाला लागले.

सखुना बांधलेला दोर इतका घट्ट होता कि काही दिवसांनी त्यांच्या शरीराला खड्डे पडू लागले. याही परिस्थितीत त्यांनी आर्त भावाने श्री विठ्ठलाला साद घातली , 'हे नाथा, या डोळ्यांनी तुझे एकदा जरी चरण पाहिले असते, तरी मी तात्काळ प्राण त्यागले असते. मी जशीही आहे तुझीच आहे, तूच मला या बंधनातून मुक्त कर' आर्त भावाने आळवलेली सखूची हाक थेट श्री विठ्ठलाच्या अंतःकरणापर्यंत पोहोचली.

क्षणाचाही विलंब न करता भगवंताने सुंदर स्त्रीचे रूप घेतले आणि सखूकडे गेला. स्त्री रूपातील भगवंत सखूबाईंना म्हणाला, 'मी पंढरपूरला जात आहे तुला नाही जायचे का?' यावर सखू उदगारल्या 'मी इथे बांधलेली आहे, माझ्यासारख्या पापिणीच्या नशिबात पंढरपूरची यात्रा कुठे ' यावर स्त्रीरूपातील भगवंत म्हणाला 'बाई मी तुझ्या पाठीशी आहे, तुझ्या जागी मी उभी राहते, माझ्या ऐवजी तू पंढरपूरला जा. असे म्हणून भगवंताने तिच्या शरीराभोवती गुंडाळलेला केवळ दोरखंड मुक्त केला नाही, तर या भवसागरातून सखूबाईंना कायमचे बंधनमुक्त केले.

१५ दिवस उपाशी राहिलेल्या सखू मृत पावल्या तर आपण संकटात येऊ या भीतीने तिचे नातेवाईक सखूबाईंचे रूप घेतलेल्या भगवंताचा दोरखंड सोडतात. पुढे सखूबाई येईपर्यंत सखूच्या जागी साक्षात श्री विठ्ठल सखूबाईंच्या पतीची आणि सासू सासऱ्यांची सेवा करतो. भगवंताच्या सहवासाने सखूच्या पतीच्या आणि सासू सासऱ्याच्या स्वभावात परिवर्तन होऊन त्यांच्या वर्तणुकीत पालट होतो.

भावाचा भुकेला असलेल्या भगवंताने भक्ताच्या घरी जाऊन भक्ताचीच सेवा केल्याची कितीतरी उदाहरणे संत चरित्रांत सापडतात. ज्याप्रमाणे सखूबाईंसाठी त्याने १५ दिवस स्वतःला बांधून घेतले, तिच्या पतीची आणि सासू सासऱ्यांची सेवा केली, त्याप्रमाणे त्याने जनाबाईंसाठी धुणी धुतली , एकनाथांच्या घरी श्रीखंड्या बनून पाणी भरले आहे. अशी एक ना अनेक उदाहरणे आहेत.

संतांची चरित्रे वाचल्यावर एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते ती म्हणजे सर्वच संतांनी जीवनात कितीही घनघोर संकट आले तरी भगवंताची साथ तिळमात्रही सोडली नाही. उलट या परिस्थितीत त्यांनी केवळ भगवंतालाच आळवले. मायेतील प्रलोभने त्यांनी कधी जवळ केली नाहीत. मी भगवंताचा आणि माझा केवळ आणि केवळ भगवंत याच उत्कट भावाने त्यांनी मनोभावे उपासना केली शेवटी भगवंतालाही न राहवून भक्ताच्या साहाय्याला धावून यावेच लागते.

भगवंत जसा सखूबाईंना बंधनमुक्त करण्यासाठी आला, संत गोरा कुंभारांना त्यांचे बाळ जिवंत करण्यासाठी आला, संत तुकारामांना सदेह वैकुंठात नेण्यासाठी आला. ज्ञानेश्वरांसाठी रेड्यामुखी वेद वदवण्यासाठी आला तसा तो आपल्याही साहाय्यासाठी का धावून येणार नाही?

घरातील परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असतानाही सखूबाईंनी विठ्ठलाची आराधना सोडली नाही. साधना करताना घरातून होणारा विरोध सहन करत आपणही भगवंताची मनोभावे साधना करतो का ?

ज्या आर्ततेने सखूबाईंनी श्री विठ्ठलाला साद घातली त्या उत्कटनेने भगवंताला आपण आळवतो का ? पुंडलिकासाठी जो भगवंत गेली २८ युगे एका विटेवर उभा आहे तो भगवंत आपल्या आर्त हाकेसाठी का बरे धावून येणार नाही?



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

■ ■ ■

## भक्तीच्या परंपरेवर होत असलेले आघात!

**वाचक लिहितात**

महाराष्ट्राला संतांच्या परंपरेचा वारसा लाभलेला आहे. संतांच्या शिकवणीचा प्रत्यक्ष अनुभव म्हणजेच आषाढी वारी! महाराष्ट्राचे वैभव म्हणजे ही वारी! या वारीतून हिंदू ऐक्याचे आणि भक्तीभावाचे दर्शन घडते. मात्र, काही वर्षांपासून या वारीत विघ्ने आणण्याचे प्रयत्न सातत्याने होत आहेत.

यंदाच्या वारीत तर देवाचे अस्तित्वच नाकारणाऱ्या अंनिसवाल्यांनी संविधान समता दिंडी या गोंडस नावाखाली वारीत घुसखोरी केल्याचे समोर आले आहे. याच अंनिसवाल्यांनी यापूर्वी वारीला अंधश्रद्धा ठरवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले होते. आता तर ते पवित्र वारीत प्रवेश करून संत साहित्य, अभंग, धर्मग्रंथ आणि वारकऱ्यांचे श्रद्धास्थान यांच्याविषयी अपप्रचार करत आहेत, आणि वारकऱ्यांचा बुद्धीभेद करण्याचा प्रयत्न करत आहेत.

दुसरीकडे, अबू आझमी यांनी वारीतील पालख्यांमुळे रस्ते जाम होतात. रस्त्यावर हिंदू सण साजरे होतात; मुसलमान तक्रार करत नाहीत.

पण मुसलमानांनी दहा मिनिटांसाठी रस्त्यावर नमाजपठण केल्यावर तक्रारी होतात, असे वक्तव्य केले. याचा स्पष्ट अर्थ असा होतो की, ह्यह्यआमचे रस्त्यावरचे नमाजपठण बंद केले, तर तुमची वारीही बंद करा.

या घटनांवरून स्पष्ट दिसते की, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे वारीला विरोध वाढत आहे. हिंदू ऐक्याचे प्रतीक असलेली ही वारी अनेकांना खुपते आहे. म्हणूनच ते वारंवार या वारीत अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.

यासाठी, समस्त वारकरी संप्रदायाने आणि सर्व हिंदूंनी जागृत राहून कृती करणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा, जसे बंगालमध्ये ६२९ वर्षांची रथयात्रा बंद पाडली गेली, तसेच आपल्या ७०० वर्षांहून अधिक परंपरा असलेल्या वारीसोहळ्याचे भवितव्यही धोक्यात येऊ शकते.

■ **सौ. प्रिया बागडदेव**
**छिंदवाडा.**




आपल्या भारतीय स्वयंपाकघरात जेवण बनवताना अनेक प्रकारचे मसाले वापरले जातात. हे मसाले केवळ जेवणाची चव वाढवतातच असे नाही तर आपल्या आरोग्यासाठीही खूप फायदे देतात. दालचिनी ही त्यापैकी एक आहे.

दालचिनीमध्ये अनेक औषधी गुणधर्म आणि पोषक तत्वे भरपूर प्रमाणात असतात. आयुर्वेदातही याला महत्त्वाचे स्थान आहे. कारण दालचिनीमध्ये व्हिटॅमिन-ए पासून कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि पोटॅशियम पर्यंत अनेक पोषक घटक असतात. त्यात अँटीऑक्सिडंट, दाहक-विरोधी आणि सूक्ष्मजीवविरोधी गुणधर्म देखील भरपूर असतात. सहसा तुम्ही भाज्या तसेच फुलाव भात बनवण्यासाठी दालचिनीचा वापर करता, पण तुम्हाला माहिती आहे का की तुम्ही दालचिनीचे पाणी देखील पिऊ शकता?

**मासिक पाळीच्या वेदनांपासून आराम मिळतो :** महिलांना दर महिन्याला मासिक पाळीच्या वेळी असह्य वेदना सहन कराव्या लागतात. पोटदुखी, पेटके इत्यादी अनेक समस्या उद्भवतात. जर तुम्हाला यापासून आराम मिळवायचा असेल तर तुम्ही दालचिनीचे पाणी प्यावे. यामुळे तुम्हाला आराम मिळेल.

**रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते :** जर तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी दालचिनीचे पाणी प्यायले तर ते शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. अँटिऑक्सिडंट, अँटी-व्हायरल, अँटी-मायक्रोबियल आणि अँटी-फंगल गुणधर्मांनी समृद्ध असल्याने, दालचिनी तुम्हाला अनेक आजार आणि संसर्गांपासून वाचवते.

**वजन कमी होणे :** दालचिनीचे पाणी वजन कमी करण्याचा एक उत्तम मार्ग आहे. या पाण्याच्या सेवनाने चयापचय वाढते. यामुळे कॅलरीज जलद बर्न होतात. जर तुम्ही दररोज सकाळी दालचिनीचे पाणी प्यायले तर ते भूक नियंत्रित करते. पोट आणि कंबरेभोवती जमा झालेली फॅट कमी होते.

**मधुमेहाच्या रूग्णांसाठी फायदेशीर :** मधुमेहाच्या रुग्णांनी दालचिनीचे पाणी नक्कीच प्यावे. ते रक्तातील साखर नियंत्रित ठेवते. तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी दालचिनीचे पाणी पिऊ शकता. जर तुम्ही खूप जास्त औषधे घेत असाल तर ते पिण्यापूर्वी तज्ञांचा सल्ला नक्कीच घ्या.

**पचन चांगले करा :** जर तुम्हाला पोटात गॅस, अपचन किंवा जडपणा यासारख्या समस्या असतील तर तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी दालचिनीचे पाणी प्यावे. यामुळे पचनक्रिया सुधारते. पोटाशी संबंधित समस्या देखील दूर होतात.

■ ■ ■

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## ताळ - मेळ

**पगार आला हाती तरी**
**आनंद होईना अंतरी**
**कारण तुटीचं बजेट भौ**
**कायम आहे ना उरी..!**

**आमदानी अठन्नी**
**और खर्चा रुपय्या**
**यात संतुलन साधलं**
**तर मनशांती मिळेल भैया..**

**स्रोत वाढवा उत्पन्नाचे**
**मग पसरवा पाय**
**इच्छांना मुरड घाला**
**नाय तर फजिती**
**झाल्याविना राहणार नाय !**

# 'एफआयआर दाखल केल्याने काय होईल?' पासून 'एफआयआर दाखल केल्यावर त्वरित न्याय मिळेल पर्यंत'

**नवी दिल्ली, २ जुलै :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्णायक नेतृत्वामुळे आणि केंद्रीय गृहमंत्री व सहकार मंत्री अमित शहा यांच्या दूरदृष्टीमुळे भारताच्या गुन्हेगारी न्यायव्यवस्थेमध्ये ऐतिहासिक बदल शक्य झाला आहे. स्वातंत्र्यप्राप्त भारताच्या मूल्ये आणि गरजा लक्षात घेऊन प्रथमच एक असा कायदात्मक आराखडा तयार करण्यात आला आहे जो नागरिकांना केवळ न्यायाचे आश्वासन देत नाही, तर तो वेळबद्ध व पारदर्शक पद्धतीने पोहोचवतो.

'न्यायव्यवस्थेतील विश्वासाचा सुवर्ण वर्ष' या कार्यक्रमात बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी स्पष्ट केले की, सन १८६० पासून अस्तित्वात असलेले इंडियन पीनल कोड, क्रिमिनल प्रोसिजर कोड, आणि इंडियन एव्हिडन्स अ‍ॅक्ट हे कायदे ब्रिटिश संसदेने बनवले होते. त्यांचा उद्देश नागरिकांना न्याय देणे नव्हता, तर ब्रिटिश सत्तेचे संरक्षण आणि दडपशाही होता. या कायद्यांच्या मुळाशी 'न्याय' नसून 'सत्ता चालविणे' व 'दबाव ठेवणे' हेच हेतू होते. काँग्रेस सरकारांनी दीर्घकाळ सत्तेत असतानाही हे कायदे कायम ठेवले आणि त्यात बदल करण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही.

पण आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने लोकांच्या सुरक्षेसाठी आणि स्वातंत्र्याच्या मूल्यांनुसार नवे कायदे तयार केले आहेत. हे नवे गुन्हेगारी कायदे भारतीय न्याय संहिता, भारतीय साक्ष अधिनियम आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहिता हे त्या विचारावर आधारित आहेत की भारतातील प्रत्येक नागरिक समान आहे आणि त्यांचे जीवन, मालमत्ता, प्रतिष्ठा आणि घटनात्मक अधिकार हे सर्वोच्च आहेत.

या नव्या कायद्यांचा मुख्य उद्देश म्हणजे फक्त आरोपीला शिक्षा देणे नव्हे, तर नागरिकांना योग्य न्याय देणे आहे. यात संघटित गुन्ह्यांची व्याख्या केली आहे आणि त्यासाठी कठोर शिक्षेची तरतूद केली आहे. आता पीडिताला आरोपीपेक्षा अग्रक्रम दिला जाणार आहे. त्यामुळे एफआयआर दाखल करून काहीच होत नाही ही भावना नष्ट होऊन एफआयआर दाखल केल्यावर लगेच न्याय मिळतो अशी जनभावना निर्माण होईल.

या कायद्यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे न्याय वेळबद्ध करणे. गुन्ह्याच्या चौकशीपासून ते न्यायालयाच्या निकालापर्यंत प्रत्येक टप्पा ठराविक कालमर्यादेत होणार आहे. प्रत्येक एफआयआरचा डिजिटल रेकॉर्ड तयार होणार असून, केसचा टेक्नॉलॉजीच्या मदतीने मागोवा घेतला जाणार आहे. पीडितास प्रत्येक टप्प्याची माहिती मिळणार असून, पोलिस आणि न्यायालयीन व्यवस्थेत पारदर्शकता वाढेल, तसेच भ्रष्टाचार आणि निष्काळजीपणा रोखला जाईल.

या नव्या कायद्यांची अंमलबजावणी करताना मोदी सरकारने प्रचंड प्रमाणात तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. डिजिटल फॉरेन्सिक, व्हिडीओ कॉन्फरन्सिंग, इलेक्ट्रॉनिक पुराव्यांची मान्यता आणि रिअल-टाईम अपडेट्स यांचा समावेश करण्यात आला आहे, जेणेकरून केस प्रक्रिया अधिक जलद व अचूक होईल. आता पोलिस चौकशीसाठी कालमर्यादा, अनिवार्य फॉरेन्सिक पुरावे, आणि केस ट्रॅकिंग सिस्टीम कायद्यातच अंतर्भूत करण्यात आले आहेत. सामान्य माणूस आता पोलीस स्टेशनला जायला घाबरणार नाही. तो तिथे खुलेपणाने बोलेल आणि त्याला न्याय मिळेल याचा विश्वास वाटेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने या कायद्यांबाबत देशभर जनजागृती मोहीम सुरू केली आहे, जेणेकरून प्रत्येक नागरिक, वकील, पोलीस अधिकारी आणि न्यायिक अधिकारी या कायद्यांचा आत्मा समजून घेतील आणि प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी करतील.

भारतीय कायद्यातील हा बदल देशाच्या लोकशाहीला बळकटी देईल, जिथे नागरिकांना वेळेवर न्याय, समानता आणि सन्मान मिळेल. या कायद्यांच्या पहिल्या वर्षातील यश ही सकारात्मक नांदी आहे की, भारताची गुन्हेगारी न्यायव्यवस्था आता नव्या युगाकडे वाटचाल करत आहे अशा युगाकडे जिथे लोकांना हे ठामपणे वाटेल की न्याय मिळणारच, आणि तो वेळेत मिळणार!

एकदा हे कायदे पूर्णपणे लागू झाल्यावर अगणित तारखा आणि पुढे ढकलण्यांची साखळी संपणार असून एफआयआर दाखल केल्यानंतर केवळ तीन वर्षांत न्याय दिला जाणार आहे.

## कलाकारांच्या टिफिनमध्ये काय असते?

मुंबई, २ जुलै : सेटवर दीर्घकाळपर्यंत शूटिंगदरम्यान टॅलेंट व स्टॅमिनासह पौष्टिक आहार कलाकारांसाठी आवश्यक बनला आहे, जो कलाकारांना उत्साही, सक्रिय व कनेक्टेड राहण्यास मदत करतो. पण अनेक कलाकारांसाठी त्यांचे लंचबॉक्सेस आहारापेक्षा अधिक आहेत. या लंचबॉक्समध्ये आहारासोबत परंपरा आणि दृढ नात्याचे क्षण सामावलेले आहेत. एण्ड टीव्हीवरील कलाकार सपना सिकरवार (बिमलेश, 'हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, 'भाबीजी घर पर है') सेटवर आणणाऱ्या त्यांच्या टिफिनमध्ये काय असते, याबाबत सांगत आहेत. मालिका 'हप्पू की उलटन पलटन' मध्ये बिमलेशची भूमिका साकारणाऱ्या सपना सिकरवार म्हणाल्या, ''फूड सेटवरील माझा अल्टिमेट मूड चेंजर आहे. कामामध्ये कितीही व्यस्त असो किंवा शूटिंग कितीही वेळेपर्यंत असो मी नेहमी लंच ब्रेकची आतुरतेने वाट पाहते. माझ्या टिफिनमध्ये घरी बनवलेले खाद्यदार्थ, भाजी-चपाती, डाळ-भात किंवा कधी-कधी चण्याचे पीठ किंवा सुजीपासून बनवलेला चिल्ला असतो. मी सायंकाळीसाठी सोबत लहान स्नॅकचे डबे देखील ठेवते, ज्यामध्ये पोहे, उपमा किंवा मसाला-शेंगदाणे असतात, जे भूकेचे शमन करतात. उपवासाच्या दिवशी मी साबुदाणा खिचडी, केळी व सफरचंद यांसारखी फळे आणि काहीशी दही सेवन करते. पण माझ्या टिफिनमध्ये एक गोष्ट नेहमी असते ते म्हणजे लोणचे, ज्यामध्ये आंब्याचे, लिंबूचे किंवा मिक्स लोणचे असते. त्यांची आंबट चव आहाराला अधिक चविष्ट बनवते. लंचटाइमला खास बनवणारी बाब म्हणजे सह-कलाकारांचा सहवास. तुम्ही टिफिनमध्ये काय आणता हे महत्त्वाचे नसते तर कोणासोबत टिफिन शेअर करता हे महत्त्वाचे आहे आणि मी माझी सह-कलाकार व जिवलग मैत्रिण गीतांजली मिश्रासोबत टिफिन शेअर करते. ती मालिकेमध्ये माझ्या बहिणीची भूमिका साकारत आहे आणि वास्तविक जीवनात उत्तम कूक देखील आहे. ती सर्वात स्वादिष्ट, पौष्टिक फूड घेऊन येते, ज्यामध्ये मटर पनीर, स्टफ केलेले पराठा किंवा हलवा सारखे गोड पदार्थ देखील असतात. आमचे लंचबॉक्सेस शेअर करणे दैनंदिन प्रथा बनली आहे. आम्ही हसतो, गप्पागोष्टी करतो, एकमेकांनी आणलेल्या फूडचा आस्वाद घेतो. हे म्हणजे सेटवरील ब्रेकदरम्यान लहान फॅमिली लंच करत असल्यासारखे वाटते.''

मालिका 'भाबीजी घर पर है' मधील शुभांगी अत्रे ऊर्फ अंगूरी भाबी म्हणाल्या, ''मला आहारामधून ऊर्जा मिळते, माझा मूड उत्साहित होतो आणि माझी त्वचा उत्तम राहण्यास मदत होते. दीर्घकाळापर्यंत शूटिंगसाठी ऊर्जेची गरज असते, म्हणून मी सेवन करणाऱ्या खाद्याबाबत विशेष काळजी घेते. माझ्या टिफिनमध्ये फुलक्यांसह हंगामी हिरव्या भाज्या, जसे लौकी, टिंडा, भेंडी किंवा पालक पनीर असते. हलक्या-फुलक्या स्वरूपात सेवन करायचे असल्यास मी मूग डाळ चिला किंवा भाज्यांच्या खिचडीला प्राधान्य देते. बीटरूट, काकडी, गाजर व स्प्राऊट्सह बनवलेले क्रंची, ताजे सलाड दररोज सेवन करते. तसेच, मी सोबत लहान डब्यामध्ये भिजवलेले बदाम, अक्रोड व खजूर घेऊन जाते, जे सीनदरम्यान सेवन करते, ज्यामुळे त्वरित ऊर्जा मिळते. मी उन्हाळ्यामध्ये सफरचंद, डाळिंब, पपई किंवा खरबूज अशा फळांचे सेवन करते, जे हायड्रेशनसाठी मदत करतात आणि अधूनमधून लागणाऱ्या भूकेचे शमन करतात. मी सेंद्रिय व हंगामी खाद्यपदार्थांचा वापर करते आणि कधी-कधी डिटॉक्स पेये किंवा ताक पिते. आरोग्यदायी, पौष्टिक आहार मला नेहमी शारीरिकदृष्ट्या तंदुरूस्त ठेवतो, तसेच मला शूटिंगदरम्यान अवधान केंद्रित करण्यास मदत होते. माझ्या फूड मंत्र आहे: हलक्या स्वरूपात, पण आरोग्यदायी आहाराचे सेवन करा.''

## आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफने युवा तरुणांसाठी एक मार्केट लिंक्ड उत्पादन लाँच केले

**अमरावती, २ जुलै :** आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्सने आयसीआयसीआय प्रु स्मार्ट इन्शुरन्स प्लॅन प्लस हे एक मार्केट-लिंक्ड उत्पादन लाँच केले आहे, जे ग्राहकांना दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्यासाठी सक्षम बनवते.

हे उत्पादन फक्त १००० रुपयांच्या मासिक प्रीमियममध्ये खरेदी करता येते, ज्यामुळे तरुण ग्राहकांचा मोठा वर्ग नियमितपणे गुंतवणूक करून आपले दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टे साध्य करू शकतो. या उत्पादनामध्ये जीवन विमा संरक्षणाचा एक घटक देखील समाविष्ट आहे, जो ग्राहकाच्या कुटुंबाला आर्थिक सुरक्षा प्रदान करतो.

अमित पालटा, चीफ प्रॉडक्ट आणि डिस्ट्रीब्युशन ऑफिसर, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्स यांनी सांगितले, भारत ही सर्वाधिक वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था आहे आणि मॉर्गन स्टॅन्लीच्या मते, २०२८ पर्यंत ती जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल. भारताची ही प्रगती मुख्यतः तरुण वर्गामुळे घडत आहे, जो सुमारे ६५% लोकसंख्येचा हिस्सा आहे. युएलआयपी उत्पादने त्यांच्या रचनेनुसार संपत्ती निर्मितीसाठी प्रभावी साधने आहेत आणि तरुणांनी लवकर गुंतवणूक सुरू करावी आणि दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी प्रेरित व्हावे यासाठी आम्ही आयसीआयसीआय प्रु स्मार्ट इन्शुरन्स प्लॅन प्लस हे उत्पादन लाँच केले आहे. हे उत्पादन परवडणारे, कर-बचतक्षम असून तरुणांना केवळ १००० रुपये मासिक गुंतवणुकीसह सुरुवात करता येते.

पालटा पुढे म्हणाले, या उत्पादनाच्या लाँचद्वारे आमचे लक्ष ग्राहकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करणारी उत्पादने तयार करण्यावर आहे. हे किफायतशीर उत्पादन व्यक्तींना लवचिकता, स्पष्टता आणि मानसिक शांततेसह त्यांच्या भविष्याची योजना आखण्यास सक्षम बनवते.

## वाढलेल्या मतदारसंख्येने काँग्रेसचे ढोंगही सपशेल फेल जाईल : रविंद्र चव्हाण यांचा काँग्रेस मविआवर प्रहार

**अकोला, २ जुलै :** राहुल गांधी आणि महाविकास आघाडीवाले वारंवार वाढलेल्या मतदारसंख्येबाबत बोलत आहेत. पण जसे भाजपाच्या विजयी मतदारसंघात मतदार संख्या वाढली, तशीच ती महाविकास आघाडीच्या विजयी मतदारसंघात सुद्धा वाढली, असे असतानाही राहुल गांधींसह विरोधक वाढलेल्या मतदानाची टूम लावून धरत आहेत. विरोधकांनी अशा कितीही वावड्या उठवल्या, तरीही यापूर्वी जसे संविधान बचाव आणि ईव्हीएम हटाव सारखे मविआचे ढोंगी प्रयोग दणदणीत आपटले, तसेच वाढलेल्या मतदारसंख्येचे ढोंगही सपशेल फेल जाईल कारण काँग्रेसच्या या भूलथापांना महाराष्ट्र आता भुलणार नाही, अशा शब्दात भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष व आमदार रविंद्र चव्हाण यांनी विरोधकांना जोरदार प्रत्युत्तर दिले. विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात लाखो, करोडो मते वाढल्याचा दावा काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि अन्य नेते वारंवार करत आहेत. त्या पार्श्वभूमीवर आमदार रविंद्र चव्हाण यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली.

रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले, गेल्या वर्षांत देशवासीयांना दहशतवाद, नक्षलवाद, घराणेशाही, भ्रष्टाचार आणि लांगुलचालनापासून सुटका मिळाली आहे. देशाचा अभूतपूर्व विकास होत आहे. वन्दे भारतसारख्या आधुनिक रेल्वे धावत आहेत. मेट्रो नेटवर्क दिवसागणिक वाढतं आहे. उत्तम रस्त्यांचं जाळं उभारलं जातंय, उत्तम शैक्षणिक सुविधाही उभारल्या जात आहेत. औद्योगिक विकासातून रोजगार निर्मितीला मोठी चालना मिळाली आहे. एकीकडे विकास चालू असतानाच दुसरीकडे वारसा आणि संस्कृती जपली जात आहे. प्रत्येक संकल्प सिद्धीस नेत भारतीय जनता पार्टीने जनतेचा अतूट विश्वास कमावला आहे. म्हणूनच जनतेने राष्ट्र आणि महाराष्ट्र सांभाळण्याची धुरा 'नरेंद्र-देवेंद्र' या जोडीवर सोपवली आहे. परंतु इतक्या वेळा पराभव पत्करायला लागूनही विरोधकांनी अजूनही आत्मपरिक्षण केलेले दिसतं नाही. पूर्वी आपल्या पराभवाचे खापर ईव्हीएमवर फोडण्यात विरोधकांनी धन्यता मानली. मात्र कर्नाटक आणि तेलंगणासारख्या राज्यांमध्ये जेव्हा काँग्रेस आणि मविआ जिंकले, तेव्हा महाविकास आघाडीवाल्यांनी त्याचे श्रेय ईव्हीएमला दिले नाही. काँग्रेसचा हा ढोंगीपणा जनतेच्या लक्षात आला आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला दणका बसला. त्यानंतर राहुल गांधींसह विरोधकांनी वाढलेल्या मतदानाची टूम काढली. पण जिथे महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी झाले, अशा पश्चिम नागपूर, उत्तर नागपूर, पुण्यातील वडगाव-शेरी, मुंबईतील मालाड पश्चिम, मुंब्रा, अशा विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदार संख्या वाढलीच होती. मग अशा मतदारसंघांबाबत राहुल गांधी कधीच काहीही बोलताना दिसत नाहीत. कारण त्यांना लोकांची दिशाभूल करूनच स्वत:चा राजकीय स्वार्थ साधण्यात स्वारस्य आहे. वाढलेल्या मतदानावरून काँग्रेस आणि महाविकास आघाडीवाल्यांनी रान उठवण्याचा कितीही प्रयत्न केला, तरीही जनतेला त्यांचे ढोंग कळून चुकलंय. म्हणूनच काँग्रेसच्या भूलथापांना महाराष्ट्र आता भूलणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही, असा निर्धारही चव्हाण यांनी या निमित्ताने व्यक्त केला.

## पात्रं झाले षडयंत्राचे शिकार!

**मुंबई, २ जुलै :** एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन' आणि 'भाबीजी घर पर है' मध्ये दरोगा हप्पू सिंग आणि विभुती नारायण मिश्रा षडयंत्राला बळी पडतात. मालिका 'हप्पू की उलटन पलटन' च्या आगामी एपिसोडबाबत गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश म्हणाल्या, ''बिमलेश (सपना सिकरवार) तिच्या माहेरी जाते आणि नवीन नोकरी करू लागते, ज्यामुळे बेनी (विश्वनाथ चॅटर्जी) तिच्या अनुपस्थितीत चिडचिड करू लागलो आणि त्याला अस्वस्थ वाटते. नाराज व भावूक झालेला तो राग व्यक्त करायला सुरूवात करतो, तो सांगतो की, बिमलेश लवकर परत घरी आली नाही तर दुसऱ्या महिलेसोबत प्रेमसंबंध सुरू करेल. अस्वस्थ व रागावलेला बेनी हप्पूला (योगेश त्रिपाठी) सर्व घटना सांगतो, जो त्याला बिमलेशला परत आणण्याचे वचन देतो आणि यामध्ये तो अयशस्वी ठरला तर त्याचे नाव बदलेल. या वचनानुसार बेनी प्रतिज्ञापत्र तयार करतो, ज्यामध्ये लिहिलेले असते की हप्पू सिंग बिमलेशला परत आणू शकला नाही, तर त्याचे अधिकृतरित्या 'तिलचट्टा सिंग' असे नाव ठेवण्यात येईल. यामुळे हप्पू घाबरतो, बेनी राजेश (गीतांजली मिश्रा) व तिची आई अवधेशिया (उर्मिया शर्मा) यांना धमकी देऊ लागतो, त्या धमकीचा दोघींवर काहीच परिणाम होत नाही. कटोरी अम्मा (हिमानी शिवपुरी) इशारा देते की फक्त धमक्या देऊन चालणार नाही, प्रत्यक्ष कृती करण्याची गरज आहे. दरम्यान, पोलिस स्टेशनमध्ये एक विचित्र केस येते, पत्नीला तिच्या कर्णबधीर पतीचा त्रास होत असतो, ज्याबद्दल ती तक्रार करते. संधी साधत हप्पू ती महिला म्हणजेच सुरीलीला बेनीची प्रेमिका बनण्याचे नाटक करण्यास समजवतो, ज्यामागे त्याला आशा असते की यामुळे त्याचे नाव न बदलण्यास मदत होईल. बदल्यात, हप्पू तिला तिच्या पतीला फटकारण्याचे वचन देतो. पण स्थितीला रोमांचक वळण मिळते, जेथे हप्पूला समजते की सुरीलीचा पती पोलिस कमिशनरचा (किशोर भानुशाली) भाऊ आहे, ज्यामुळे तणाव वाढतो. बेनी सुरीलीला घरी आणतो, पण अवधेशिया व राजेश कोणत्याच प्रतिक्रिया देत नाहीत, तरीदेखील आतून त्या अत्यंत चिंताग्रस्त असतात. परिस्थिती इतकी बिघडते की, बेनी सुरीलीसोबत विवाह करण्याचे ठरवतो. सर्वांनी विरोध केल्यानंतर देखील विवाहाच्या विधी सुरू होतात. लग्नाचे फेरे होणार असतानाच सुरीलीचा खरा पती व कमिशनर येतात आणि सर्वकाही नाटक असल्याचे सांगतात. राजेश व अवधेशियाला शेवटी सत्य समजते. रागावलेला बेनी प्रतिज्ञापत्र काढतो आणि हप्पूला इशारा देतो की, सकाळपर्यंत त्याचे नाव अधिकृतरित्या तिलचट्टा सिंग झालेले असेल. तेव्हाच, बेनीला अज्ञात फोन क्रमांकावरून मेसेज येतो.

## करूर वैश्य बँक आणि क्षेमा जनरल इन्शुरन्स यांची गेम चेंजिंग बँकविमा भागीदारी

**करूर, २ जुलै :** करूर वैश्य बँक (केव्हीबी) आणि क्षेमा जनरल इन्शुरन्स लिमिटेड यांनी आज 'बँकविमा भागीदारी' जाहीर केली आहे. यामध्ये भारतातील ग्रामीण आणि कृषी-केंद्रित समुदायांसाठी विशेषतः तयार करण्यात आलेला दुहेरी लाभ देणारे क्षेमा किसान साथी हे विमा उत्पादन सादर केले जाणार आहे. केव्हीबी चा ग्रामीण व निमशहरी भागांतील बँकिंग अनुभव आणि क्षेमाच्या तंत्रज्ञानाधारित विमा उपाययोजना या गोष्टी या भागीदारीतून एकत्र येणार आहेत. त्यातून लाखो ग्राहकांना एकात्मिक आर्थिक संरक्षणाची सुविधा मिळू शकेल.

केव्हीबी ची ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाबाबतची दीर्घकालीन बांधिलकी या भागीदारीतून पुरेशी स्पष्ट होते. १०९ वर्षांची परंपरा लाभलेल्या करूर वैश्य बँकेने ग्राहकांच्या वाढत्या गरजा पूर्ण करताना नेहमीच विश्वास आणि सेवेला अग्रक्रम दिला आहे. विशेषतः कृषी समुदायासाठी तयार केलेल्या या विमा उत्पादनामुळे बँकविमा क्षेत्रात एक नवा आणि दूरगामी टप्पा गाठण्यात आला आहे. खासगी क्षेत्रातील या दोन विनियामक संस्थांनी सुरू केलेली ही संयुक्त योजना फक्त एक भागीदारी न राहता कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला सक्षम, सुरक्षित व शाश्वत बनवण्याचे ती एक मिशन आहे. क्षेमा चे प्रगत तंत्रज्ञान आणि केव्हीबीचा ग्रामीण ग्राहकवर्ग यांचा उपयोग करून ही योजना व्यापक प्रमाणावर पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आला आहे. यामध्ये क्षेमाचे उद्दिष्ट केवळ विमा सुरक्षा पुरवणे नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी एक संरक्षक कवच म्हणून कार्य करणे हे आहे. लवचिकता, सजगता आणि शाश्वतता यांसाठी ती आवश्यक साधने पुरविणार आहे.

या भागीदारीबाबत बोलताना करूर वैश्य बँकेचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश बाबू म्हणाले, भारताच्या ग्रामीण जीवनशैलीशी आमची बँक खोलवर जोडलेली आहे. त्यामुळे आपल्या ग्राहकांना रोजच्या आयुष्यात कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते, याची आम्हाला जाणीव आहे. क्षेमा किसान साथी हे केवळ एक विमा उत्पादन नाही, तर ग्राहकांच्या मनःशांतीचा तो एक आधार आहे. शाश्वत उपजीविकेस पाठबळ देणारी अर्थव्यवस्था उभारण्याच्या आमच्या प्रयत्नांचे ही भागीदारी प्रतीक आहे. समावेशक बँकिंग आणि मूल्यवर्धित सेवा यांच्या माध्यमातून सक्षम, सुरक्षित आणि आत्मनिर्भर ग्रामीण अर्थव्यवस्था घडवण्याच्या आमच्या दीर्घकालीन दृष्टिकोनाशी ती संपूर्णपणे सुसंगत आहे.




या भागीदारीवर प्रतिक्रिया देताना क्षेमा जनरल इन्शुरन्स लिमिटेडचे अध्यक्ष नटराज नुकाला म्हणाले, बँकविम्याचे हे आगळे-वेगळे उत्पादन म्हणजे उपजीविका आणि कुटुंबासाठी दुहेरी संरक्षण देणारा अभिनव पर्याय आहे. पीक विमा आणि वैयक्तिक अपघात विम्याचे एकत्रीकरण करून केव्हीबी च्या सन्माननीय ग्राहकांसाठी हे खास तयार करण्यात आले आहे. कोट्यवधी ग्रामीण कुटुंबे आणि कृषी उद्योजकांसाठी आर्थिक सुरक्षितता, स्थैर्य व स्वावलंबन निर्माण करणे आणि त्याचबरोबर ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे हा क्षेमा किसान साथी' चा उद्देश आहे. हे खास उत्पादन क्षेमाच्या ग्रामीण माहिती तंत्रज्ञानाधारित योजनेचा केंद्रबिंदू आहे. आर्थिक व विमा विश्लेषणांच्या आधारे ग्रामीण भागातील माहिती-केंद्रित पर्यावरण ते तयार करते आणि उपग्रह प्रतिमांसारख्या प्रगत तंत्रज्ञानाच्या आधारे पूर्वतयारी, प्रतिबंध आणि अचूक उपाय शोधते.

भारत सरकार आणि विमा नियामक व विकास प्राधिकरण (इर्डा) यांनी अलीकडेच ठरवलेल्या धोरणात्मक दिशादर्शक तत्त्वांशी विशेषतः टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये विमा सेवा पोहोचवण्याच्या दृष्टीने ही भागीदारी सुसंगत आहे. पर्यंत सर्वांसाठी विमा हे राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरते. आर्थिक मध्यस्थ म्हणून केव्हीबीचे विश्वासार्ह नेतृत्व आणि तिची ग्राहक-केंद्रित कार्यपद्धती यामुळे ही बँक या उद्दिष्टासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकेल.

क्षेमा जनरल इन्शुरन्स लिमिटेड कडे एआयवर आधारित जोखीम मूल्यांकन, उपग्रह प्रतिमांकन आणि रिअल-टाइम डेटा मॉडेलिंग यामधील कौशल्य आहे. यामुळे तिला भविष्यदर्शी आणि सक्रिय विमा उपाययोजना विकसित करता येतात. क्षेमा कंपनीची प्रगत तंत्राधारित प्रणाली ही अचूक विमा मूल्यांकन आणि दाव्यांची पारदर्शक व वेगवान प्रक्रिया यासाठी सक्षम असून, ग्रामीण ग्राहकांना वैयक्तिक अनुभव देण्यावर ती भर देते.

केव्हीबी आणि क्षेमा यांच्यातील ही भागीदारी केवळ व्यावसायिक करार नसून, भारताच्या अर्थव्यवस्थेच्या मुळाधाराला, म्हणजेच शेतकरी व ग्रामीण उद्योजकांना संरक्षण, स्थैर्य आणि विकासाचा आत्मविश्वास देणारे हे एक सामूहिक मिशन आहे.

## आज का अंदाज

गुरूवार ३ जुलै २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ७ | ८ | २ | ५ | ६ | ७ |
| ३३५ | १६७ | ८९० | १८९ | १४७ | ४५६ | २७७ | १३३ |
| ४७० | ५९० | ३४० | ३७८ | ३४५ | १७७ | १४४ | ४६७ |
| ५६० | ६८० | २५० | २५० | २०० | २५८ | ७९० | २५० |
| १० | ४० | ७२ | ८२ | २० | ५० | ६८ | ७८ |
| १९ | ४९ | ७३ | ८३ | २१ | ५१ | ६९ | ७९ |
| १६ | ४६ | ७५ | ८५ | २२ | ५२ | ६४ | ७४ |

३ जुलै : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ६० | ९० |
| २४ | ३४ | ६८ | ९८ |
| २७ | ३७ | ६५ | ९५ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## संस्कृत काही सोपी भाषा नाही, पण आमची नेहमी नवीन शिकण्याची तयारी असत : हुनर हाली

**मुंबई, २ जुलै :** दमदार कथा आणि उत्तम अभिनय यामुळे सोनी सबवरील वीर हनुमान मालिका लोकांची आवडती मालिका झाली आहे. या मालिकेत आपला पराक्रम, भक्ती आणि सदाचाराने समस्त प्रेक्षकांचे मन जिंकणाऱ्या बाल हनुमानाची भूमिका आन तिवारी हा बालकलाकार करत आहे.

पडद्यावर डोळ्यांना आनंद देणाऱ्या या मालिकेच्या पडद्याच्या मागे यातील कलाकारांचे संबंध खूप छान आहेत. या मालिकेत अलीकडेच कैकयीच्या भूमिकेत दाखल झालेल्या हुनर हाली गांधीने पडद्याच्या मागे एक वेगळी भूमिका स्वीकारली आहे- आन तिवारीला संस्कृत शिकवण्याची! संस्कृत भाषेवर प्रेम असणारी आणि बऱ्यापैकी प्रभुत्व असणारी हुनर आनला संस्कृत भाषेतील छोट्या छोट्या गोष्टी आणि श्लोकांचे अर्थ समजावून सांगत असते. आन आपले संवाद न अडखळता बोलू शकेल आणि त्याला त्या संवादांचे मर्म देखील समजेल यासाठी ती प्रयत्न करत असते. टेक्सच्या मध्ये त्यांची शिकवणी चालते, ज्यात थट्टा विनोद, कुतूहल आणि रुची दिसते आणि हे सगळे प्रत्येक दृश्य अचूक करण्यासाठी असते!

पडद्याच्या मागच्या या विशेष नात्याविषयी बोलताना हुनर हाली गांधी म्हणते, मला संस्कृत पहिल्यापासून आवडते. ही काही सोपी भाषा नाही, खास करून आनसारख्या लहान मुलासाठी. पण मला या गोष्टीचे कौतुक वाटते की, तो शिकण्यासाठी उत्सुक असतो. आन खूप प्रामाणिक आणि जिज्ञासू मुलगा आहे. तो जी मेहनत घेतो ती पाहून मलाच त्याला मदत करावीशी वाटते. आमचे एक मस्त रुटीन आहे. मी शब्दार्थांचे क्विझ घेते, संवादांचे भाग करून त्यांचा अर्थ त्याला समजावते. आम्हाला दोघांना या खेळात मजा येत आहे. वीर हनुमान मालिकेत काम करणे हाच मुळात एक दिव्य अनुभव आहे.

## राशीभविष्य

**मेष :** आज दिवसाची सुरुवात निरुपयोगी धावपळीने होईल. कामाच्या ठिकाणी तुमच्या कामासोबतच महत्त्वाची जबाबदारी मिळण्याचे संकेत आहेत. अचानक मोठी जबाबदारी मिळू शकते.

**वृषभ :** आज पदोन्नतीची संधी मिळेल. इलेक्ट्रॉनिकच्या कामाशी संबंधित लोकांना आज चांगला नफा होईल. आर्थिकदृष्ट्या तुम्ही मजबूत राहाल. वैवाहिक जीवनात तुमचे जोडीदारासोबतचे संबंध अधिक घट्ट होतील.

**मिथुन :** आज कोणत्याही अनोळखी व्यक्तीवर आंधळेपणाने विश्वास ठेवू नका. अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते. परीक्षा किंवा स्पर्धेत यश मिळण्याचे संकेत आहेत.

**कर्क :** आज कामाच्या ठिकाणी संघर्ष वाढू शकतो. तुम्हाला काही अप्रिय बातम्या मिळू शकतात. व्यावसायिकांची परिस्थिती सुधारेल. नवीन कामाच्या योजना आखल्या जातील आणि फायदे मिळतील.

**सिंह :** आजचा दिवस तुमच्यासाठी फायदेशीर आणि प्रगतीशील असेल. कामे हळूहळू पूर्ण होतील. कोणावरही जास्त विश्वास ठेवू नका. स्वत:वर विश्वास ठेवा. शहाणपणाने निर्णय घ्या.

**कन्या :** जुन्या मित्रासोबत फिरण्याचा प्लॅन करू शकता. तुमचे करिअर चांगले राहील. कठीण परिस्थितीत तुमचा संयम ढळू देऊ नका. नाहीतर, नुकसान होण्याची शक्यता जास्त असेल.

**तुळ :** आजचा काळ तुमच्यासाठी अनुकूल असेल. उच्चपदस्थ आणि प्रतिष्ठित लोकांशी संपर्क वाढतील. कामाच्या ठिकाणी तुमचे धैर्य आणि शौर्य वाढेल. सकारात्मक विचारसरणी ठेवा.

**वृश्चिक :** आज, जुना मालमत्तेचा वाद सोडवला जाऊ शकतो. ज्यामुळे तुम्हाला संपत्ती मिळू शकते. तुमचे मन इकडे तिकडे भटकू देऊ नका. राजकारणात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील.


**धनु :** आजचा दिवस काही चांगल्या बातम्यांनी सुरू होईल. कोणावरही जास्त विश्वास ठेवू नका. स्वत:वर विश्वास ठेवा. जवळच्या मित्रांकडून पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे. यश मिळण्याची चिन्हे आहेत.

**मकर :** आज तुम्हाला व्यवसायात नवीन मित्र मिळतील. नोकरीत तुम्हाला पदोन्नती मिळू शकते. मित्रांसोबत पर्यटनस्थळी सहलीला जाऊ शकता. न्यायालयीन प्रकरणांमध्ये संयम बाळगा.

**कुंभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी लाभ आणि प्रगतीचा असेल. अतिरिक्त परिश्रमाने परिस्थिती सुधारेल. वैयक्तिक समस्यांमध्ये इतरांना हस्तक्षेप करू देऊ नका. तुमच्या बुद्धिमत्तेने आणि विवेकबुद्धीने निर्णय घ्या.

**मीन :** आज कोणत्याही अनोळखी व्यक्तीवर आंधळेपणाने विश्वास ठेवू नका. अन्यथा, तो तुम्हाला फसवू शकतो. महत्त्वाच्या कामांमध्ये तुम्हाला अधिक संघर्ष करावा लागेल.

## शब्दकोडे क्रमांक २१५३



**आडवे शब्द :-**
१) देवावर विश्वास नसणारा
३) संसार
५) बातमीदार
७) किंमत
९) दंतमंजन
१२) निरुद्योगी
१५) सर्वत्र आरसे लावलेले घर
१७) कशा प्रकारचा?
१८) हात
१९) जबरदस्तीने
२१) घोड्याच्या पायाखाली लावण्याचे लोखंडी साधन
२२) मलईची घट्ट बासुंदी
२४) गल्ली
२५) दुर्दशा
२६) केसांची लट
२८) चौक
२९) कानापर्यंत
३०) संगीतातील एक राग
३१) जिम्मेदार
३४) मृत्यु नसलेला
३५) छोटे कुबड
३६) सत्वांश
३८) जागविणारा आवाज
३९) सोन्याचा धागा
४०) मुखरस
४१) उद्याच्या नंतरचा दिवस
४३) तल्लीनता
४५) नास्तिकता धर्माविरुद्ध मत
४६) उलट, विरुद्ध
४९) च्या सह
५१) शिकारीचा प्राणी
५२) एखाद्या मुद्यावरून भांडण
५५) मुकटा
५६) जगातील सर्वात उंच पुतळा ह्या भारतीय नेत्याचा आहे
६१) घासणे (इं.)
६२) स्तुती करणारा
६३) वाहतुकीचा रस्ता
६५) एका कुशीवर निजलेला
६७) बारीक दगड (हिं)
७०) वैमानिक
७१) कोळ्याच्या जातीचा एक कीटक
७२) जल
७३) धार्मिष्ठ

**उभे शब्द :-**
१) प्रजाजन
२) शपथ
३) सूर्याचे एक नाव
४) ओरखडा
५) छोटी वस्ती
६) उपस्थित
८) चकचकाट, प्रकाश, तेज
१०) कपडे अडकविण्याचे एक साधन
११) नाजूक
१३) बांगड्यांचा व्यवसाय करणारी जमात
१४) छोटा डोंगर
१५) पाणी साठण्यासाठी झाडाभोवती केलेला खड्डा
१६) सेनापती
१९) ताकद
२०) सतरंजी, रुजामा
२३) गोंधळ व अव्यवस्थेची स्थिती
२४) नरमांजर
२६) माळी
२७) संध्याकाळ
२८) बाई
२९) आम्रफलातील द्रवपदार्थ
३२) उद्यान
३३) दरवाजा
३४) महासर्प
३५) लाटण्याचा साथीदार
३७) प्रश्नोत्तरे
४१) प्रतिध्वनी
४२) रविवार
४४) दिवसाचा चोविसावा भाग
४७) पालव
४८) बिनावासाचे पांढरे फूल
५०) गुरांचा घोळका
५३) प्रिया, पत्नी
५४) एक अप्सरा
५५) लेखणी
५७) वणवा
५८) भ्रमंती, फिरणे
५९) परमेश्वर
६०) दुरून केलेली बारकाईने पाहणी
६१) सडक
६४) रक्षण करणारा
६५) एक प्रश्नार्थक शब्द
६६) वडाचे झाड,
६८) पदार्थाचा सूक्ष्म भाग
७०) आंब्याची कोय

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# मोठया भावाकडून लहान भावास मारहाण

**वर्धा, :** लहान मुलाला का मारत आहे, अशी विचारणा केली असता मो'या भावाने मारहाण केली, ही घटना दहेगाव धांदे येथे 29 जून रोजी सायंकाळी घडली, याप्रकरणी 30 जून रोजी पुलगाव पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

धनराज धांदे असे जखमीचे नाव नारायण धांदे असे मारहाण करणा-याचे नाव आहे, धनराज आणि नारायण या दोघांमध्ये नेहमीच वाद व्हायचा, नारायण हा त्याच्या मुलाला कुठल्यातरी कारणावरुन मारहाण करीत होता, हे लक्षात येताच धनराजने तु मुलाला का मारत आहे, अशी विचारणा केली तेव्हा मो'या भावाने लहान भावास मारहाण करुन जखमी केले, याप्रकरणी पुलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला, पुढील तपास पोलीस करीत आहे.

## दागिन्यांसह रोख नेली चोरटयाने केली लंपास

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०२जुलै**

चोरटयाने घरात चोरी करत २ लाख रुपये रोख आणि दागिने असा एकूण २ लाख ४ हजार रुपयांचा ऐवज चोरुन नेला, ही घटना आनंदनगर परिसरात घडली,

तैमुन्निसा मुनीर शहा या लग्नाला गेल्या असता त्यांच्या घरात चोरटयाने चोरी करत कपाटातठेवलेले दोन लाख रुपये रोख आणि सोन्याच्या दोन अंग'या, कानातील असा एकूण २ लाख ४ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरुन नेला, शहा यांच्या संशयावरुन सोहेब यानेच चोरी केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले, या प्रकरणी शहर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास उत्पन्नामध्ये भरीव वाढ होईल- पराग सोमण

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०२जुलै**

शेतक-यांनी शेतीचा खर्च कमी करुन जास्त उत्पादन घेण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास उत्पन्नामध्ये भरीव वाढ निश्चितच होईल, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी आज कृषि दिन कार्यक्रमात केले. हरीत क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांचा जन्म दिवस कृषि दिन म्हणुन साजरा करण्यात येतो. आज जिल्हा परिषदच्या सिंधुताई सपकाळ सभागृहात कृषि दिन साजरा करण्यात आला यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, कृषि विज्ञान केंद्राचे वरीष्ठ शास्त्रज्ञ जीवन कतोरे, कृषि विकास अधिकारी संजय बमनोटे, जिल्हा अधिक्षक कृषि कार्यालयाचे उपसंचालक काबंळे, कृषि व्यवसायी संघटनेचे अध्यक्ष रवी शेंडे आदी उपस्थित होते.जिल्ह्यामध्ये दुग्ध क्रांती घडवून आणण्यासाठी शेतक-यांनी शेतीसोबत दुग्ध व्यवसायाकडे वळावे. पारंपारिक शेती ऐवजी पिकांमध्ये बदल करुन अन्न प्रक्रिया उद्योग शेतक-यांनी सुरु करावे. कृषि शेत्रामधील नाविन्यपुर्ण बाबीची माहिती घेऊन तसेच शेती पिकांबद्दल अभ्यास करुनच शेती करावी, असे पुढे बोलतांना पराग सोमण म्हणाले. जीवन कतोरे यांनी कापूस, सोयाबीन व तूर पिकांचे व्यवस्थापन व पिक संरक्षण तसेच शेतक-यांनी आपले उत्पन्न कसे वाढवावे याबाबत मार्गदर्शन केले कार्यक्रमाप्रसंगी किटकनाशक फवारणी करतांना शेतक-यांनी घ्यावयाची काळजी या भिंतीपत्रकाचे मुख्यकार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. तसेच शेती मध्ये भरीव काम करुन दुस-यासाठी आदर्श निर्माण करणा-या ८ शेतक-यांचा मान्यवरांचे हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन व आभार विशाल वाघ यांनी मानले. कार्यक्रमाला जिल्हा अधिक्षक कृषि कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# संसर्ग नियंत्रण व निर्जंतुकीकरण सेवेकरिता पुरस्कार

## सावंगी मेघे रुग्णालया एचओसीद्वारे सन्मानित



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०२जुलै**

दिल्ली येथील मान्यताप्राप्त आरोग्यसेवा संघटनांचा संघ असलेल्या सीएएचओ या राष्ट्रीय संघटनेद्वारे सावंगी मेघे येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाला 2024 या वर्षाकरिता केंद्रीय निर्जंतुकीकरण सेवा विभागातील जागरूकता, अनुपालन आणि उत्कृष्टतेसाठी उपविजेता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

नवी दिल्ली येथे झालेल्या समारंभात सावंगी रुग्णालयाच्यावतीने संचालक डॉ. चंद्रशेखर महाकाळकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

राष्ट्रीय पातळीवर पश्चिम विभागातील व्यापक आरोग्यसेवा संस्था श्रेणीमध्ये आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाने संसर्ग नियंत्रण आणि निर्जंतुकीकरण सेवांचे उच्च मानक राखत रुग्णांची सर्वोत्तम काळजी व सुरक्षिततेच्या निकषावर हे स्थान प्राप्त केले आहे. नोसोकोमियल इन्फेक्शन अर्थात आरोग्यसेवासंबंधित संसर्ग किंवा रुग्णालय अधिग्रहित संसर्ग रोखणे मोठे आव्हान असून त्यावर मात करीत संसर्ग दर कमी ठेवण्यात सावंगी रुग्णालयाने यशस्वी ठरले. एसीईने केलेल्या भौतिक लेखापरीक्षणात सावंगी रुग्णालयाने ८0 टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त करीत हा सन्मान मिळवला. या यशात डॉ. चंद्रशेखर महाकाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. शिवानी क्षीरसागर, नर्सिंग संचालक डॉ. दीपा चुघ, प्रशासकीय अधिकारी डॉ. रूपाली नाईक, तोशी दिवाण, डॉ. श्वेता भिडे, रमा मून, भाग्यश्री जुनघरे तसेच शल्यचिकित्सा गृहे व केंद्रीय निर्जंतुकीकरण सेवा विभागातील कर्मचारीवृंदाचे दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था अभिमत विद्यापीठाचे प्रधान सल्लागार सागर मेघे व कुलगुरू डॉ. ललित वाघमारे यांनी अभिनंदन केले.

# १ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीत विशेष आर्थिक साक्षरता अभियान

## प्रत्येक ग्राम पंचायती शिबिराचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा दि. ०२जुलै**

शासनाच्या बँकामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनांचा ग्रामपंचायत स्तरावर लाभ मिळवून देण्यासाठी दि. १ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीत विशेष आर्थिक साक्षरता अभियानांतर्गत प्रत्येक ग्राम पंचायतीमध्ये शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक चेतन शिरभाते यांनी केले आहे.

जिल्ह्याची अग्रणी बँक ऑफ इंडिया हि भारत सरकारच्या वित्तीय समावेशन धोरणा अंतर्गत १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या तीन महिन्यादरम्यान हि मोहीम राबविण्यात येणार आहे. हि मोहीम संपूर्ण देशभर राबविल्या जाणार आहे. या मोहिमेचा प्रारंभ आजनडोह, आजदा, अंतरगाव, आकोली, आलगाव, नेरी (पु), आमला अश्या ग्राम पंचायत मध्ये आज पार पडणार. या तीन महिन्याच्या कालावधीत सामाजिक सुरक्षा योजना, प्रधानमंत्री जनधन योजना अंतर्गत नवीन खाते उघडणे तसेच अंतर्गत जे खाते बंद झाले असतील असे खात करण्यात येईल, प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना, प्रधानमंत्री जीवन सुरक्षा योजना, अटल पेन्शन योजना तसेच सोबतच पिक कर्ज नियमित परतफेड केल्यास मिळणारे व्याज सवलतीचा सुद्धा लाभ या साक्षरता अभियान अंतर्गत प्रत्येक ग्राम पंचायत पातळीवर बँकामार्फत मिळवून दिल्या जाणार आहे. विशेष आर्थिक साक्षरता अभियान च्या कॅम्पची माहिती आपल्या नजीकच्या बँकेत, तहसील कार्यालयात, गटविकास अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध राहील तरी या मेळाव्यास परिसरातील सर्व लोकांनी उपस्थित राहावे व या योजनेचा लाभ घ्यावा, असे जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक चेतन एस. शिरभाते यांनी कळविले आहे.

## विष पिऊन केली आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०२ जुलै**

विष पिऊन एका व्यक्तीने आत्महत्या केली, ही घटना आमगाव जंगली गावात घडली, प्रदीप प्रभाकर भलावी (४२) असे मृताचे नाव आहे,

प्रदीप याने विष प्राशन केले होते, त्याचा मृतदेह घाट रोडवर आढळून आला, त्याला ग्रामीण रुग्णालय सेलू येथे नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले, सेलू पोलिसांनी याप्रकरणी नोंद घेतली आहे.

# तुकडोजी महाराज विद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप



**महासागर प्रतिनिधी**
**अंतोरा, दि. ०२ जुलै**

आष्टी तालुक्यातून 'मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा' स्पर्धेमध्ये दुसरा क्रमांक मिळवलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय अंतोरा. विद्यालयाकडून वर्ग पाचच्या विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकी जपत मोफत गणेशाचे वितरण करण्यात आले.

यामध्ये वर्ग ५ च्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन शालेय गणवेशाचे वाटप मुख्याध्यापक सतीश कातोंडे व त्यांच्या शिक्षक वृंदाच्या वतीने विद्यालयातील विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले. सोबतच वर्ग पाचवीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच वह्या शैक्षणिक कार्यासाठी भेट म्हणून देण्यात आल्या. या मोहिमेचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. असेच नवनवीन उपक्रम या शाळेमध्ये राबविले जाते.

## निधन वार्ता

### इंदु लोंढेकर



**सिंदी रेल्वे, :** स्थानिक कोलंबा स्वामी वार्डात राहणाऱ्या इंदु भाऊराव लोंढेकर(८५) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. जांभुळघाट स्मशानभूमीत बुधवारी अंत्यसंस्कार पार पडला.

त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा आप्त परिवार आहे.

# बापूराव देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयात छाननी सुविधा केंद्राचे उद्‌घाटन



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०२जुलै**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता पदवी अभियांत्रिकीची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे जिल्हानिहाय सुविधा केंद्र सुरू करण्यात आली आहेत. वर्धा जिल्ह्यात बापूराव देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालय, सेवाग्राम येथे शासनाचे अधिकृत छाननी तसेच सुविधा केंद्र उपलब्ध असून या छाननी केंद्रात बी.टेक, एम. टेक, एम.बी.ए. प्रवेश प्रक्रीये संदर्भातील सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या छाननी तसेच सुविधा केंद्राचे उद्‌घाटन बा. दे. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. ओ. पंचारिया यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी डॉ. एन. व्ही. सराफ, प्रा. पी. आर. खोब्रागडे, डॉ. जे. डी. धांदे, डॉ. आर. डी. ठाकरे, प्रा. ए. एम. काकडे, प्रा. जी. एस. चौधरी, प्रा. ए. व्ही. भोयर, रमजान शेख, श्रीकांत देवतळे, पी. डी. वांदिले आणि सर्व प्रवेश तसेच समुपदेशन केंद्र सदस्य, सर्व विभाग प्रमुख, कक्ष प्रमुख आणि शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# पीएम श्री गांधी विद्यालयात अवैध तस्करी विरोधी दिन साजरा




**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०२जुलै**

स्थानिक पीएमश्री नगरपरिषद गांधी विद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थाचे सेवन आणि अवैद्य तस्करी विरोधी दिन हा साजरा करण्यात आला.

तालुका विधी सेवा समितीतर्फे अध्यक्ष म्हणून दिवानी न्यायाधीश ए.आर.सुर्वे ,सहाय्यक दिवाणी न्यायाधीश ए .बी. हिंगणघाटे, सहायक दिवाणी न्यायाधीश ए जे देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते .

कार्यक्रमाची सुरुवात राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने झाले. २६ जून हा आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ सेवन आणि अवैध तस्करी विरोधी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्याची जनजागृती कार्यक्रम हा गांधी विद्यालयाच्या ड्रॉइंग हॉलमध्ये घेण्यात आला प्रास्ताविक प्राचार्य विश्वेश्वर पायले यांनी केले .त्यानंतर हिंगणघाटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी अंमली पदार्थावर तसेच बेटी बचाव बेटी पढाव या विषयावर सुद्धा आपले विचार मांडले. त्यानंतर अध्यक्षिय भाषणामधून दिवानी न्यायाधीश वरिष्ठ स्तर ए आर सुर्वे यांनी वर्ग नववी आणि दहावीतील विद्यार्थ्यांना अमली पदार्थाचे सवय कशी व्यक्तीला लागते ,या वाईट सवयींना आपण नाही कसं म्हणायचं त्यानंतर अवैध तस्करीबाबत उदाहरण त्यांनी दिले.याप्रसंगी तालुका विधी सेवा समिती येथील सर्व सदस्य सर्व शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रमोद नागरे आणि आभार पर्यवेक्षिका ज्योती अजमिरे यांनी मानले.

# मारुती चितमपल्ली : निसर्गप्रेमी आणि शब्दांची जादुगिरी



महाराष्ट्राच्या साहित्यविश्वात आणि विशेषतः माणुस म्हणजे मारुती चितमपल्ली. त्यांचा जन्म 5 नोव्हेंबर 1932 रोजी सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथे झाला.वन विभागात काम करतांना ते प्राणी, पक्षी आणि औषधी वनस्पतींचाबारकाईने अभ्यास करत, हा अभ्यास आणि त्यातून आलेले अनुभव त्यांच्या लेखनाचा अविभाज्य भाग होता. चितमपल्ली हे केवळ लेखक नव्हते, तर एक उत्कृष्ट निसर्गप्रेमी होते. त्यांचे लेखन कोरड्या माहितीचे नसून निर्सगाशी असलेली त्यांची निष्ठा आणि सुक्ष्म निरीक्षण शक्ती आहे. त्यांनी बिर, प्राणी आणि झाडांचे जीवन ह्यांचे इतके खोलवर वर्णन केले की वाचकाला ते स्वतः जाणवले. चितमपल्लींच्या लेखनाची भाषा अतिशय सोपी पण प्रभावी होती. त्यांच्या लेखनात एक प्रकारचा गोडवा होता जो वाचकांना खिळवून ठेवायचा. त्यांचे साहित्य केवळ मनोरंजक नाही तर ते निसर्गाबघल आदर आणि कुतुहल देखील प्रदान करते. मराठी साहित्यातील वन्यजीव आणि आदिवासी जीवनावर ललितलेखन करणारे एक आघाडीचे लेखक म्हणून मारुती चितमपल्ली ह्यांची ख्याती आहे.

मारुती चितमपल्ली यांनी वन खात्यात 36 वर्षे सेवा केली, त्याकाळात देशभर संशोधकवृत्तीने भटकंती केली. त्यांनी एकूण 5 लाख किमी प्रवास केला. त्यांना 13 भाषांचे ज्ञान होते, त्याद्वारे आदिवासी व इतर जमातींशी संवाद साधत त्यांनी पर्यावरणाशी संबंधित मोठी माहिती मिळवली. त्या माहीतीची नोंद केलेल्या आणि 30 वर्षे जपुन ठेवलेल्या शेकडो डायऱ्या आहेत, डायरीतील नोंदीला शास्त्रीय आधार देत पक्षीकोश, प्राणीकोश व मत्स्यकोशाचे लेखन पुर्ण केलं. अरण्यवाचनासह प्राणी, पक्षी, वनस्पतीची वैशिष्ट्यांसह वन्य जीवन विषद करणारी 25 पेक्षा जास्त पुस्तके चितमपल्ली यांनी लिहिली. निसर्गातील हा ठेवा समाजाला कळावा या भावनेतून सतत कार्यरत हा सकारात्मक विचाराचा उर्जाकोश म्हणजे विख्यात लेखक मारुती चितमपल्ली.त्यांनी कर्नाळा पक्षी अभयारण्य, नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा अभयारण्य आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्प यांच्या विकासात भरीव कामगिरी केली. पक्षी जाय दिगंतरा, जंगलाचं देणं, रानवाटा, शब्दांच धन, रानवा, मृगपक्षिशास्त्र, घरट्यापलीकडे, पाखरमाया, निसर्गवाचन, सुवर्णगरुड, आपल्या भारतातील साप, पक्षिकोश, आनंददायी बगळे, निळावंती, केशराचा पाऊस इत्यादी पुस्तके आणि 'चकवा चांदणं' हे आत्मचरीत्र त्यांनी लिहिले. त्यांच्या साहित्यातील योगदानाबघल 2006 मध्ये सोलापूर येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे त्यांना अध्यक्षपद बहाल करण्यात आले होते. 2017 साठी विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार, 2018 साली किर्लोस्कर वसुंधरा आजीवन उपलब्धी पुरस्कार व 2025मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्कारापुरस्काराने सन्मानित केले. निर्सगाची लयलुट जाणणारा हा माणुस वयाच्या 93 व्या वर्षी, 18 जुन 2025 ला अखेर निसर्गात विलीन झाला.

**डॉ. विजय बाबर, वर्धा**
**मो. नं. ९४२३११८८०६**

# हिंगणघाट- दहेगाव बस सेवा सुरु



**युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी**
**सिंदी(रे), दि. ०२जुलै**

हिंगणघाट आगाराची दहेगाव(गोसावी) बसफेरी आजपासून सुरू झाली आहे.

ही बस रोज सायंकाळी हिंगणघाट वरुन सातला सुटेल.रात्री मुक्काम करुन दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता दहेगाव वरुन सुटेल.

आज मंगळवारी हिंगणघाट साठी जाणाऱ्या बसचे गावकऱ्यांनी स्वागत केले.


चालक आणि वाहकाला श्रीफळ आणि दुपट्टा व पूष्पहार देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.याप्रसंगी विलास कोकाटे, महेश राऊत, संजय पिसुड्डे, उमेश राऊत, सचिन महाबुधे, ज्ञानेश्वर किरनाके, विजय कांबळे, अशोक अतकरे, नीलेश बाईलबोडे, अनिल तिजारे आदींची उपस्थिती होती.




: आरएनआय रजिष्ट्रेशन क्रमांक :
६६०३२/१९९७
महासागर
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट.नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, परमार कॉम्पलेस हवालदारपूरा वर्धा - ४४२००१ येथे प्रकाशित केले आहे.
संपादक- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय मो.नं. ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र देशमुख मो.९०११०५८३७२ (पी.बी.आय. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.




# करून घ्या प्रतिबंधात्मक चाचण्या



उपचारांपेक्षा प्रतिबंध योग्य ठरतो. आरोग्याच्या बाबतीत कोणतीही तडजोड करता कामा नये. वय वाढू लागल्यावर शरीरात बदल घडू लागतात. अनेक आजारांची सुरूवात होते. या आजारांचं निदान वेळीच झालं तर रोगमुक्त होता येतं. आजाराचं वेळीच निदान होण्यासाठी प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी करून घेणं गरजेचं आहे. तिशीनंतर उच्च रक्तदाब, मधुमेह, कोलेस्टरॉल यासह इतरही चाचण्या करून घ्यायला हव्यात. अशाच काही उपयुक्त आणि गरजेच्या आरोग्य चाचण्यांविषयी...

* हृदयविकार कोणत्याही वयात होऊ शकतो. सध्याचं धकाधकीचं जीवन, आहाराच्या चुकीच्या सवयी हृदयविकाराला निमंत्रण देतात. हृदयविकाराची काही लक्षणं दिसू लागतात. हा धोका वेळीच ओळखण्यासाठी ईसीजी तपासणी करून घ्यायला हवी. ईसीजी म्हणजे इलेक्ट्रोकार्डिग'ाम. या चाचणीमुळे भविष्यातला हृदयविकाराचा धोका ओळखता येतो. काही उपाययोजना किंवा जीवनशैलीत बदल करून हृदयविकाराला आळा घालता येतो.

* भविष्यातल्या व्याधींचा धोका वेळीच ओळखण्यासाठी जनुकीय चाचण्या करून घेता येतील. जनुकीय चाचण्यांमुळे डीएनएमधले बदल टिपता येतील. कॅन्सरचा धोका ओळखता येईल. बाळाचा विचार करत असाल तर जनुकीय चाचण्या दिशादर्शक ठरू शकतात. या चाचण्यांमुळे तुमच्या बाळाचं आरोग्यही उत्तम राहू शकतं. काही जनुकीय चाचण्या खूप उपयुक्त ठरू शकतात.

* लिपिड प्रोफाइल चाचणीमुळे कोलेस्टरॉलची पातळी कळते. चांगल्या आणि वाईट कोलेस्टरॉलची पातळी कळल्यानंतर हृदयाच्या आरोग्याची कल्पना येऊ शकते. तिशीनंतर साधारण दोन वर्षांनी संपूर्ण लिपिड प्रोफाइल चाचणी करून घ्यायला हवी. हृदयविकार, स्थूलपणा, मधुमेह यांचा कौटुंबिक इतिहास असेल तर नियमित लिपिड प्रोफाइल चाचणी खूप उपयुक्त आणि प्रतिबंधात्मक ठरू शकते. वाईट कोलेस्टरॉलची पातळी कमी करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

* यकृताच्या चाचण्याही करून बघायला हव्यात. यकृताचं आरोग्य खूप महत्त्वाचं असतं. शरीरातली रसायनं, प्रथिनं आणि ट्रायग्लिसराइड्सची तपासणी करून यकृताच्या आरोग्याची माहिती घेतली जाते. यामुळे हेपिटायटिससार'या विकारांचा धोका कमी होऊ शकतो किंवा वेळीच उपचार होऊ शकतात. तिशीनंतर यकृताची नियमित चाचणी करायला हवी.

* पॅप स्मिअर तसंच कोलनोस्कोपी या चाचण्याही गरजेच्या आहेत. पॅप स्मिअर ही चाचणी महिलांसाठी अत्यंत गरजेची आहे. तिशीनंतर या चाचण्या नियमितपणे करणं गरजेचं आहे. या चाचण्यांमुळे सर्व्हिकल कॅन्सर तसंच इतर घातक आजारांचा धोका वेळीच लक्षात येतो आणि त्या दृष्टीने उपाय करता येतात. कोलनोस्कोपी ही चाचणी पुरुषांसाठी गरजेची आहे. या चाचण्या पन्नाशीनंतर केल्या तरी चालत असलं तरी तिशीनंतर केल्यास घातक व्याधींचा धोका वेळीच लक्षात येऊ शकतो. कुटुंबात कलोन कॅन्सरचा इतिहास असेल तर ही चाचणी करून घेणं खूप गरजेचं आहे.

आरोग्यवेध

# गर्भवती महिलांचा मृत्यूदर चिंताजनक!



आराग्य वेध
डॉ. मेघा दळे

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते जगात दर दोन मिनिटांनी एका गर्भवती महिलेचा मृत्यू होतो. माता मृत्युदर म्हणजे गर्भधारणेदरम्यान, प्रसूतीच्या वेळी किंवा प्रसूतीनंतर ४२ दिवसांच्या आत होणारा महिलेचा मृत्यू. 'अमेरिकन कॉलेज ऑफ ऑब्स्टेट्रिशियन अँड गायनॅकॉलॉजिस्ट' ही संस्था अनेक प्रकरणांमध्ये गर्भधारणेनंतर एक वर्षापर्यंतच्या कालावधीत होणाऱ्या मृत्यूला माता मृत्यूच मानते. माता मृत्युदर (एमएमआर) म्हणजे प्रति एक लाख जन्मांमागे झालेला मातांचा मृत्यू. २०२३ मध्ये जागतिक एमएमआर प्रति एक लाख जिवंत जन्मांमागे १९७ होता. कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये हा दर ३४६ आणि उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये तो १० होता.

**महिलांच्या मृत्यूची कारणे**

* **रक्तस्त्राव:** प्रसूतीनंतर जास्त रक्तस्त्राव (पोस्टपार्टम हेमरेज) हे माता मृत्यूचे सर्वात मोठे कारण आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते १९९० मध्ये एक लाख १४ हजार महिला अतिरिक्त रक्तस्त्रावामुळे मृत्युमुखी पडल्या. हा आकडा २०२१ पर्यंत ४७ हजारापर्यंत कमी झाला.

* **उच्च रक्तदाब विकार:** प्रीक्लेम्पसिया आणि एक्लेम्पसिया सारखे उच्च रक्तदाब विकार गर्भवती महिलांमध्ये मृत्यूचे प्रमुख कारण आहेत. हे विकार मेंदू, मूत्रपिंड आणि इतर अवयवांना नुकसान पोहोचवू शकतात.

* **मानसिक आरोग्य स्थिती:** नैराश्य, चिंता आणि प्रसूतीनंतरचे नैराश्य यासारख्या मानसिक आरोग्य स्थिती माता मृत्यूची प्रमुख कारणे आहेत.

* **संसर्ग:** गर्भधारणेदरम्यान किंवा प्रसूतीनंतर सेप्सिससारखे संसर्ग हे माता मृत्यूचे आणखी एक प्रमुख कारण आहे.

* **हृदयरोग:** हृदयरोग आणि कार्डिओमायोपॅथी (हृदयाच्या स्नायूंचे कमकुवत होणे) ही माता मृत्यूची प्रमुख कारणे आहेत.

# 'क' जीवनसत्त्वाच्या अतिसेवनामुळे...




काय खावं?


एखाद्या पोषक घटकाच्या कमतरतेबरोबरच शरीराला आवश्यक असणाऱ्या जीवनसत्त्वांचा, खनिजांचा अतिरेकही वाईटच. सर्वसाधारणपणे निरोगी प्रौढ व्यक्तीला दररोज ६५ ते ९० मिलिग्रॅम 'क' जीवनसत्त्वाची गरज असते. मात्र त्याचा अतिरेक घातक ठरू शकतो.

* 'क' जीवनसत्त्वयुक्त पूरक औषधांच्या अतिरेकामुळे पचनसंस्थेशी संबंधित तक्रारी निर्माण होतात. दिवसभरात २००० मिलिग्रॅमपेक्षा अधिक क्षमतेची 'क' जीवनसत्त्वयुक्त पूरक औषधं घेतल्यास जुलाब, मळमळणं, ॲकसिड रिफ्लक्ससार'या समस्या उद्भवू शकतात.

* 'क' जीवनसत्त्व शरीराला लोह शोषून घ्यायला मदत करतं. या जीवनसत्त्वाच्या अतिसेवनामुळे शरीर लोहही अधिक प्रमाणात शोषून घेईल. लोहाच्या अतिप्रमाणामुळे यकृत, हृदय, थायरॉइड, स्वादुपिंड तसंच मज्जासंस्था यांना नुकसान पोहचू शकतं.

* 'क' जीवनसत्त्वाच्या अतिसेवनामुळे मूतखड्याचा धोका वाढतो. हे जीवनसत्त्व ऑक्सालेटच्या रुपात मूत्रावाटे शरीराबाहेर टाकलं जातं. 'क' जीवनसत्त्व अधिक प्रमाणात घेतल्यास मूत्रातल्या ऑक्सालेट या घटकाचं प्रमाण वाढून खडे किंवा स्फटिक तयार होण्याची शक्यता वाढते.

# बॅड कोलेस्टेरॉलकडे दुर्लक्ष नको



आरोग्य चर्चा
डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे

शरीरातील कोलेस्टेरॉलचे वाढलेले प्रमाण 'सायलेंट किलर' ठरते. त्याची लक्षणे चेहऱ्यापासून शरीरापर्यंत दिसतात. काही वेळा डोळ्यांभोवती किंवा आजूबाजूला पिवळे डाग दिसतात. हे झेंथेलास्माचे लक्षण असू शकते. हे डाग बहुतेकदा शरीरात कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढले असल्याचे निदर्शक मानले जातात. चेहऱ्याबचा रंग बदलणे, पापण्यांवर पिवळे डाग येणे ही त्याची आणखी काही लक्षणे आहेत. डोळ्यांच्या बुब्बुळांभोवती हलक्या रंगाची रिंग तयार होणे हे डोळ्यांमध्ये कोलेस्ट्रॉल जमा होऊ लागल्याचे लक्षण असू शकते.

रक्तात कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढल्यास रक्तवाहिन्या ब्लॉक होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे हृदयाला त्रास होऊ लागतो. शरीर थकलेले आणि सुस्त वाटते. कोलेस्टेरॉल वाढल्यामुळे त्वचेवर कोरडेपणासह खाज येण्याची समस्या दिसून येते. निळ्या आणि जांभळ्या रंगाचे डाग तयार होतात. ही रक्ताभिसरणावर अनिष्ट परिणाम झाल्याची लक्षणे आहेत. रक्तप्रवाह प्रभावित झाल्यामुळे डोके आणि पाय दुखण्याच्या तक्रारी दिसून येतात.

शरीरातील उच्च कोलेस्टेरॉलचा परिणाम पचनसंस्थेवर होतो. यासोबतच फुफ्फुसे आणि हृदयावरही दबाव वाढतो.

त्यामुळे छातीत दुखण्यासोबत श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. जंक फूडचे जास्त सेवन, शारीरिक हालचालींपासून दूर राहणे, जास्त वजन, लठ्ठपणा, दारू आणि सिगारेटचे सेवन तसेच अनुवांशिकता ही शरीरात कोलेस्टेरॉलची पातळी वाढण्यामागील करणे असू शकतात.

# डोळे मिचकावताय?



वेगळे काही
डॉ. कुंदन गायकवाड

डोळे मिचकावणे हे 'मायोकायमिया' या आजाराचे लक्षण असू शकते. पापणीचे स्नायू आकुंचन पावल्यामुळे डोळे मिचकावले जातात. 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोलॉजिकल डिसऑर्डर्स अँड स्ट्रोक' (एनआयएनडीएस)च्या मते बहुतेकवेळा ही स्थिती सौम्य असते आणि काही सेकंदांपासून काही मिनिटांपर्यंत टिकते.

* **तणाव आणि चिंता:** २०२३ मध्ये 'जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूरोसायकोलॉजी'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार तणाव मेंदूच्या न्यूरोट्रांसमीटर संतुलनावर परिणाम करतो. त्यामुळे पापण्यांच्या स्नायूंचे अनैच्छिक आकुंचन होऊ शकते.

* **झोपेचा अभाव:** पुरेशी झोप न घेतल्याने डोळे मिचकतात. 'स्लीप रिसर्च सोसायटी'च्या २०२४ च्या अभ्यासानुसार ७-९ तासांपेक्षा कमी झोपणाऱ्या लोकांना 'मायोकायमिया' होण्याची शक्यता ४० टक्के जास्त असते.

* **कॅफिन आणि अल्कोहोलचे जास्त सेवन:** कॉफी, चहा किंवा एनर्जी ड्रिंक्समध्ये आढळणारे कॅफिन आणि अल्कोहोल मज्जासंस्थेला उत्तेजित करतात. त्यामुळे डोळ्यांचे स्नायू संवेदनशील होऊ शकतात. '२०२३ मध्ये फूड सायन्स अँड न्यूट्रिशन जर्नल'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, कॅफिनचे जास्त सेवन केल्याने 'मायोकायमिया'चा धोका ३० टक्क्यांनी वाढू शकतो.

* **डोळ्यांचा दाब:** मोबाईल, लॅपटॉप किंवा टीव्हीच्या स्क्रीनकडे जास्त वेळ पाहिल्याने डोळ्यांच्या स्नायूंवर दबाव येतो. त्यामुळे डोळे मिचकवू शकतात. २०२४ मध्ये 'ऑप्थॅल्मोलॉजी रिसर्च'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात डिजिटल स्क्रीनवर ६ तासांपेक्षा जास्त वेळ घालवणाऱ्यांमध्ये डोळे मिचकण्याच्या तक्रारी २५ टक्के जास्त असतात, असे आढळून आले आहे..

* **पोषक तत्वांची कमतरता:** व्हिटॅमिन बी१२, मॅग्नेशियम आणि पोटॅशियमची कमतरता मज्जासंस्थेवर परिणाम करते. त्यामुळे डोळे मिचकतात.

* **डोळे कोरडे आणि ॲलर्जी** : ५० वर्षांहून अधिक वयाच्या लोकांना डोळे कोरडे होण्याची समस्या असते. त्यामुळे त्यांचे डोळे मिचकतात.

* **गंभीर न्यूरोलॉजिकल समस्या:** काही वेळा डोळे मिचकावणे हे ब्लेफेरोस्पाझम किंवा हेमिफेशियल स्पॅझम सारख्या गंभीर न्यूरोलॉजिकल समस्यांचे संकेत असू शकते. ब्लेफरोस्पाझममध्ये दोन्ही डोळ्यांच्या पापण्या अनैच्छिकपणे बंद होऊ शकतात. हेमिफेशियल स्पॅझममध्ये चेहऱ्याच्या एका बाजूला परिणाम होतो. मल्टिपल स्क्लेरोसिस किंवा पार्किन्सन सारख्या आजारांमुळेदेखील डोळे मिचकू शकतात. अशा वेळी ताबडतोब न्यूरोलॉजिस्टशी संपर्क साधावा.

# बटाटे फ्रीजमध्ये ठेऊ नका!



आपण बटाटे खराब होऊ नयेत म्हणून फ्रीजमध्ये ठेवले जातात. मात्र ही कृती आरोग्याच्या दृष्टीने घातक ठरू शकते.

* बटाटा फ्रीजमध्ये ठेवल्यानंतर त्यातल्या स्टार्चचं रुपांतर साखरेत होतं. हीच साखर आरोग्याच्या दृष्टीने घातक ठरू शकते. फ्रीजमधले बटाटे खाल्ल्यामुळे कर्करोगासारखी दुर्धर व्याधीही जडू शकते.

* बटाट्यातल्या साखरेचा यातल्याच अमिनो ॲयसिड ॲस्परॅगनशी संपर्क होऊन ॲरक'इलामाइड नावाचं घातक रसायन तयार होतं. हे रसायन आरोग्यासाठी खूपच घातक ठरतं.

* फ्रीजमध्ये ठेवलेले बटाटे शिजवल्यानंतर त्यात ॲॅक्रइलामाइड रसायनाची निर्मिती होऊ लागते. हे रसायन पोटात गेल्यानंतर बराच त्रास होऊ शकतो.

कुठे चुकतो आपण?

त्यामुळे बटाटे कोरड्या जागी ठेवायला हवेत.

* ॲक्राइलामाइड हे रसायन स्टार्चयुक्त पदार्थांमध्ये आढळतं. उच्च तापमानावर शिजवलेल्या स्टार्चयुक्त पदार्थांमध्ये या रसायनाची निर्मिती होते. हे रसायन कॅन्सरला कारणीभूत ठरू शकतं.

# दोषांनुसार निवडा व्यायामप्रकार



आयुर्वेद आणि विकार

निरोगी आणि तंदुरुस्त रहाण्यासाठी व्यायाम गरजेचा आहे हे आपण जाणतो. शरीराला कोणत्याही प्रकारचा व्यायाम चालतो, असं आपल्याला वाटतं. पण शरीरातल्या दोषांनुसार व्यायामाची निवड करायला हवी असं आयुर्वेद सांगतं. याबाबत विस्ताराने जाणून घेऊ.

* वात दोष असणारे लोक मुळातच उत्साही असतात. मात्र या लोकांची देहयष्टी बारीक असते. त्यांची पचनशक्तीही कमकुवत असते. तसंच त्यांचं वजनही कमी असतं. त्यामुळे वात दोष असणाऱ्यांनी कमी वेग असणाऱ्या व्यायामप्रकारांची निवड करायला हवी. लंजेस, स्क्वॉट्स, रेझिस्टन्स बँड ट्रेनिंग हे व्यायामप्रकार वात दोषांसाठी योग्य ठरतात. योगासनं तसंच कमी तीव्रतेचे व्यायामप्रकारही चालून जातात.

* पित्त प्रवृत्तीच्या लोकांचं शरीर अधिक उष्ण असतं. त्यांची शारीरिक क्षमता उत्तम असते. तसंच बांधाही मध्यम असतो. या लोकांनी आरामदायी तसंच तुलनेने सोपे व्यायामप्रकार करणं गरजेचं आहे. पित्तामुळे उष्णता वाढत असल्यामुळे या लोकांनी उष्ण तसंच आर्द्र जागेत व्यायाम करू नये. यीन योगा, पिलेट्स, पोहणं, चालणं असे व्यायाम करता येतील.

* कफ प्रवृत्तीच्या लोकांची शारीरिक क्षमता उत्तम असते. पण आळशीपणामुळे त्यांचं वजनही लवकर वाढतं. या लोकांना व्यायामासाठी उद्युक्त करणं खूप कठीण असतं. या लोकांनी झुंबा, कार्डिओ तसंच इतर वेगवान व्यायामप्रकार करायला हवेत.

# लहान मुलांनाही यकृताचा धोका



आरोग्य विशेष
डॉ. अजेय गर्जे

लहान मुलांमध्ये यकृताचा आजार क्वचितच दिसून येतो. परंतु 'अमेरिकन लिव्हर फाउंडेशन'च्या मते, फॅटी लिव्हर डिसीज (नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर), व्हायरल हेपेटायटीस (हिपॅटायटीस ए, बी, सी), ऑटोइम्यून हेपेटायटीस, मेटाबॉलिक लिव्हर डिसीज हे आजार यकृताचे आरोग्य बिघडवू शकतात.

जन्मापासून यकृतामध्ये दोष, आनुवंशिक समस्या, विषाणू संसर्ग (उदा. हिपॅटायटीस विषाणू), शरीरात एंझाइमची कमतरता, रोगप्रतिकारक शक्तीचे अयोग्य कार्य, जास्त चरबी किंवा साखर असलेले अन्न खाणे यामुळे ही समस्या वाढते.

मूल वारंवार आजारी पडत असेल, त्याचे वजन व्यवस्थित वाढत नसेल किंवा वारंवार उलट्या होत असतील तर हे यकृताच्या आजाराचे लक्षण असू शकते. याशिवाय, त्वचा किंवा डोळे पिवळे होणे (कावीळ), पोट फुगणे, लघवीचा गडद रंग, विष्ठेचा हलका रंग, थकवा आणि अशक्तपणा आणि भूक न लागणे ही त्याची लक्षणे असू शकतात. डॉक्टर मुलाच्या लक्षणांवर आधारित रक्त तपासणी, अल्ट्रासाऊंड किंवा सीटी स्कॅन, बायोप्सी, अनुवांशिक चाचणी अशा काही चाचण्या करतात.

उपचार रोगाच्या तीव्रतेवर आणि प्रकारावर अवलंबून असतात. काही प्रकरणांमध्ये औषधांमुळे विकार बरा होतो. परंतु गंभीर प्रकरणांमध्ये यकृत प्रत्यारोपणाची आवश्यकता भासू शकते. पित्त अट्रेसियासारख्या प्रकरणांमध्ये, वेळेवर शस्त्रक्रिया करणे आवश्यक ठरते.

# वायफाय, लॅपटॉपमुळे येते वंध्यत्व



जाणून घ्या
डॉ. सतीश सोनवणे

लोक अनेकदा लॅपटॉप मांडीवर ठेवून काम वापरतात. यामुळे ऑलिगोस्पर्मिया होऊ शकतो. यात वीर्यातील शुक्राणूंची संख्या कमी होते आणि त्याचा प्रजनन क्षमतेवर परिणाम होतो.

'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन'मध्ये डिसेंबर २०१६ मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार मांडीवर ठेवून लॅपटॉप वापरण्याचे अनेक तोटे होऊ शकतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते संपूर्ण जगातील जवळजवळ प्रत्येक सहावी व्यक्ती वंध्यत्वाचा सामना करत आहे. भारतातही १५-२० टक्के जोडपी वंध्यत्वाचा सामना करत आहेत. यापैकी ४०-५० टक्के प्रकरणे पुरुषांच्या वंध्यत्वामुळे होतात. शुक्राणूंच्या निर्मितीसाठी, अंडकोषांचे तापमान शरीराच्या सामान्य तापमानापेक्षा सुमारे ३ अंश सेल्सिअसने कमी असले पाहिजे. लॅपटॉप मांडीवर ठेवून बराच काळ वापरला जातो तेव्हा त्याची उष्णता थेट अंडकोशाचे तापमान वाढवते. यामुळे शुक्राणूंच्या निर्मितीची प्रक्रिया मंदावते किंवा विस्कळीत होते. त्यामुळे प्रजनन क्षमतेवर परिणाम होऊ शकतो.

लॅपटॉप वायफायला कनेक्ट केल्यानंतर मांडीवर ठेवून वापरला तर नुकसान आणखी वाढू शकते. याचे कारण म्हणजे वायफायमधून निघणारे रेडिएशन शरीराच्या नाजूक भागांवर, विशेषतः अंडकोषांच्या कार्यावर परिणाम करते.

यामुळे शुक्राणूंच्या डीएनएला नुकसान होऊ शकते. त्यांची पुढे जात राहण्याची क्षमता कमी होऊ शकते आणि रचनादेखील खराब होऊ शकते. हे सतत केल्याने शुक्राणूंची संख्या कमी होऊ शकते आणि प्रजनन क्षमतेवर वाईट परिणाम होऊ शकतो.

नवसंशोधन

## विषाणू ओळखणारं उपकरण



विषाणूंच्या विविध प्रजाती शोधून ओळख पटवण्यासाठी एका नव्या उपकरणाचा शोध लावण्यात शास्त्रज्ञांना यश आलं आहे. हे उपकरण उपयुक्त आणि कमी खर्चिक आहे. 'व्हिरिऑन' असं त्याचं नाव आहे. हे उपकरण वैद्यकीय क्षेत्रातच नाही तर इतर क्षेत्रातही वापरता येऊ शकतं. या उपकरणाचा वापर करून शेतकरी शेतातले रोगजंतू शोधू शकतात. हे उपकरण काही क्षणांमध्ये विषाणूंची ओळख पटवत असल्यामुळे विकारांचं निदान लवकर होऊ शकतं. त्यामुळे उपचारांनाही लवकर सुरुवात होऊ शकते. प्रत्येक डॉक्टरकडे हे उपकरण असायला हवं. ग'ामीण भागात या उपकरणाचा अधिक चांगला वापर होऊ शकतो.

काळजी डोळ्यांची

## लहानग्यांनाही होतो मोतीबिंदू!



मोतीबिंदू फक्त प्रौढांना होतो, असं आपल्याला वाटतं. पण प्रत्यक्षात लहान मुलांना आणि त्यातही छोट्या बाळांना मोतीबिंदू होऊ शकतो. मोतीबिंदूमुळे अंधूक दिसू लागतं. काही वेळा दृष्टी अधू होते. मोतीबिंदूचा प्रादुर्भाव एका किंवा दोन्ही डोळ्यांना होऊ शकतो. त्यामुळे लहानग्यांच्या डोळ्यांची नियमित तपासणी करून घ्यायला हवी. मोतीबिंदू जन्मजात असू शकतो. मातेला काही आजार झाल्यास गर्भातल्या बाळाच्या डोळ्यांमध्ये दोष निर्माण होऊ शकतात. ही समस्या अनुवंशिकही असू शकते. बाळाच्या पालकांना लहानपणी मोतीबिंदू झाला असेल तर मुलांनाही हा त्रास होऊ शकतो.

जपणूक त्वचेची

## मध ठरतो उपयुक्त



थंडीत त्वचा कोरडी पडते. ओठ फुटतात. म्हणूनच या दिवसात कोल्ड क'ीम, बॉडी लोशन, लिप बामचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. मात्र निसर्गाने त्वचेच्या रक्षणासाठी बरीच आयुधं दिलं आहेत. त्यापैकी एक म्हणजे मध. खोबरेल तेल, मध, लॅनोलिन आणि ई जीवनसत्त्व यांचा वापर करून घरच्या घरी लिप बाम किंवा क'ीम तयार करता येईल. या क'ीममुळे त्वचा कोरडी पडणार नाही.

आजीबाईचा बटवा

## लाभ लवंगयुक्त पाण्याचे...



लवंगांमध्ये अनेक औषधी गुणधर्म आहेत. दंतविकारांमध्ये लवंग खूप लाभदायी ठरते. लवंगामुळे इतर काही विकारांनाही प्रतिबंध करता येतो. लवंगयुक्त पाणीही औषधी असतं. या पाण्याचं सेवन नियमितपणे करायला हवं. हिवाळ्यात लवंगेचं पाणी पिणं गरजेचं आहे. या पाण्यामुळे पचनसंस्थेचं कार्य सुधारतं. वजन कमी करणार्यांसाठीही हे पाणी उपयुक्त असतं. शरीराचा दाह कमी करण्याचा गुणधर्मही यात आहे. एका भांड्यात पाणी घेऊन दोन-तीन लवंगा भिजवून ठेवा. लवंगा रात्रभर भिजत ठेवा. सकाळी उठल्यावर हे पाणी प्या. या पाण्यामुळे वजन कमी होण्याच्या प्रकि'येचा वेग वाढतो.



# विधीमंडळ अधिवेशन

## लिंबू मिरचीसह अनिल परबांचा विधान परिषदेत विचित्र दावा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :



रायगडच्या पालकमंत्री पदाचा वाद सुरू असतानाचा शिंदे गटाचे आमदार आणि राज्याचे मंत्री भरत गोगावले यांच्या अघोरी पूजा केल्याचा आरोप झाला होता. याचे पडसाद आज विधान परिषदेत उमटले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अनिल परब हे सभागृहात चक्क 'लिंबू-मिरची' घेऊन पोहोचले. रायगडमध्ये तंत्र-मंत्राच्या माध्यमातून होणा?्या संभाव्य धोक्यांपासून आदिती तटकरे यांचे संरक्षण व्हावे, अशी भावना अनिल परब यांनी व्यक्त केली. त्यांच्या या कृतीमुळे सभागृहात चांगलाच हास्यकल्लोळ बघायला मिळाला.

रायगडच्या पालकमंत्री पदाचा तिढा अद्यापही सुटलेला नाही. शिंदे गटाचे नेते भरत गोगावले आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आदिती तटकरे दोघेही आग्रही आहेत. त्यामुळे रायगडच्या पालकमंत्रीपदाचा वाद कायम आहे. या दरम्यान काही दिवसांपूर्वी भरत गोगावले यांचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. यातून अघोरी पूजा केल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला होता. गोगावले यांनी या आरोपांचे खंडन केले होते. मात्र, याचे पडसाद पावसाळी अधिवेशात पाहायला मिळाले. ठाकरे गटाचे आमदार अनिल परब हे आज चक्क लिंबू-मिरची घेऊन विधान परिषदेच्या सभागृहात दाखल झाले.

आपण गेल्या महिन्यांमध्ये वेगवेगळे कायदे करुन वेगवेगळ्या पद्धतीने सुरक्षा दिली. आपण लाडक्या बहिणींना १५०० रुपये देऊन मजबूत स्थान दिले, शेतकऱ्यांना न्याय दिला, पण आज माझा विषय आहे, तुम्ही एवढ्या लाडक्या बहिणींचा मान सन्मान करताय, एवढा मानसन्मान करताना माझे देखील एक कर्तव्य आहे की, महाराष्ट्राच्या प्रत्येक बहिणीची सुरक्षा राहण्यासाठी माझे योगदान काय? हा प्रश्न माज्यासमोर आहे. मी माज्या बहिणीची सुरक्षा राखण्यासाठी काय करु शकतो? असा मला प्रश्न पडतो, असे अनिल परब म्हणाले.

इथे आदिती ताई तटतरे बसल्या आहेत. इथे बसलेल्या तुमच्या सगळ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी आहे. सर्वोच्च स्थानी आपण बसला आहात. तुम्ही जशी नगराध्यक्षांची सुरक्षा बघताय, पण झालंय का त्या बिलात तुम्ही केवळ तेवढी काळजी घेतली आहे. पण पालकमंत्री म्हणून असे काही होणार असेल तर त्याची काळजी कोण घेणार? जे काही रायगड जिल्ह्यात तंत्र, मंत्र, अघोरी प्रकार जो चालला आहे, बहिणीच्या सुरक्षेचा प्रश्न आहे, अशी उपरोधिक भावना त्यांनी व्यक्त केली.

## कोंबडीचा मुद्दा महाजनांचे उत्तर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :



वाघाच्या हल्ल्यात बळी गेलेल्या शेतकऱ्यांना २५ लाख रुपयांची मदत केली जाते. पण वीज कोसळून मृत्यू झाल्याने केवळ ४ लाख रुपये दिले जातात. ही मदत पुरेशी नाही. त्यामुळे त्यात वाढ केली जावी, अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी बुधवारी विधानसभेत केली.

त्यावर राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, राज्य आपत्ती व्यवस्थापनमध्ये आधी वीज कोसळून मृत्यू याचा समावेश नव्हता, पण आता त्याचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकरणी मदत निधी वाढवून देण्याबाबत आपल्या सूचनांचा विचार केला जाईल. याविषयीही मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे ते म्हणाले.

### कोंबडी खात नाही म्हणून..

गिरीश महाजन यांनी यावेळी वीज पडून ठार होणाऱ्या प्राण्यांवर मिळणाऱ्या नुकसान भरपाईवरही भाष्य केले. ते म्हणाले, पूर्वी वीज पडून जी माणसे मरतात किंवा जे इतर नुकसान होते. त्याला मदत मिळत नव्हती. पण २०१७ मध्ये सरकारने जीआर काढला. त्यानंतर याला मदत मिळण्यास सुरूवात झाली. त्यानुसार आता मृत व्यक्ती असेल तर ४ लाख, गंभीर जखमी असेल तर अडीच लाख रुपए दिले जातात. याशिवाय गाय, म्हैस, बैल या मोठ्या जनावरांना प्रत्येकी ३७५०० रुपये, शेळी, मेंढी असेल तर त्याला ४ हजार रुपये मिळतात. कोंबडीला केवळ १०० रुपयेच आहेत.

त्यांच्या या विधानावर विरोधकांनी कोंबडीला किमान ५०० रुपये अनुदान देण्याची मागणी केली. त्यावर महाजन यांनी हसत, मी कोंबडी खात नाही, त्यामुळे मला तिचा भाव माहिती नाही, असे विधान केले.

# राज्यात अडीच वर्षात ४२७ पोलिसांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :
राज्यात गेल्या अडीच वर्षांत ४२७ पोलिसांचा मृत्यू झाला असून, यात २५ आत्महत्यांचा समावेश आहे. पोलिसांत वाढत असलेल्या मानसिक तणावामुळे ही स्थिती उद्भवली असल्याचे स्पष्ट होताच, राज्य सरकारने तातडीने काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.

राज्यातील प्रत्येक पोलिस युनिटमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांना आता दर मंगळवारी आणि शुक्रवारी दोन तास कर्मचाऱ्यांशी संवाद साधावा लागणार आहे. आठवड्यात किती पोलिसांशी संवाद झाला याची नोंद ठेवण्याचे निर्देशही सरकारने दिल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी विधान परिषदेत दिली.

आमदार सुनील शिंदे यांनी पोलिसांच्या ड्युटीदरम्यान होणाऱ्या मृत्यूचा मुद्दा उपस्थित केला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पोलिसांच्या निवासस्थानाचा प्रश्न, आरोग्य व्यवस्था व डिजी लोन आदी प्रश्नावरून सरकारला धारेवर धरले.

पोलिसांच्या ड्युटीचा ८ तासांचा कालावधी असला, तरीही किमान १२ तास त्यांना काम करावे लागते. मुंबई पोलिस दलात कार्यरत असलेल्यांपैकी निम्म्याहून अधिक पोलिस मुंबईबाहेर वास्तव्यास आहेत. वसई, विरार, नवी मुंबई, पनवेलपासून कर्जत, कसारापर्यंत पोलिसांचे वास्तव्य आहे. यामुळे दिवसातील किमान १६ ते १८ तास त्यांचे ड्युटी व प्रवासात जाते. त्यामुळे योगा आणि व्यायाम करण्यासाठी त्यांना वेळ मिळत नाही.

### प्रत्येक मंगळवार आणि शुक्रवार संवादाची सक्ती



पोलिसांचे सर्वाधिक मृत्यू हे हृदयविकाराच्या झटक्याने होत असल्याची माहिती दानवे यांनी सभागृहात दिली. प्रवीण दरेकर, शशिकांत शिंदे, संजय खोडके, भाई जगताप, बंटी पाटील यांनी पोलिसांच्या समस्यांबाबत विधान परिषदेत आवाज उठवला.

यावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पोलिसांची ८ तासाची ड्युटी असून, सण-उत्सव किंवा बंदोबस्ताच्या वेळी काही कारणास्तव सुट्टी न मिळाल्यास त्याचे एनकॅशमेंटही मोठ्या प्रमाणावर वाढवले आहे. पोलिसांमध्ये वाढणाऱ्या जीवनशैलीशी संबंधित आजारांवर लक्ष दिले जात आहे. ४० वर्षांवरील पोलिसांसाठी वर्षातून एकदा आणि ५० वर्षांवरील पोलिसांसाठी वर्षातून दोनदा आरोग्य तपासणी अनिवार्य केले आहे.

### पोलिसांसाठी गृहनिर्माण प्रकल्प

मुंबईसह राज्यभरात पोलिसांसाठी मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण प्रकल्प राबवले जात आहेत. तालुका स्तरावर ही काम वेगाने सुरू आहे. पोलिस गृह निर्माण महामंडळाचे काम अभूतपूर्व असल्याचे त्यांनी नमूद केले.

डीजी लोन योजनेचा उल्लेख करताना फडणवीस म्हणाले की, त्यांनी गृहमंत्री असताना ही योजना सुरू केली होती. मात्र, महाविकास आघाडी सरकारच्या काळात ती बंद झाली होती. नव्याने गृहमंत्रीपद आल्यानंतर ती पुन्हा सुरू केले असून आता बॅकलॉक निकाली काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

### अनुकंपा भरती मिशन मोडवर

राज्य शासनाच्या १५० दिवस आराखडा कार्यक्रमात पोलिसांच्या अनुकंपा भरती संदभार्तील सर्व प्रकरणे मिशन मोडवर निकाली काढली जातील. यासाठी सर्व विभागांना यासंबंधी आदेश दिले आहेत.

मुंबई व महाराष्ट्र पोलिस दलात गेल्या काही वर्षांत हृदयविकार, कर्करोग, आत्महत्या अशा विविध कारणांमुळे पोलीस कर्मचा?यांचे मृत्यू झाले. यात कार्डियाक अरेस्टमुळे ७५ मृत्यू, कर्करोगामुळे ६ मृत्यू झाले आहेत. पोलिसांच्या कल्याणासाठी शासनाने अनेक उपाययोजना राबवत असून यात ४० प्रकारच्या आजारांवर मोफत उपचार केले जात आहेत. यासाठी राज्यात २७० हॉस्पिटल्ससोबत टायअप करण्यात आले आहे. टाटा मेमोरियल व ए.के. मेहता यांच्यासोबत कॅन्सर तपासणी कॅम्प आयोजित करण्यात आले आहे. त्याचबरोबर पोलिसांसाठी योगा, ध्यानधारणा व व्यायामशाळा सुरू करण्यात आली असल्याचे गृह राज्यमंत्री कदम यांनी यावेळी दिली.

## वीज कोसळून मृत्यू नुकसान भरपाईत वाढ होण्याचे संकेत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :
राज्यात वीज कोसळून जाणाऱ्या बळींच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १० लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याची मागणी विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी बुधवारी विधानसभेत तारांकित प्रश्नोत्तराच्या तासात बोलताना केली.

त्यावर सरकारने या प्रकरणी गांभिर्याने विचार करण्याची भूमिका घेतली. महाराष्ट्रात २०२२ व २०२३ या वर्षांत वीज पडून तब्बल ४१७ जणांचा बळी गेल्याची बाबही सरकारने नमूद केली. या नुकसान भरपाईत वाढीचे संकेत आहेत.

## जीपमध्ये ५ बंदूकांसह ३५० जीवंत काडतूसे?

### तलवार, तीर कमानसह वाहनातून हत्यारे जप्त

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २ :
शहरातील दर्डा नगर परिसरात राहणाऱ्या युवकांच्या वाहनातून विविध प्रकारच्या तब्बल ५ बंदूका, ३५० जीवंत काडतुसे, अद्यावत तीर-कमान, तलवार आणि इतर शस्त्रसाठा जप्त करण्यात आला.



रणवीर रमन वर्मा (वय ३०) असे या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपी युवकाचे नाव आहे. सहाय्यक पोलिस निरिक्षक संतोष मनवर यांना गोपनीय माहिती मिळाली की, दर्डा नगर रणबीर नावाच्या युवकाकडे अग्नीशस्त्रे असून तो त्याच्या जीपमध्ये शस्त्रे व काडतूसे घेवून पांढरकवडा रोडने घरी जाणार आहे.

एलसीबीच्या पथकाने पांढरकवडा मार्गावर सापळा रचला. त्यात रात्री रणवीर हा पांढरकवडा मार्गाने जीपने न येता मोपेडने येताना दिसला. त्याची चौकशी केली असता त्याच्या वाहनाच्या पायदानाजवळ ५ अग्निशस्त्र व एक काळसर रंगाचा टच बटन लेदर बॉक्स ज्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे ३५० जिवंत काडतुसे, एक धारधार तलवार, बुलेट प्रुफ जॅकेट मिळाले.

ताब्यात घेवून संपूर्ण मुद्देमाल व वाहन असा एकूण ७,७८,५०० रुपये किमतीचा मुद्दमाल जप्त केला. आरोपीस न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

पाच अग्नीशस्त्र पकडल्याची कारवाई सुरु असतानाच या पथकाला गोपनीय माहिती मिळाली. त्यात मो. अश्फार मो. असलम मलनस उर्फ भाया हा त्याच्याकडे असलेल्या पंप ॲक्शन गणने कोणाला तरी मारण्याच्या उद्देशाने चारचाकीने शहरात फिरत असल्याचे सांगण्यात आले. त्यावरुन या पथकाने सापळा लावला. मो. अश्फार मो. असलम मलनस उर्फ भाया (वय ३५) रा. तेलीपुरा याला ताब्यात घेत त्याच्या वाहनाच्या डिक्कीतून ॲक्शन गण व ५ जिवंत काडतूसे असा अवैध अग्निशस्त्र व दारुगोळा साठा आढळून आला.

## ब्रह्मपुरी ते वडसा पूल वाहून गेला

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. २ :
चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाने कहर केला आहे. गेल्या २४ तासांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, अनेक नद्या-नाले ओसंडून वाहत आहेत. विशेषतः ब्रह्मपुरी-वडसा या मुख्य महामार्गावरील रपटा नदीवरील पूल पाण्याच्या प्रचंड प्रवाहात वाहून गेला आहे.

या घटनेमुळे चंद्रपूर-ब्रह्मपुरी-वडसा हा मुख्य महामार्ग पूर्णपणे बंद झाला आहे. दोन्ही जिल्ह्यांचा संपर्क तुटल्याने शाळेच्या बसेससह सर्वच वाहतूक ठप्प झाली आहे. नागरिक आणि प्रवासी अडकल्याने मोठी गैरसोय निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत औचित्याचा मुद्दा उपस्थित करत तातडीने मदतीची मागणी केली.

## पोलिसांचे कल्याण हीच गृह विभागाची प्रमुख जबाबदारी

### राज्यमंत्री योगेश कदम यांची विधान परिषदेत स्पष्टोक्ती

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचे कल्याण ही गृह विभागाची प्रमुख जबाबदारी आहे, असे ठाम प्रतिपादन गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधान परिषदेत केले. कर्तव्यावर असताना होणाऱ्या पोलिसांच्या मृत्यू प्रकरणावर उत्तर देताना त्यांनी ही माहिती दिली.

राज्यातील पोलिसांच्या मृत्यूचे कारण आजारपण, आत्महत्या यांसारखे असल्याचे त्यांनी सांगितले. अशा दुर्दैवी घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्यांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी शासन सातत्याने उपाययोजना राबवत आहे, असे मंत्री कदम यांनी स्पष्ट केले.

### पोलीस कल्याणासाठी शासनाचे महत्त्वाचे निर्णय

२७० रुग्णालयांत मोफत उपचार सुविधा : पोलिसांसाठी ४० प्रकारच्या आजारांवर मोफत उपचार २७० रुग्णालयांमध्ये सुरू आहेत. केवळ मुंबईतच ३४ रुग्णालयांमध्ये ही सेवा उपलब्ध आहे.

कॅन्सर निदान शिबिरे : टाटा रुग्णालय आणि अन्य संस्थांच्या मदतीने पोलिसांसाठी कॅन्सर निदान शिबिरे आयोजित केली जात आहेत.

मानसिक आरोग्यासाठी योगा व व्यायामशाळा : पोलीस स्थानकांमध्ये योगा शिबिरे आणि व्यायामशाळा सुरू करून पोलिसांचे मानसिक व शारीरिक आरोग्य सुदृढ ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

राज्य सरकारने पोलिस दलातील ८५% हून अधिक रिक्त पदे भरली असून, ही आतापर्यंतची सर्वाधिक भरती असल्याचे त्यांनी सांगितले.

## शेतकऱ्यांची एक हजार वेळा माफी..

### बबनराव लोणीकरांचे वक्तव्य

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांविषयी केलेल्या वादग्रस्त विधान व शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर विधानसभेत तीव्र पडसाद उमटले.

काल या प्रकरणी काँग्रेस सदस्य नाना पटोले यांचे दिवसभरासाठी निलंबन झाले होते. त्यानंतर विरोधकांनी सभागृहाच्या कामकाजावर बहिष्कार टाकत सभात्याग केला होता. या प्रकरणी आजही विरोधक सरकारला धारेवर धरले.

भाजपचे माजी मंत्री आणि आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांच्या विरुद्ध आक्षेपार्ह विधान केली. या विरोधात महाविकास आघाडीने आक्रमक भूमिका घेतल्याने लोणीकर यांनी आज विधानसभेत स्पष्टीकरण दिले.

मी जे बोललो नाही ते मी बोललो हा आरोप केला.ह्यात राजकारण आहे असा दावा बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत केला. महाविकास आघाडीने तेव्हा आक्षेप घेतला व जोरदार घोषणाबाजी केली.



शेतकऱ्यांची माफी मागायची सोडून ते खुलासा करत आहेत की मी असे बोललो नाही. सगळ्या महाराष्ट्राने पाहिले आहे की त्यांनी म्हटले होते, मोदी तुमचा बाप आहे. तुमच्या अंगावरचे कपडे आम्ही दिले.
त्यांच्या या विधानासाठी आम्ही माफीची मागणी केली होती. पण सत्ताधारी लोणीकरांची वकिली करत होते. महायुती सरकारची पण हीच भूमिका आहे का? आज संपूर्ण महाराष्ट्राला कळून चुकले आहे की जी लोणीकरांची भूमिका आहे तीच भाजपची आहे. त्यांनी माफी मागितली नाही हे तमाम शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे.
**विजय वडेट्टीवार**

## : मुलखावेगळी माणसं :
## सुंदर हस्ताक्षर कलाकार पांडुरंग



सुंदर हस्ताक्षर, चांगल्या व्यक्तिमत्त्वाचा दागिना आहे असे म्हटले जाते, आणि हिंगोली जिल्ह्यातील गुगुळपिंपरी येथील पांडुरंग चोपडे यांचे जीवन हे याचं प्रमाणे आहे. पंधरा वर्षांपासून शालेय विद्यार्थ्यांना हस्ताक्षराची कला शिकवणारे पांडुरंग चोपडे यांचं कार्य नक्कीच प्रेरणादायक आहे.

त्यांनी आतापर्यंत सहा लाख विद्यार्थ्यांना मोफत हस्ताक्षराचे धडे दिले आहेत. पांडुरंग चोपडे यांच्या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरातील वळणाचा आणि सुधारण्याचा आहे. त्यांना विश्वास आहे की, शालेय जीवनातच सुंदर हस्ताक्षर शिकल्यास विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक प्रगल्भ आणि सुंदर होऊ शकते. यासाठी त्यांनी वसमतच्या दोन इंग्रजी शाळांमध्ये सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा घेतल्या. तहसीलदार शारदा दळवी यांच्या उपस्थितीत या कार्यशाळेचा समारोप करण्यात आला.

पांडुरंग चोपडे यांचे कार्य विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी खूप महत्त्वाचे आहे, कारण एक चांगलं हस्ताक्षर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक सकारात्मक ओळख देतं. कार्यशाळांमध्ये विद्यार्थ्यांना अक्षर सुंदर व वळणदार कसे करावे, याबद्दल मार्गदर्शन केलं जातं. यामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व आणि कार्यक्षमता सुधरते. विद्यार्थ्यांचे सुधारणारे हस्ताक्षर पाहून त्यांच्या पालकांनाही आनंद झाला आहे, आणि त्यामुळे शाळेतील वातावरण सुधारण्यास मदत होते.

लालबहादूर शास्त्री व लिटल किंग्ज शाळेमध्ये पांडुरंग चोपडे यांनी दहा दिवसांपासून स्वच्छ व सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा घेतली आहे. यात विद्यार्थ्यांच्या आधीच्या हस्ताक्षरातील चांगला बदल झाला आहे.

पालक देखील आपल्या मुलांचे सुधारलेले हस्ताक्षर पाहून खुश आहेत.तहसीलदार शारदा दळवी यांनी या कार्यशाळेचे महत्त्व ओळखून, ग्रामिण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये देखील अशा कार्यशाळांचा आयोजन करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. माझ्या तालुक्याच्या शाळांमध्ये हस्ताक्षर स्वच्छ आणि सुंदर व्हावे, असे त्या म्हणाल्या.

पांडुरंग चोपडे यांचा ध्येय एकच आहे, आणि ते म्हणजे हिंगोली जिल्ह्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुंदर आणि मोत्यासारखे बनविणे. हस्ताक्षर चांगले असणे, व्यक्तिमत्त्वासाठी महत्त्वाचे आहे. ज्याचं हस्ताक्षर चांगले असते, त्याचे व्यक्तिमत्त्व देखील चांगले असते. यामुळे त्यांचा प्रयत्न केवळ विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व सुधारण्याचा नाही, तर त्यांची शालेय कामगिरी देखील सुधारण्याचा आहे.

चोपडे यांना विश्वास आहे की, जिल्हाधिकारी यांची परवानगी मिळाल्यास जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा घेता येईल. त्यांचे शिक्षण आणि काम हा त्यांचा छंद आहे आणि ते त्याला पूर्णतः समर्पित आहेत. ■ ■ ■

**लोकमानस**

# दादा कोंडकेंसारखे उत्तर का देता?

### मंत्री संजय राठोड यांच्या उत्तरावर स्पष्ट नाराजी व्यक्त करत सुधीर मुनगंटीवार यांचा सवाल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :
विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी प्रश्नोत्तराच्या तासात माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सरकारला चांगलेच धारेवर धरले.

त्यांनी नाला रुंदीकरणाच्या मुद्यावर जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिलेल्या उत्तरावर थेट विधानसभा अध्यक्षांकडे नाराजी व्यक्त केली. मंत्री दादा कोंडकेंसारखे उत्तर देत आहेत, असे ते म्हणाले. त्यांच्या या विधानाची विधिमंडळ परिसरात खमंग चर्चा सुरू होती.

नाल्यांच्या योग्य नियोजनाअभावी नाल्यांशेजारी राहणाऱ्या वस्त्यांना फटका बसतो. नाल्यांची संरक्षक भिंत नियमांनुसार बांधली जात नाही. या प्रकरणी पाण्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण झाला तर सरकार त्या अभियंत्यावर कारवाई करणार का? याशिवाय जिथे - जिथे नाले असतील त्यांच्या दुरुस्तीविषयी सरकारचे नियोजन काय? असा सवाल सुधीर मुनगंटीवार यांनी सरकारला केला.



त्याला उत्तर देताना मंत्री संजय राठोड म्हणाले, सरकार अशा नाल्यांचे सर्वेक्षण करेल. नाल्यांची रुंदी तपासून ती वाढवावी लागेल का ते पाहील. भूमीअभिलेख विभागाकरवी जिल्हाधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली चौकशी करेल. तसेच उर्वरित नाल्यांचे बांधकाम करण्यासंदर्भात जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव पाठवू.

मंत्री संजय राठोड यांचे हे उत्तर ऐकून सुधीर मुनगंटीवार यांचे समाधान झाले नाही. ते म्हणाले, नाल्याची नैसर्गिक रुंदी जेवढी आहे तेवढीच राहिली पाहिजे. सरकार याची खबरदारी घेणार आहे का? त्यावर मंत्री राठोड केवळ सजेशन फॉर ॲक्शन असे त्रोटक उत्तर दिले. त्यावर मुनगंटीवर यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे तीव्र नाराजी व्यक्त केली.

### हे काय दादा कोंडकेंचे उत्तर आहे का?

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, मंत्री संजय राठोड आमचे मित्र आहेत. पण नाल्यांची नैसर्गिक रुंदी कायम राहील का? असा माझा प्रश्न होता. त्यांनी सजेशन फॉर ॲक्शन एवढेच उत्तर दिले. हे ॲक्शन, ओन्ली ॲक्शन, नो रिॲक्शन असे असले पाहिजे.

मंत्र्यांकडून अपेक्षित आहे की, नाल्याची नैसर्गिक रुंदी काय राहिली पाहिजे. त्यांच्याकडून हमी यायला हवी की नाल्याची नैसर्गिक रुंदी तशीच ठेवली जाईल. ती हमी न देता सजेशन फॉर ॲक्शन हे काय उत्तर आहे का? हे तर द्विअर्थी उत्तर झाले. हे काय दादा कोंडकेंचे उत्तर आहे का? हे द्विअर्थी आहे का? त्याऐवजी नाल्याची रुंदी निश्चित राहील याची हमी द्या. या नाराजीनंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मंत्री संजय राठोड यांना उपाययोजना करण्याची सूचना केली.

## २२: माझं मत :
## राज आणि उद्धव ठाकरे बंधूंनी युती करावी का?

**मनीषा मिरजकर, मन सैनिक**

■ होय. मनसे प्रमुख राज साहेब ठाकरे आणि शिवसेना पक्षाचे सर्वेसर्वा उध्दव साहेब ठाकरे यांनी परिस्थिती नुरुप एकत्र येणं ही तमाम मराठी जणांची इच्छा आणि मनीषा देखील आहे.

या दोन्ही बंधूंच्या आपसातील वितुष्टमुळे मागील अनेक वर्ष भाजप सारख्या संधीसाधू पक्षाने आपला फायदा करून घेतलेला आहे. मात्र यामुळे महाराष्ट्रातील अस्सल मराठी माणूस मात्र हतबल झालेला आहे. तो विभागला गेल्यानेच मराठी मतांमध्ये फूट पडली आणि चुकीचे लोक आज सत्ताधारी म्हणून मिरवीत आहेत.म्हणूनच मराठी माणसाच्या भल्यासाठी या दोन्ही बंधूंची कायम युती व्हावी हीच मनीषा आहे.

**संतोष साठे, शिवसैनिक**

■ दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ ही मराठीतील म्हण अगदी सुपरिचित आहे.ठाकरे बंधूंचे देखील मागील काही वर्षांपासून असेच झाले आहे.ज्याचा फायदा इतर विशेषत भाजप सारख्या उपर्या पक्षाने घेतला आहे. यामुळे. मराठी माणसाची मात्र गोची झालेली आहे.जर ठाकरे बंधू निवडणुकांच्या निमित्ताने का होईना एकत्र आले तर नक्कीच पुन्हा एका शिवसेनेची सत्ता प्रस्थापित होईल आणि मराठी माणसाचा आवाज अबाधित राहील यात शंकाच नाही. ■

## चलती का नाम गाडी



C 60 ही आतापर्यंतची सर्वाधिक विक्री होणारी व्होल्वो कार. व्होल्वोच्या २७ लाखांहून अधिक कार विकल्या गेल्या आहेत, त्यामुळे व्होल्वो C60 ने आयकॉनिक व्होल्वो २४० ला मागे टाकत आतापर्यंतची सर्वाधिक विक्री होणारी व्होल्वो मॉडेल बनली आहे.

२००८ मध्ये पदार्पण झाल्यापासून, व्होल्वो कार्सची मध्यम आकाराची एसयूव्ही ग्राहकांमध्ये आवडती राहिली आहे, जी सुरक्षितता, गुणवत्ता आणि प्रीमियम ड्रायव्हिंग अनुभवाला महत्त्व देणाऱ्या विविध ड्रायव्हर्सना आकर्षित करते. २०१८ मध्ये, तिला वर्ल्ड कार ऑफ द इयर म्हणून घोषित करण्यात आले. १९८० च्या दशकात स्वीडनमध्ये वाढताना, व्होल्वो २४० ही आयकॉनिक फॅमिली कार होती तुम्हाला जवळजवळ प्रत्येक ड्राईव्हवेमध्ये एक कार दिसू शकते, व्होल्वो कार्सच्या ग्लोबल ऑफरच्या प्रमुख सुसान हॅग्लंड म्हणतात. आज C60 ने दोन प्रकारे हे स्थान मिळवले आहे. केवळ कुटुंबाची आवडतीच नाही तर आमची सर्वकालीन टॉप-सेलर देखील बनली आहे, जी यशस्वी कारचा अंतिम पुरावा आहे. C60 इतके लोकप्रिय का आहे हे व्होल्वोची व्याख्या करणाऱ्या मुख्य मूल्यासह ते पॉवरला कसे अखंडपणे एकत्रित करते याच्याशी बरेच काही संबंधित आहेः सुरक्षितता.

भारतातील कुटुंबांसाठी, C60 स्कॅन्डिनेव्हियन डिझाइन, रवश व्यावहारिकता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, व्होल्वो कार चालवताना मिळणारी अतुलनीय मनःशांती यांचे परिपूर्ण मिश्रण देते. ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com